

# येस, लाईफ इज ब्युटीफुल, बट.....

चारुदत्त

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# येस, लाईफ इज ब्युटीफुल, बट...

लेखक : चारुदत्त

# येस, लाईफ इज ब्युटीफुल, बट...

## लेखक : चारुदत्त( मंगेश विठोबा चौधरी)

**पत्ता** ६९/बी/८, गिरीराज नागरी निवारा सहकारी गृहनिर्माण संस्था, ना. नि.प. संकुल-झोन २, जनरल अरुण कुमार वैद्य मार्ग, गोरेगाव(पूर्व), मुंबई-४०००६५.

**संपर्क व व्हॉटसएप क्रमांक ७५८८७२७५२२**

**Email : mangeshchoudhary22@gmail.com**

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान :

whatsapp: **9987737237**

www.esahity.com

esahity@gmail. com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane. 400604


प्रकाशन : २६ जानेवारी २०२२ पौष कृ. नवमी शके १९४३)

**प्रजासत्ताक दिन**

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# लेखक परिचय



*मंगेश विठोबा चौधरी

(बी.ए.-मुंबई विद्यापीठ),

निवृत्त विक्रीकर निरीक्षक-महाराष्ट्र शासन

*विशेष छंद व आवड - गिर्यारोहण, चित्रपट आस्वाद, लेखन-वाचन.... उत्यादी.

*इतर माहिती - *एच. एम. आय. दार्जिलिंग(W.B.) येथे बेसिक माउंटेनिअरिंग कोर्स पूर्ण केला(१९८६).

*यंग झिंगारो ट्रेकर्स, साद माउंटेनिअर्स, हिमालयन क्लब, वाय. एच. ए. आय.(नवी दिल्ली) या गिर्यारोहण संस्थांच्या निसर्ग-साहस शिबीर-पदभ्रमण मोहिम आयोजनात व विविध हिमालयीन गिर्यारोहण मोहिमांत सहभाग घेतला आहे.

*अखिल महाराष्ट्र गिर्यारोहण महासंघ, या शिखर संघटनेत कार्यरत.

*वाय. एच. ए. आय.(नवी दिल्ली) आयोजित राष्ट्रीय स्तरावरील पदभ्रमण व गिर्यारोहण मोहिमेत गोवा, सरहान सांगला, सार पास (हिमांचल प्रदेश), अंदमान, या परिसरात कॅम्प लीडर पदावर सेवा केली आहे.

*सहयाद्री परिसरात दुर्ग भटकंती व कडे-कातळ आरोहणात सहभाग घेतला आहे.

*१९९८ मध्ये महाराष्ट्र राज्यात आयोजित केलेल्या पहिल्या नागरी एव्हरेस्ट गिर्यारोहण मोहिमेतील सपोर्ट टीममध्ये सेवाकार्यात सहभाग घेतला होता.

*काही समाजसेवी संस्थांमध्ये कार्यात सहभाग घेतलेला आहे.

*प्रभात चित्र मंडळ-मुंबई या जुन्या-जाणत्या संस्थेचा सभासद असून चांगले चित्रपट पाहाणे व त्यावर लिहिणे होते.

* दैनिक, साप्ताहिक, मासिक व दिवाळी अंकात लेख प्रसिद्ध झाले आहेत. (सकाळ, नवशक्ती, स्वराज्य, धनुर्धारी, ललना, जिद्द, कोल्हापूर चौफेर, मुंबई चौफेर, इत्यादी).

*मुंबई आकाशवाणीवर काही लेख प्रसारित झाले आहेत.

*२०१८ पासून विविध विषयांवर मराठीत ब्लॉग माध्यमातून दरमहा लेखन होते.

Blog' Title - Yes, Life is Beautiful, but……

Blog site - welcomezindagimarathi.blogspot.com

**येस,**

**लाईफ**

**इज**

**ब्युटीफुल,**

**बट...........**

**-चारुदत्त**

# लेखकाचे मनोगत व ऋणनिर्देश

मी नियमित ब्लॉग लेखन जानेवारी २०१८ पासून करीत आहे. 'येस, लाईफ इज ब्युटीफुल, बट.......... ' असे या ब्लॉगचे शिर्षक असून ते 'welcomezindagimarathi.blogspot.com' या साईटवर दर महिन्याच्या एक तारखेस प्रसिद्ध होते. यामध्ये वेगवेगळ्या विषयांवरील साहित्य असते.

माझ्या दैनंदिन वाटचालीत वेळोवेळी आलेले अनुभव आणि माझे मनस्वी छंद जोपासताना मिळालेल्या बऱ्यावाईट अनुभूती मी लिहीत असताना, या साहित्यातील निवडक लेख पुस्तकरूपात संवेदनशील वाचकांपुढे यावेत, अशी माझी इच्छा होती. त्याप्रमाणे, ब्लॉग साईटवर प्रसिद्ध झालेले काही निवडक लेख-साहित्य, मी तुमच्यासमोर सादर करीत आहे.

मात्र, हे लेखन कोणा मान्यवर साहित्यिकाचे नसून सर्वसामान्य लेखनप्रेमीचे आहे, त्यादृष्टीने याचे वाचन व्हावे.

प्रारंभी, सन २०१८ मधील निवडक वाङ्मय मी या पुस्तकात सादर केले आहे.

आपण सुज्ञ व संवेदनशील वाचक आहात. त्यामुळे, या ब्लॉग वाचनानंतर ज्या बऱ्यावाईट प्रतिक्रिया आपणाकडून येतील, त्यांचे मी मनःपूर्वक स्वागत करेन.

हे पुस्तक 'ई साहित्य प्रतिष्ठान' या सेवाभावी संस्थेच्या वतीने प्रकाशित होत आहे, याचा मला विशेष आनंद आहे. या संस्थेच्या संपादन विभागाचे प्रमुख

सुनीळ सामंत व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी मला पुस्तक प्रकाशनपूर्व काळात केलेले मार्गदर्शन खूप महत्वाचे होते. मी त्यांचा मनःपूर्वक ऋणी आहे.

जगभरातील दर्दी वाचकांच्या हाती प्रत्येक मराठी साहित्यिकाचे अमूल्य वाङ्मय पोहोचावे, याकरीता 'ई साहित्य प्रतिष्ठान' चा परिवार अथक प्रयत्न प्रारंभीपासून करीत आहे. आज मी देखील त्यांच्या या सत्कार्यात सहभागी होत आहे.

अजून एक सांगायचंय. ही ई-साहित्य कृती आपल्या हाती येण्यापूर्वी 'ई साहित्य प्रतिष्ठान' चे अनुभवी तंत्रज्ञ स्नेही व पुस्तकाची मूळ रुपरेखा अधिकाधिक नेटकी करण्यासाठी प्रयत्न करणारी माझी सुकन्या तन्वी, या साऱ्यांनीच प्रकाशन पूर्व कामात खूप मेहेनत घेतली आहे, याबद्दल त्या साऱ्यांचाही मी ऋणी आहे.

इति…………..……

चारुदत्त

(मंगेश विठोबा चौधरी)

# ॥ समर्पित ॥

**मला लहानपणी वाचनाची गोडी लावणारे**

**माझे स्वर्गीय आई-बाबा,**

**यांना ही साहित्य कृती**

**सप्रेम समर्पित.**

# अंतरंग


१-------आठवणीतील व्याख्याने------------१३

२-------मनातलं जनांत-----------------१८

३-------वाचनछंद---------------------२७

४-------चित्रपट गप्पा------------------३३

५------लक्षवेधी----------------------४२

६------कथाघर----------------------४९

७------समाजसंवेदना------------------५६

८------भटकंती मनसोक्त----------------७९

९------इतिहासात---------------------९३

१०-----परिसर----------------------१०१

११-----स्वर्गस्थ---------------------१०८

१२-----मनभावन गीत, गाणे अन  कविता------११२

**येस,**

**लाईफ**

**इज**

**ब्युटीफुल,**

**बट..........**

**-चारुदत्त**

# आठवणीतील व्याख्याने

आपले ज्ञान व प्रबोधन वाढविण्यासाठी आपल्या आयुष्यात पुस्तकं, ग्रंथ जेवढे महत्वाची भूमिका बजावतात, तेवढीच महत्वाची भूमिका समाजातील ज्ञानी वक्ते, साहित्यिक, आणि विविध क्षेत्रातील अभ्यासू मान्यवरांचीही आहे. त्यांचे प्रबोधनपर विचारच समाजाला सशक्त करत असतात, असे माझे प्रामाणिक मत आहे.

माझे वाचनवेड जोपासताना काही मान्यवरांचे विचार विविध व्याख्यान मालांमधून व चर्चात्मक कार्यक्रमातून ऐकायची मला चांगली संधी मिळाली.

एकदा, प्रसिद्ध लेखक निर्मलकुमार फडकुले यांचे ‘ आपले दैनंदिन जीवन आपण कसे जगावे व जगण्यातला आनंद कसा अनुभवावा ’, या विषयावरील श्रवणीय व्याख्यान ऐकावयास मी गेलो होतो. ते व्याख्यान तुम्हालाही आनंद देईल...........

## जगण्यातला आनंद

विवेकानंद व्याख्यानमालेतील यावेळी सर्वच श्रोत्यांना आवडलेले हे व्याख्यान असावे. मलाही या व्याख्यानाने चांगलेच प्रभावित केलेय.

डॉ. निर्मलकुमार फडकुले हे प्रसिद्ध लेखक. जगणे, आयुष्यातील ताण-तणाव, सुख-दुःखं आणि मनाचा कमकुवतपणा घालवून माणसाने आनंदी कसे व्हावे?, हे सांगणारी त्यांची खुप पुस्तके आहेत. आपण ती अजून वाचलेली नसली तरी आज

त्यांचे "जगण्यातला आनंद", या विषयावरील विचार प्रत्यक्ष ऐकायचेच, हे ठरवून व्याख्यानास आवर्जुन उपस्थित राहिलो.

माणसाने निराश होऊ नये, सतत आशावादी असावे. कारण, जग जरी क्षणभंगुर असले, तरी त्यात विविधता आहे. प्रत्येक क्षणाचे वेगळेपण आहे. ते आपण सर्वांनी अनुभवायला हवेय. हे अवघड नाही. अर्थात अनुभव मात्र घ्यायला हवा.

त्यांनी लहान मुलाचे उदाहरण दिले. लहान मुलाला खेळवणारा म्हातारा गृहस्थ रडणारे मुल बऱ्याच प्रयत्नाने हसते-फुलते करतो. त्या मुलाला आनंदी करण्यात व त्याच्या चेहेऱ्यावरचे हास्य पाहाण्यात वृद्ध स्वतःला धन्य मानतो. त्याला मुलाचे हसणे हवेय. हाच त्याचा खरा आनंद!

एक कविता डॉ. निर्मलकुमार फडकुलेंनी श्रोत्यांसमोर गद्य रूपात ऐकवली. एक तरुण जोडपे संवाद करताना म्हणते की, पंचवीस वर्षापूर्वीचा काळ अन आताचा, यात किती फरक पडलाय? पंचवीस वर्षांपूर्वीची आठवण काढताना तो तिला म्हणतो--त्यावेळची तुझी माझ्याकडे सल्लजपणे बघण्याची लकब आगळी होती. किती छान लाजायचीस त्या वेळी! तो चेहेरा, ते लाजणे, तो आनंदी भाव मला दाखव ना तुझ्या चेहेऱ्यावर? ती उत्तरते-‘ आता देखील मी हसतेय की! पण त्यावेळचे हसणे नाही जमणार मला. तो भाव कसा बरे जमेल मला? ती वेळच तशी होती. त्यावेळी तू देखील अधीर होतास मला भेटायला. दोघंही आपण तरुण होतो! एकमेकांबद्दल उत्कटता होती. पण आता पंचवीस वर्षे उलटून गेलीत. काळ गेलाय. पाणी वाहून गेलेय आता. आता तसे 'असणे', मला कसे बरे जमेल? आता तुला तरी 'त्या' नजरेने पाहाता येईल का माझ्याकडे?, त्या पंचवीस वर्षापूर्वीसारखे? ‘

नंतर भाषणात फडकुले यांनी जॉर्ज वॉशिग्टनची गोष्ट सांगितली. तीन-चार मजूर एक गाडी हाकत असतात. गाडी एका ठिकाणी अडखळते. ती नीट मार्गावर आणायला बिचाऱ्या मजुरांना कठीण जाते. आणखी एकजण मदतीला हवा असतो त्यांना. इतक्यात त्यांच्यावर देखरेख करणारा सुपरवायझर तेथे येतो. तो मजुरांना झापतो. ' आटपा लवकर ', म्हणतो. ते उत्तर देतात-' साहेब, आम्हा तिघांना हे जमणार नाही '. त्याच सुमारास एक व्यक्ती घोड्यावरून त्या ठिकाणी येते. ती व्यक्ती सगळे बघते आणि विचारते- ' तुम्हाला कसे बरे जमेल एवढे ओझे उचलणे? आणखी एकजण हवाच.' जवळ उभ्या असलेल्या सुपरवायझरला ती व्यक्ती विचारते, ' आपण का बरे यांना मदत करत नाही? पटकन गाडी रस्त्यावर येईल की! ' हे ऐकल्यावर तो सुपरवायझर वैतागतो. उसळून तो म्हणतो - ' मी कोण आहे माहीत आहे कां? मी ऑफिसर आहे त्यांचा. मी कशी काय मदत करू? तेच करतील हे काम.'

हे ऐकून वाटसरू घोड्यावरून उतरतो. सुपरवायझरला म्हणतो - ' हे बघा साहेब, ठीक आहे आपले म्हणणे. पण मग मी जर यांना मदत केली तर? तर आपली काही हरकत आहे कां? ' सुपरवायझर उत्तर देतो- ' नाही, नाही, तुम्ही यांना मदत करू शकता की.'

वाटसरू मजुरांच्या कामास हातभार लावतो. गाडी ढकलत ढकलत रस्त्यावर आणली जाते. बिचारे मजूर त्या वाटसरूचे आभार मानतात. तेव्हा वाटसरू मजुरांना म्हणतो, ' यात आभार मानण्यासारखे मी काय केलेय? तुम्हाला मी थोडी मदत केली इतकेच. मला पण यात आनंद वाटला. तुम्हाला परत माझी काही मदत लागली तर मला जरूर बोलवा. मी नदीच्या पलीकडे राहातो. तेथे माझे घर आहे. माझे नांव जॉर्ज

वॉशिंग्टन. ‘ असे म्हणून वाटसरू घोड्यावर बसून निघू लागतो. हे नांव ऐकल्यावर त्या सुपरवायझरची बोबडी वळते. शेवटी तो जॉर्ज वॉशिंग्टनची माफी मागतो.

म्हणजेच, एका मोठ्या माणसाने सर्वसामान्य माणसांना मदत करण्यात आनंद मानला. कशात भेद नाही मानला. आपणही तसेच वागूया. निराशा नेहेमीच असते आपल्या सभोवती. ती झटकून आनंद मिळवायला मोठे कष्ट करावे लागत नाहीत. तो सहजसाध्य आहे. मात्र तुमची दृष्टी तशी हवी. तुम्ही एखाद्या व्यक्तीवर श्रद्धा ठेवा. संस्थेवर ठेवा. राष्ट्रावर ठेवा, सदैव कार्यरत राहून आनंदमार्गी व्हा!

व्यावहारिक जीवन साऱ्यांचेच असते. ते नेहेमी काट्याकुट्यानी भरलेले असते. पण त्यातील फुले वेचणे आणि फुलांमधील सुगंध शोधणे, हे आनंद मिळविण्याचे मोठे साधन आहे, हे लक्षात ठेवा. व्यावहारिक जीवनात आपण समाधानी कधीच राहात नाही. आपल्या साऱ्या इच्छा केव्हाच पूर्ण होत नाहीत. पण याचा अर्थ असा नव्हे की आपण निराश व्हावे, हताश व्हावे. त्यात सुद्दा आनंद असतो, हे पाहायला शिकले पाहिजे. वेचलेल्या फुलांतून मिळणाऱ्या सुगंधाने आपण मोहित व्हायला हवेय. यापेक्षा वेगळा आनंद तो कोणता?

भारताच्या स्वातंत्र लढ्यात अनेकजण फाशी गेले आहेत. लौकिकार्थाने सारे म्हणतील की, ‘ त्यांचे जीवन बरबाद झाले. त्यांनी स्वतःचा जीव धोक्यात आणला देशासाठी, त्यापायी स्वतःला संपवले!’.

मी तसे म्हणणार नाही. ते महात्मे मेलेले नाहीत. ते खरे जगलेत. त्यांनी जगण्याचा 'खरा' आनंद उपभोगलाय.

म्हणून तुम्ही साऱ्यांनी सतत आनंदी राहा. आनंदी म्हणजे व्यावहारिक आनंदी नव्हे! उदाहरणार्थ-स्वतःला पगारवाढ मिळाली, स्वतःची पेन्शन वाढली की, वाढणारा आनंद!

जगताना वेगवेगळ्या अनुभूती घ्या. मजेत फिरत राहा. खरी दृष्टी वापरून जगा. त्याग करा दुसऱ्यासाठी. चांगले काम करीत राहा. कार्यमग्न राहा. विकृतीमध्ये न जाता 'प्रकृती'कडे जा.

आपल्या भाषणाचा समारोप करताना निर्मलकुमार फडकुले श्रोत्यांना म्हणाले, ' माणसाचा आनंद ज्ञान मिळविण्यात आहे. दुसऱ्याला हसविण्यात आहे. लहान मुलांचे रडणे थांबविण्यात आहे. फिरण्यातच नव्हे तर सुगंध घेण्यात आनंद आहे. आनंद रडण्यात सुद्दा आहे! देण्यात तो आहे. घेण्यातही आहे. खेळण्यात आहे. एवढेच नव्हे तर आनंद अभ्यासण्यातही तो आहे. मरण्यात आनंद आहे आहे, तसा संकटात असताना देखील आनंद आहे. तो प्रेमात आहेच. पण विरहातही आहे. भक्तीत आहे, गाण्यांत आहे. वाचनात आहे, अन लिहिण्यातही आहे. दुसऱ्याची सेवा करण्यांत सुद्दा आनंद आहे.'

डॉ. निर्मलकुमार फडकुलेंचे बहुमोल शब्द आपण जपून ठेवायला हवेत.

मात्र, या एका व्याखानामुळे आपल्यात काय, कोणातही बदल घडणार नाही. या व्यवहारी जगात सदैव आनंद निर्माण करण्याची उर्मी टिकणे खूप कठीण आहे. त्याऐवजी या लेखकाचे वाङ्मय आपण आपल्या संग्रही ठेवून ते वाचायला हवेय. त्याचा लाभ आपल्याला निश्चितपणे होईल आणि आपले जगणेही आनंदमयी होईल.

# मनातलं जनांत

आठवतेय १९८२ साल? आणि जानेवारी महिन्यातली १८ तारीख? याच दिवशी गिरणी कामगारांच्या संपास सुरुवात झाली. अजूनही तो मिटलेला नाही!(कायद्याच्या नजरेतून). आज या घटनेला ३६ वर्षे होऊन गेलीत. हजारो गरीब, गरजू कामगारांची पार वाताहात करून टाकली या संपाने.

मात्र या संपात तग धरणारे कामगार आणि त्यांचे परिवार अजुनही वाटचाल करीत जीवनाची रहाटगाडी ओढत, ढकलत पुढे चालले आहेत निर्धाराने. या संपाचे राजकारण करणारे काही राजकीय पक्ष आणि पुढारी त्यांच्या नितीप्रमाणे वागलेत, अन आताही वागत आहेत.

मी संपापुर्वी मिलमध्ये कामाला होतो. मलाही या संपाची झळ बसलीय. त्यावेळचे मिल मधले वातावरण कसे होते, कामगार श्रम करताना काय अनुभवित होते, दुःख-सुख कसे झेलीत होते, याविषयी येथे लिहिण्याची माझी इच्छा आहे.

## एका गिरणबांबूची गोष्ट.......

कापडाच्या मिलमधली नोकरी करण्याविषयी तितकीशी आस्था कोणी बाळगत नाही. मिलचा कामगार म्हणजे फडतूस माणूस.' गिरणीतला ना? मग तो गिरणबांबूच ', असे शेरे मी स्वतः ऐकले आहेत.

अशाच एका मिलमध्ये मी तीन वर्षे काढलीत. वडील कामगार होते बिमिंग खात्यात. येथे धाग्यांची प्रचंड बिम्स येत असत. ते धागे एका लायनीत यावेत म्हणून छोटया अणूकुचीदार तारेने काम करावे लागे. बिमचा मोठा रोल मध्ये व दोन्ही बाजूस एकेक कामगार बसत. तारा आणि धागे एकाच रेषेत ना गुंतता एका लायनीत यायला हवेत अशा पद्धतीने काम चाले. या कामासाठी नजर बारीक असावी लागते.

जेवणाचा डबा घेऊन बहुधा रोज मी मिलमध्ये जायचो. वडिलांचे दोस्त म्हणत- ' आला, विठोबाचा बाप आला जेवण घेऊन! ', हे ऐकून हसायचो. मला गंमत वाटे.

एकदा मिलमध्ये नोटीस लागली की, एप्रेन्टिस क्लार्क्स हवेत. मी अर्ज केला. मला इंटरव्ह्यूला बोलावले. इंटरव्ह्यूमध्ये मी पासही झालो. मात्र मेडिकलच्या परीक्षेत, वजन कमी म्हणून बाजूला काढले! मग धावाधाव करावी लागली. नंतर मिलचे डॉक्टर म्हणाले-' वर्षांनंतर परत मेडिकल टेस्ट घेईन.' त्यानंतर कामावर हजर झालो.

वर्षभरात मला गोडाऊन, रिंगवार्प, सोसायटी ऑफिस, अशा विविध खात्यातून फिरविले. आठवड्यातून एकदा लेक्चर्स होत. लालबागच्या ' एनटीसी ' ट्रेनिंग हाऊसमध्ये सगळे एकत्र येत असू. तेथे मजा यायची. लेक्चरपेक्षा दंगल जास्त! शिकविणारे खास नव्हते. साहजिकच नोट्स लिहून घ्याव्या लागत. तेथे मुलीही होत्या. चेष्टामस्करी करणारेही होते.

मिलमध्ये भटकायला मिळायचे. कापड खाते, फोल्डिंग, रिंगवार्प, डाइंग, वेस्ट रिकव्हरी, रेशन दुकान, वायंडिंग, अशी कितीतरी खाती पाहू लागलो. तेथल्या माणसांशी ओळखी होऊ लागल्या, त्या वाढू लागल्या.

या मिलमध्ये क्लार्क म्हणजे राजा माणूस. कामगार आम्हाला मास्तर म्हणून हाक मारत. मानाने वागवीत. मी वडिलांच्या खात्यात गेल्यावर त्यांचे दोस्त आस्थेने, कौतुकाने बोलत. खूप बरे वाटे.

मिलमध्ये कापड खाते महत्वाचे. पण त्या खात्यात उभे राहवत नसे. केवढा आवाज! खटाखट खटाखट साचे चालत. कोणी दोन साचे तर कोणी चार साचे चालवत. त्यांना नावं होती- दोनबाजुवाले, चारबाजूवाले!

वीज कपातीचे दिवस होते. तेव्हा रिंगवार्प मध्ये होतो. सर्व कामगारांना बहुधा रोज लेऑफ द्यावा लागे. म्हणजे कामावर नुसती हजेरी लावायची व घरी जायचे! काही भाग पगार मिळत असे. पण त्यासाठी हजेरी लागायची.

कामात असताना इथे काहीजणांशी ओळख झाली. जुने सहकारी गमतीशीर होते. एक शेडगे नावाचे क्लार्क होते. इमानदार माणूस. दुसरे सुमंत शिंदे. माझी त्यांची विशेष दोस्ती होती. हा हरहुन्नरी माणूस. गायक, वादक, नाटकात पण कामं करायचा.

इथे एक क्लार्क होता. नाव आठवत नाही. तो स्वभावाने थोडा कडक होता. तो तिरसटही होता. माझ्याशी मात्र हा चांगले वागे. तो जातीभेद मानायचा. याला जेव्हा पाणी लागे, चहा लागे, त्यावेळी याने सांगितल्यावर कामगार आणून देत. मात्र ठराविक जातीच्या कामगारांकडून तो हे काम करून घ्यायचा. इतरांकडून नाही.

मिलच्या कॅन्टीनची आठवणही तशीच आहे. रोज जेवणासाठी कॅन्टीनमध्ये झुंबड उडे. उसळ, शेव, बटाटेवडे चहा आणि जेवण हे पदार्थ मिळायचे आम्हाला. ते सर्व अल्प दरात मिळायचे.

कॅन्टीनमध्ये आयझेक नावाचा एक क्लार्क होता. टॉप कपड्यात राहायचा तो. पण त्याच्या तृतीयपुरुषी वागण्यामुळे पाहायला विचित्र वाटे. दम देऊन कॅन्टीनच्या माणसांकडून आयझेक कामं करून घेई. याची जीभ तेज होती. घाणेरड्या व हरतऱ्हेच्या शिव्या याला पाठ! रोज भांडणे ठरलेली. पाहणारांची मात्र करमणूक असायची. आयझेकचे चालणेही लोकनाट्यातल्या मावशीसारखे होते! त्यामुळे तो असला की कॅन्टीनमध्ये धमाल यायची.

आमच्या मिलमध्ये दसरा, गोविंदा आणि हनुमान जयंती हे सण उत्साहात साजरे व्हायचे. दसऱ्याला सुट्टी असल्याने आदल्या दिवशी गिरणी पाहायला लोकांना आत प्रवेशासाठी परवानगी होती. मिलमध्ये जत्रेतला उत्साह यायचा. त्या दिवशी सारे खाते सजवले जाई. गोंडयाची फुले, आंब्याचे टाळे, गुलाल, यांनी मिलचा परिसर फुलून जायचा. सगळेच उत्साहात वावरत. एका वर्षी मात्र त्या दिवशी चोरी झाली आणि आत सोडणे बंद झाले. दसऱ्याचा उत्साह पण मावळला.

हनुमानाचे मोठे देऊळ मिलमध्ये होते. तेथे रोज रात्री आरती व्हायची. हनुमान जयंतीला तर भाविक कामगार देऊळ छान सजवीत. मोठी पूजा-आरती करीत. दरवर्षी गोकुळाष्टमीला असाच उत्साह असायचा मिलमध्ये. दहीकाला करीत कामगार बंधू ' गोविंदा रे, गोपाळा ' करीत धमाल नाचायचे. त्यांचेवर पाणी ओतणारे पण उत्साही कामगार होते. या वातावरणामुळे सगळेच आनंदाने वावरत असत.

मिलमध्ये चुकार कामगारांचा देखील भरणा होता. त्यांची बसण्याची, विश्रांतीची जागा ठरलेली! बिल्डिंगच्या कोपऱ्यात, कॅन्टीनच्या आडोश्याला, नाहीतर संडास-मुत्रीचा कठडा! अशा ठिकाणी हे बिनधास्त विश्रांती घ्यायचे.

मी गोडाऊनमध्ये दोन महिने होतो. पण कामाला मूड लागेना. बरोबरची माणसं जास्त बोलत नव्हती. अपवाद ज्ञानेश्वर गावडे आणि एक धोतरवाले क्लार्क यांचा. पैकी गावडे नंतर नगरसेवक झाले.

आमच्या मिलमध्ये युनियन होती आर.एम.एम.एस.ची. म्हणजे राष्ट्रीय मिल मजदूर संघ. त्यांची मेजॉरिटी होती. काही कार्यकर्ते मात्र तितकेसे चांगले नव्हते. लोकं तोंडावर शिव्या घालत. मोठा संप व्हायच्या अगोदर दत्ता सामंतच्या युनियनने शिरकाव केला. कामगारांमध्ये हाणामाऱ्या झाल्याचे नेहेमी कानावर येई. या युनियनच्या गेट मिटींग्स व्हायच्या. पहिली पाळी सुटायच्या वेळेला. गेटवर पुढाऱ्यांची भाषणं ऐकायला दुसऱ्या पाळीवर येणारे, पहिल्या पाळीचे कामावरून सुटणारे, अशा साऱ्या कामगारांची गर्दी व्हायची. रस्त्यावरून जाणारे-येणारे पण जोरदार भाषणबाजी आणि युनियनच्या घोषणा ऐकायला हटकून थांबत.

मला एक वर्षाची एप्रेन्टिसशिप संपल्यावर ब्रेक मिळाला. एन.सी.टी.व्ही.टी. परीक्षेत मी नापास झालो. पास झाले त्यांना घेतले कामावर. नाराज झालो. पण काय करणार?

मिलच्या सोसायटी ऑफिसमध्ये काही महिने मला काम करायला मिळाले होते एप्रेन्टिसशिपमध्ये. त्यांचेकडे कंपनी व्यतिरिक्त बाहेरचा स्टाफ घ्यायची प्रथा होती. तेथे माझा नंबर लागला. महिन्याला पगार होता १३०/-रुपये.

या सोसायटी ऑफिसमध्ये काम करताना मजा येई. एकेक नग होते. रामभाऊ गुरव, वेलींग मास्तर,प्रधान, बुधकर, शिकारखाने, आमले इत्यादी....खरोखर ही इरसाल माणसं होती! रामभाऊ सगळ्यांचे दोस्त. छेड काढताना झाडून सारे विषय चर्चेला येत.

प्रधान पक्के बेवडे होते. रोज सकाळी त्यांना प्यायला लागे. सायंकाळी पण तेच. त्यांच्या चेहेऱ्यावर मात्र नशा दिसायची नाही! कामात ते हुशार होते. वेलींग हे वयाने सिनिअर. ते फारसे बोलत नसत. यांच्या अबोल स्वभावाने त्यांची हेटाळणी होई.

मिलच्या सोसायटी ऑफिसमध्ये असताना एका सुंदर बाईची क्लार्क म्हणून नेमणूक झाली. सोसायटीच्या वतीने कामगारांच्या मुलांना जी शैक्षणिक मदत देण्याची योजना होती. ते काम आम्ही करीत असू. त्या दिवसात काही 'रसिक' कामगार या ना त्या कारणाने बाईला पाहायला येत. ही बाई सुद्दा बोलकी होती. तीचे नाव होते निलांबरी. ती काही मराठी नाटकातून कामं करायची. तीची नंतर येथून दुसऱ्या डिपार्टमेंटला बदली झाली.

सोसायटीचे प्रमुख(सेक्रेटरी) होते तावडे मास्तर. ते थोडे विक्षिप्त स्वभावाचे होते. दर दहा पंधरा दिवसांनीं त्यांना आपल्या केबिनमधल्या टेबल, खुर्च्यांची दिशा बदलायची लहर यायची! मग जवळच्या कामगाराला बोलावं, कपाट इकडुन तिकडे हलव, टेबल-खुर्च्यांची फिरवाफिरव कर, असे प्रकार ऑफिसमध्ये चालत. हा समारंभ चालू असताना बाहेर चेष्टा मस्करीला ऊत यायचा.

सोसायटीच्या कमिटीची मासिक सभा व्हायची. आम्ही आपले काम करीत राहायचो. त्या दिवशी चहा बिस्किटे खायला मिळत असे. सोसायटी ऑफिसमध्ये असताना ओव्हरटाईम भरपूर मिळे. तेथे बॅकेसारखे काम चाले. बरीच माहिती ज्ञात होत होती. विशेष म्हणजे मोठ मोठया रक्कमेच्या बेरजा मारताना डोके दुखायचे. मात्र हळूहळू सवय झाली. आमच्यातले एक्सपर्ट्स खातेबुकातील वरच्या कोपऱ्यात पेन्सिल धरून सरक्कन खाली आणीत. झाली बेरीज!

सोसायटी होती कामगारांची. त्यांच्यातलेच कमिटी मेंबर्स. सारे काही त्यांचे. त्यात काही विक्षिप्त स्वभावाचे होते. निरक्षर देखील होते, पण जाणकार होते.

येथे असताना दुसऱ्यांदा मी नापास झालो! शेवटचा चान्स म्हणून पुन्हा परीक्षेला बसलो. यावेळी पास व्हावे लागले. कंपनीने परत इंटरव्ह्यु घेतला आणि हंगामी क्लार्क म्हणून माझी नेमणूक केली. काही महिन्यांनी प्रोबेशन ऑर्डर हाती पडली. आता मी पर्मनंट होणार होतो सहा महिन्यांनी! हे सहा महिने संपले. ऑर्डर आज येईल, उद्या येईल, अशी वाट पाहिली. हेडक्लार्कला भेटलो, तेव्हा, लवकरच ऑर्डर हाती देऊ असं ते म्हणाले.

याच दरम्यान गिरणी कामगारांचा संप होणार अशी हवा उठली. दत्ता सामंतची युनियन जोरात होती. गेटवर पुन्हा सभा व्हायला लागल्या. संघाविरुद्द आवाज उठत होता. कामगार संभ्रमात पडत होते. जाहीर सभांचा त्यांचेवर परिणाम होत होता.

१९८२ च्या जानेवारीत १८ तारखेपासून मिलचा बेमुदत संप होणार हे नक्की झाले. हा संप सुरू झाला आणि सारेच संपले. सारे कामगार कायमचे घरी बसले. माझे प्रोबेशन गेले आणि नोकरी सुद्दा!

या संपकाळात कामावर जाण्यासाठी काही जण तयार होते. त्यांच्या भेटी संघाच्या पुढाऱ्यांनी घेतल्या. त्यांना मिलमध्ये नेण्या-आणण्याची व्यवस्था केली, मिलमध्ये राहायची पण सोय केली. काही लोकं आठवडा-महिनाभर तेथे राहू लागले. मी प्रयत्न केला असता तर संधी मिळाली असती. पण नाही गेलो.

गिरणी संपाच्या दोन दिवस अगोदर एका खात्यात कामगाराचा भीषण मृत्यू घडला. मशीनची दुरुस्ती करीत असताना एक तरुण कामगार उसाच्या चिपाडासारखा यंत्रात सापडला आणि गेला! खूप वाईट घडले हे.

मिलचे कामगार बहुसंख्येने निरीक्षर. त्यामुळे साहजिकच फसविले जात. व्यसनी व कर्जबाजारूपणा होताच. दर महिन्याच्या दहा तारखेला मिळणारा पगार वीस तारखेपर्यंत खतम! मग पठाणाकडे खाते उघडून त्याच्याकडून भरमसाठ व्याजाने कर्ज घ्यावे, असे सारखे व्हायचे. सोसायटीचे कर्ज काढून देणेकरी भागवणे हे तर नित्याचेच!

१९८२ च्या गिरणी संपाने या अशिक्षित व कर्जबाजारी कामगारांचे फार हाल झाले. काहींनी गावचा रस्ता धरला, कोणी भिवंडी, आग्रीपाडा, इथल्या छोट्या मोठ्या मिल साच्यांवर कामं सुरू केली. तर काही जण फेरीवाले, वडेवाले बनलेत. माझे वडील खात्यातल्या कपातीमुळे आधीच निवृत्त झाले होते. मी संपानंतर सात आठ महिन्यांनी नोकरीस लागलो.

सध्याचे दिवस मात्र मिलचा शेवट होऊन गेल्याचे दिवस आहेत. आता ज्या ठिकाणी आठ दहा गिरण्या दिमाखात उभ्या होत्या, त्या घोडपदेव-फेरबंदर भागात म्हाडाची मोठी वसाहत उभी राहिलीय टॉवरच्या रूपात! लोअर परळ भागात तर उत्तुंग टॉवर अन रंगीबेरंगी मॉल लोकांची गर्दी खेचत आहेत.

आणखी एक विशेष सांगू? मुंबई महापालिका आणि राज्य सरकार म्हणे गिरणी कामगारांची आठवण सर्वांना (अगदी बाहेरच्या पर्यटकांनाही) राहावी म्हणून भव्य असे संग्रहालय उभारण्याची योजना साकारत आहे!

सारांशाने सांगायचे झाले तर, महाराष्ट्राचे मँचेस्टर म्हणून पूर्वी परिचित असलेल्या मुंबईतील कापड गिरण्या आता हद्दपार झाल्यात. उद्योगपतींनी बिल्डर्सच्या मदतीने इथे मॉल आणि उत्तुंग टॉवर उभारण्याचा विडा उचललाय. गिरणीमध्ये भरपूर कापडाची निर्मिती होऊन रशिया, अमेरिका, इत्यादी देशांत कापड पूर्वीप्रमाणेच निर्यात करावे, आपली मिल आधुनिक करावी, कामगारांनाही स्थिरता द्यावी, अशी इच्छा मालक वर्ग व कामगार संघटना, एवढेच काय, सरकारला, तसेच लोक प्रतिनिधींना मनापासून वाटतच नसावी...........

# वाचनछंद

मोबाईल आणि नेटवर दिवस रात्र मग्न असणारी सद्याची तरुण पिढी व जेष्ठ मंडळी पुस्तक, मासिक अथवा इतर नियतकालिकांकडे ढुंकूनही पाहात नाहीत. वाचन संस्कृती अगदी क्षीण झाल्यासारखी आता सर्वत्र स्थिती आहे.

हे 'नेट' वास्तव मान्य केले, तरी कित्येक दैनिक वृत्तपत्रे, नियकालिके आणि पुस्तकांच्या खपांचे उच्चांक नोंदविले जात आहेत. कित्येक शहरे आणि गावांतील ग्रंथालये नव्या उमेदीने वाचकांना अद्ययावत पद्धतीने वाचकांना आकर्षित करीत आहेत.

मलाही पूर्वीपासून ग्रंथालयांनी आकर्षित केलेले आहे. शालेय जीवनात माझ्या आईवडीलांनी ही ओढ मला लावलीय. हा छंद मी आजही सोडलेला नाही.

एकांतप्रिय व्यक्तीला मनशक्ती देता देता, संपूर्ण समाजाची ज्ञानकक्षा वाढविण्याचा ध्यास घेणाऱ्या या 'वाचनछंदा'विषयी माझ्या सद्भावना येथे व्यक्त करीत आहे...................

# माझी लायब्ररी

मुंबईतील घोडपदेव या कामगार वस्तीमधील एका चाळीत माझे बालपण व शिक्षण झाले. वडिल मिल कामगार होते. आई, बहिण-भावंडांसह आमचे सारे सहा जणांचे कुटुंब. त्यातले आई, बाबा व मी, असे तिघेजण वाचनप्रेमी.

जवळच असलेल्या कामगार कल्याण केंद्रातील वाचनालयामध्ये जाऊन बाबा पेपर्स वाचीत. त्यांच्याबरोबर जाता जाता मलाही वाचायची आवड निर्माण झाली. आई तेथे दुपारी शिवणकाम-भरतकाम शिकायला जायची. तीचे पण वाचनवेड वाढले.

या केंद्रात पेपरशिवाय येणारी साप्ताहिके, मासिके माझ्या वाचनात आली. चांदोबा, कुमार, आणि मुलांचे मासिक मी आतुरतेने वाचत होतो. शाळेचा अभ्यासही होताच. अकरावीपर्यंत शिकून कॉलेजमध्ये जायला लागलो. मुंबईतील प्रसिद्ध अशा रुईया कॉलेजमध्ये कला शाखेत शिकत असताना तेथल्या भव्य अशा लायब्ररीतील अभ्यासाव्यतिरिक्त पुस्तकांत मी डोकावू लागलो. कितीतरी साहित्य समोर येत होते. अधाशासारखा त्याचा आस्वाद मी घेत होतो. त्यातूनच कधीतरी आपण देखील स्वतःची लायब्ररी करावी व अखंडितपणे वाचन करावे, हे मनाशी पक्के ठरविले.

दरम्यानच्या काळात नोकरी व कॉलेजचा अभ्यास, अशी धावपळ करीत असताना प्रवासात वेळ मिळेल तेव्हा जवळचे पुस्तक वाचत असे. थोरामोठ्या

लेखक-मान्यवरांना गाठून त्यांची स्वाक्षरी घेणे हा त्या काळचा माझा आवडता छंद देखील माझे वाचनवेड वाढवीत राहिला.

त्यावेळी पुस्तक प्रदर्शन पाहून मोह व्हायचा. मग खिसा पाकीट पाहून पुस्तक खरेदी सुरू केली, अन माझ्या लायब्ररीला आकार येऊ लागला. छोट्याशा कपाटात दाटीवाटीने माझी पुस्तके दिसायला लागली. घरातले कधीमधी पुस्तके चाळताना दिसू लागले, याचा आनंद वाटला. या लायब्ररीत कोणी फुकट दिलेली पुस्तके आणि जुन्या बाजारात घेतलेली पुस्तकेसुद्धा प्रवेश करीत होती.

अर्थात, माझ्या लायब्ररीत नसलेली, तसेच येणे शक्य नसलेली बरीच गाजलेली पुस्तके मी शालेय व कॉलेजजीवनात वाचून काढलीत. स्वामी, मृत्युंजय, अमृतवेल, ययाती, अरेबियन नाईट्स, सत्तांतर, बनगरवाडी, क-हेचं पाणी, माझी जन्मठेप, श्यामची आई, रामनगरी, एक गाव एक पाणवठा, बलुतं, गारंबीचा बापू, नक्षत्रांचे देणे, जनु बांडे, ऋतू चक्र, आमचा बाप अन आम्ही, साद देती हिमशिखरे, संशयकल्लोळ,...... अशी अगणित पुस्तके वाचलेला मी भाग्यवान वाचक आहे! काहींची नावे आता नीट आठवत नसली तरी 'ती' स्मरणात आहेत.

अन लेखकांबद्दल विचाराल, तर ग.दि. मा., व्यंकटेश माडगूळकर, नां.स. इनामदार, पु.ल.देशपांडे, श्री.नां.पेंडसे, गो.नी.दांडेकर, द.मा.मिरासदार, उद्धव शेळके, साने गुरुजी, रणजित देसाई, माधव गडकरी, श्री.दा.पानवलकर, रत्नाकर मतकरी, शंकर पाटील, आचार्य अत्रे, अनिल अवचट, रामदास फुटाणे, सुरेश भट......असे कितीतरी दिग्गज माझे आवडते आहेत.

आज माझी लायब्ररी माझ्या घरामध्ये स्थानापन्न झालीय. एका कोपऱ्यात छोटेसे कपाट बनवून घेतलेय. त्यामध्ये विषयवार पुस्तके ठेवलीत. हरतऱ्हेचे विषय

असलेली ही पुस्तके एकाच ठिकाणी दाटीवाटीने पण आनंदाने नांदताहेत. कामाच्या धावपळीत, वेळ काढून मी ही पुस्तके वाचीत आलोय.

गिर्यारोहक असल्याने सह्याद्री आणि हिमालयीन भटकंती साठी उपयोगी ठरणारी पुस्तके, संदर्भ ग्रंथ, जर्नल्स जमवून ठेवलीत. नकाशे तर नेहेमी लागतात. गोनीदांचे दुर्ग भ्रमण गाथा मला केव्हाही दुर्गांवर सफर घडवून आणते. अध्यात्माच्या जवळ नेताना शास्त्राधार सांगून आपली ज्ञानतृषा भागविणारे मनशक्ती मासिक मी पूर्वी नियमित घ्यायचो. ही मासिके माझ्या संग्रही आहेत. यशवंत पाठकांचे पसायदान हे छोटेखानी पण मोठे ज्ञानदान देणारे पुस्तक मी पुन्हा पुन्हा वाचतो.

मी चित्रपट रसिकदेखील आहे. १९८३ पासून प्रभात चित्रमंडळ या सुप्रसिद्ध सिने प्रेमी संस्थेचे 'वास्तव रुपवाणी' हे मासिक(आता-त्रैमासिक) लायब्ररीमुळेच माझ्या नियमित वाचनात असते.

कवितांविषयी जवळीक असल्याने पाडगावकर, मोघे, पाटणकर, यांची कविता आणि शायरीचा लाभ मला मिळतो. राजकारणावर विडंबन करणारा रामदास फुटाणे यांचा कविता संग्रह माझ्याजवळ आहे. मी आस्तिक आणि धर्मप्रेमी असल्याने काही धार्मिक-कार्मिक पुस्तके मला लागतात. श्रद्धापुर्वक व गांभीर्याने ही पुस्तके आपण वाचली तर देव तसेच धर्माच्या निर्मळ अस्तित्वाची आपल्याला जाणीव होते, असा माझा विश्वास आहे. याशिवाय, दिवाळी अंक मला वाचायला आवडतात. काही चांगले अंक माझ्याकडे आहेत.

साऱ्या जगात प्रसिद्ध असणारी भगवद्गगीता खूपदा वाचूनही ती पूर्ण आकलन न झाल्याचे जाहीरपणे कबुल करणारे कितीतरी विद्वान असतील. माझ्या लायब्ररीत

मात्र सुलभ भगवद्गीतेचे गोष्टीस्वरुप छोटे पुस्तक वाचताना मला तिचा भावार्थ कळल्यावर, मी आनंदित होतो.

कधी मी खिन्न असलो की, कविता वाचून स्वतःला सावरतो. तर, कधी 'पु.लं.' ची आठवण आल्यावर सुहास्य होऊन मी थेट 'निवडक कालनिर्णय' हाती घेऊन त्यात पु.ल. नी लिहून ठेवलेले खुसखुशीत लेख वाचू लागतो. माझ्या संग्रहात जुन्या वर्तमानपत्रातील बरेच महत्वाचे लेख आहेत. ते पण मला नियमित नवे ज्ञान देत राहतात. दुर्गा भागवतांचे ऋतू चक्र तर दरवेळी मला काही नवे निसर्ग गुज देऊन जाते.

माझ्या लायब्ररीमध्ये फक्त थोरामोठ्यांच्या प्रसिद्ध ग्रंथ-पुस्तकांचा समावेश नाही, पण जी पुस्तके आहेत, ती माझी चांगली सोबत करून मला योग्य जीवनमार्ग दाखवीत आली आहेत.

आणखी एक, माझ्या लायब्ररीत फक्त पुस्तकेच नाहीत बरं का! कितीतरी जुन्या आणि स्मरणीय अशा मराठी, हिंदी गाण्यांच्या, तसेच शास्त्रीय संगीत-धुनीच्या एसीडीज,व्हीसीडीजदेखील आहेत.

माझ्या घरी माझी स्वतःची लायब्ररी आहे म्हणून मी केवढा भाग्यवान! असा गर्व मला नाही. कारण, साधी व काहीशी विस्कळीत मांडणीची माझी लायब्ररी आहे. मात्र ती 'जिवंत' आहे आणि ती कोणाही दर्दी वाचनप्रेमीसाठी खुली आहे.

परंतु एवढे वाचन वेड आता आहे तरी कितीजणांत? मोबाईल अन कॉम्प्युटरच्या धाव-रगाड्यात वाचन करणे म्हणजे अडाणीपणा व रिकामटेकडेपणा समजला जातोय. माझ्या लहानपणी सहाजणांच्या कुटुंबात मी, बाबा, आई घरी

लायब्ररी नसतानाही वाचनवेडे होतो. आज चारजणांच्या कुटुंबात मीच एकमेव या लायब्ररीचा लाभ घेणारा आहे, त्याचे काय?

हे शल्य उरी बाळगुन जाता जाता आनंदाने मला सांगावेसे वाटते की, या वाचनप्रेमामुळेच मी वेळोवेळी लेखनाची अनुभूती घेत आलो आहे. कधी साप्ताहिक, मासिक, दिवाळी अंकात, तर कधी वर्तमानपत्रात लेख छापुन आल्यावर होणारा निर्मितीचा आनंद मी अनुभवित आहे.

आज या लिखाणामुळेच आकाशवाणीने मला बोलण्याची तीन वेळा जी संधी दिली, त्याचे श्रेय मी माझे वाचनवेड वाढविणाऱ्या लायब्ररीलाच देईन. अर्थात, दिवसेंदिवस तीळ तीळ वाढत राहणाऱ्या माझ्या लायब्ररीतील पुस्तकांचे पूर्णपणे वाचन करणे मला या जन्मात तरी शक्य होईल असे वाटत नाही, हे शल्य माझ्या अंतर्मनी कायम राहाणार आहे.

# 💐💐चित्रपट गप्पा💐💐

चित्रपट म्हटला की आपल्या डोळ्यापुढे 'करमणूक' हा शब्द उभा राहातो. पण खरोखर चित्रपट हा फक्त आपली करमणूक करीत असतो का?

पूर्वी थिएटरमध्ये(आणि आता घरोघरी) आरामात दोन-तीन तास लोकं सिनेमा पाहात असत. या सिनेमांत तुम्ही-आम्ही गुंग होऊन जायचो. सिनेमा संपला की, आपण भानावर यायचो. याचे रहस्य काय बरे होते? तर, आपल्याला त्या सिनेमाची कधी कथा भावायची, तर कधी त्यातली अवीट गोडीची गाणी आपल्या ओठांवर कायमची घर करून राहायची. सिनेमात उत्तम काम करणारे कलावंत, त्यांच्या सौंदर्यासह भूमिकांवर मोहीत झालेले तुमच्या माझ्यासारखे कित्येक रसिक असतील!

यालाच मी चित्रपटाचा आपल्यावर पडलेला 'प्रभाव' म्हणेन. सर्वसामान्य प्रेक्षकावर चित्रपटाचा हा प्रभाव पडत असेल तर त्या रसिक प्रेक्षकाने अधिक जागरूक नजरेतून चित्रपट का पाहू नये! याकरीता रसिक-प्रेक्षकास काही पथ्ये जरूर पाळावी लागतील.

पहिले महत्वाचे पथ्य म्हणजे त्याने कोठलाही चित्रपट फक्त करमणूक म्हणून बघू नये. तो एक कलाकृती म्हणून बघावा.

ही कलाकृती पाहात असताना आपण मुख्यतः चार घटकांना भेटतो आणि अनुभवतो. ते चार घटक, किंवा चित्रपटाचे अंग म्हणा हवंतर, म्हणजे कथा, चित्रपटातली पात्रं, संगीत आणि दिग्दर्शक.

चित्रपटाची कथा काल्पनिक असो वा वास्तव, आपण ती वास्तव म्हणून बघतो. चांगली कथा आपल्याला निश्चित्तपणे खिळवुन ठेवते. कथेत कधी प्रेमावर भर असतो, तर कधी शौर्यावर.

खूप विषयांच्या कथा आपल्याला चित्रपटांतुन दिसतात. देशप्रेम, गरिबी-अमिरी या दोन्हीतला दुरावा, प्रेम, पिळवणूक, जमिनदारी, खून, बलात्कार, युद्ध, साहस, विज्ञान, अंतराळ, जादुई परीकथा, निसर्गप्रेम, पर्यावरण, पाणी, जन्म-मरण, पत्रकारिता, क्रौर्य, संगीतप्रेम, शिल्पकला, उदासी, आनंदीजीवन, तुरुंगातील कैदी, पुरुषार्थ, स्त्रीचे जगणे, भोगवृत्ती, विनोद, लहानमुलांचे विश्व, क्रीडाप्रेम,........असे कितीतरी विषय चित्रपटातून पाहायला मिळतात.

चित्रपटात कधी एकाच विषयावर भर असतो तर कधी इतर उपविषयांची एकत्र गुंफण केलेली असते. चित्रपटातील पात्रं प्रेक्षकांना चित्रपटाची सगळी कथा उलगडून सांगतात. ती नकली व कळसूत्री असली तरी तीच आपल्याला भेटतात, आपल्याशी बोलतात. त्यांचे सुख-दुःख जगणे-वावरणे.......इत्यादी आपण जवळून बघतो. त्यातुन आपले त्यांचे नाते होते.

चित्रपटातील पात्रांत कित्येक देशी-विदेशी, विलक्षण अभिनय सामर्थ्य असलेले भूमिका करतात. तरुण, वृद्ध, बालक, माता-भगिनी, सौंदर्यवती, कृरकर्मी, यांच्या रूपात ते आपल्याला भेटतात. चित्रपट तारणे अथवा पाडणे त्यांच्याच हाती असते.

सिनेमा निर्माण करून तो आपल्यापुढे आणण्याचे सारे श्रेय हे निर्मात्याचे असते. परंतु आपल्यासमोर सर्व पात्रं बोलकी करून ती कथेसह सादर करणारा कलाकार असतो चित्रपटाचा दिग्दर्शक. चांगला सिनेमा पाहून प्रेक्षक प्रभावित झाले, तर त्याचे सगळे श्रेय प्रथम दिग्दर्शकाकडे जाते. मात्र चित्रपट पडला, तर साऱ्या अपयशाला जबाबदार असतो दिग्दर्शकच!

आपल्या भारतात आणि जगभरात यशस्वी-अयशस्वी कितीतरी दिग्दर्शक होऊन गेलेले आहेत, आजही आहेत.

जवळपास प्रत्येक सिनेमात संगीत असते. संगीताचा वापर सिनेमातुन करणे दिग्दर्शकांना आवश्यक वाटते. या संगीतामध्ये दोन कप्पे असतात-एक म्हणजे सिनेमात सातत्याने आपण ऐकतो ते पार्श्वसंगीत(सुरावट, धून, गंभीर किंवा गंमतीदार प्रसंगी आपण ऐकतो ते संगीतातले तुकडे), दुसरे म्हणजे सिनेमातील गाणी. या गाण्यांविषयी खूप काही लिहिण्यासारखे आहे. येथे आपण सिनेमा पाहाणे या विषयी बोलत असल्याने संगीताचा विस्तार नको. मात्र संक्षिप्तपणे सांगायला हवेच.

सिनेमातील सर्वच संगीत आपल्याला श्रवण करावे लागते. अवीट गोडीची गाणी तर आपण हृदयाच्या कप्प्यात ठेवतो. ती आपण गातो गुणगुणतोही, मग ती

गाणी नायक-नायिकेने दुःखात गायलेली असोत की सुखात! उडती गाणीही आपल्याला प्रिय होतात. ही सारी गाणी गाणाऱ्या आपल्या खऱ्या गायक-गायिकेचे काय? तो तर आपल्याशी स्वरगुंजन करीत असतो.

तर, ही झाली सिनेमातील चार महत्वाची अंग. आता या चारजणांच्या संगतीत सिनेमा एकाग्रता आणि सलगतेने पाहाण्यासाठी योग्य जागा म्हणजे सिनेमाचे चांगले थिएटर हे लक्षात ठेवा. घरामधील टि. व्ही. अथवा व्हिडिओ आपल्याला ही एकाग्रता देऊ शकणार नाही.

प्रत्येक सिनेमा एक कलाकृती म्हणून पाहिल्यानंतर त्याच्या वर सांगितलेल्या चार अंगांविषयी आपले प्रामाणिक मत ठरेल ते त्या सिनेमाचे खरे-खुरे परीक्षण समजावे.

या ठिकाणी तुम्हाला सांगतो की, तुम्ही केलेले सिनेमाचे परीक्षण आणि अभ्यासू चित्रपट समिक्षकाचे परिक्षण यात जरूर फरक असेल. पण त्याची धास्ती नको. कारण त्या समीक्षकाची नजर असंख्य सिनेमांच्या अभ्यासपूर्ण निरीक्षणानंतर तयार झालेली नजर आहे, तर तुमची-माझी नजर आहे जाणत्या रसिक प्रेक्षकाची.

महाराष्ट्रात माझ्या माहितीप्रमाणे सगळ्यांत जुन्या असलेल्या 'प्रभात' चित्र मंडळाचा मी जेव्हा सदस्यही नव्हतो, तेव्हा कॉलेजात बोअर वाटणाऱ्या लेक्चर्सना

बुट्टी मारून मी इतर मित्रांसह मॅटीनी शोजला जायचो! त्यावेळी पाहिलेल्या आणि लक्षात राहिलेल्या सिनेमांमध्ये-गाईड, आँखे, जॉनी वॉँकर(हे सिनेमाचे नाव), कागजके फुल, कोहरा, असे कितीतरी आहेत.

तत्पूर्वी शालेय जीवनात पाहिलेले सिनेमा देखील माझ्या अजून लक्षात आहेत. ते म्हणजे-उजाला, मेरा साया, असली नकली, पत्थर के सनम, नागीन, ताजमहल, दादीमाँ,कानून, साहब बीबी और गुलाम, चायना टाऊन, नया दौर, प्यासा, वक्त, दो रास्ते, आराधना,अमरप्रेम, अन्नपूर्णा, मोलकरीण, सांगते ऐका, केला इशारा जाता जाता, एक गाव बारा भानगडी, सोंगाड्या, मुंबईचा जावई, सतीचं वाण, वारणेचा वाघ, पांच नाजूक बोटं, एक दोन तीन, वैभव, वैशाख वणवा, बीस साल बाद, शांतता कोर्ट चालू आहे, संत तुकाराम, श्यामची आई, माणूस, शेजारी, संत सखू ...,अशी किती नावं सांगावीत?

प्रभात चित्र मंडळाचा सदस्य झाल्यावर मात्र मी माझ्या 'शोधक' नजरेने सिनेमा पाहू लागलो. पूर्वी बघितलेले सिनेमे मला पून्हा पाहायला मिळाले. आता ते मला वेगळे भासू लागले. काही अधिक भावले, तर काहींना अगोदर एवढे चांगले ठरवल्याची खंतही वाटली!

प्रभात मार्फत देशी-विदेशी कलात्मक आणि गाजलेले तसेच दुर्मिळ चित्रपट दाखविले जात. विदेशी चित्रपट पाहाताना भाषेची अडचण येई. मात्र बहुतेकवेळा इंग्रजी सबटायटल्स वाचायला मिळाल्याने समजणे सोपे होई. आजघडीला मी पाहिलेल्या चित्रपटांची यादी मोठी नसली तरी ती छोटीही नाही.

तुम्हीसुद्धा खूप सिनेमे पाहिलेले असतील नाही का? मग तुम्हीही रसिक प्रेक्षक आहात असे मी म्हणेन. तर रसिकहो, मी पाहिलेल्या आणि जाणलेल्या सिनेमांचे 'सार' सांगायचे म्हटले तर एवढेच सांगेन की, जागतिक सिनेमात मला इटली, जपान, जर्मन, झेक, स्पेन, अमेरिका, स्विडन,......या देशांचे चित्रपट आवडतात. थेट आणि वेधक चित्रण,किरकोळ वाटणारा विषयदेखील मोठा करून रंजक बनविलेली कथा, अस्सल छायाचित्रण, प्रारंभीची आगळी विक्षिप्त वाटणारी संगीत सुरावट, बिनधास्त परंतु प्रामाणिक अभिनय करणारे कलावंत,आणि हे सगळे आटोपशीर वेळेमध्ये सादर करणारा कसबी दिग्दर्शक मला तरी श्रेष्ट वाटतो. इन्ड बर्गमन, स्पिलबर्ग, कुरुसावा, बर्तालू, डिसिका, चाप्लिन,.....हे त्यातले काही जेष्ठ अन श्रेष्ठ कलाकर्मी!

काही चांगले अपवादात्मक चित्रपट सोडले, तर रशिया, चीन, सिलोन,.....या देशाच्या चित्रपटांनी मला बोअर केलेय. इझ्राईल, ब्राझिल, आफ्रिका, नेदरलँड, इराण, तुर्कस्तान,.....या देशांच्या काही विलक्षण चित्रपटांनी मी प्रभावीतही झालोय.

आपल्या भारतीय चित्रपटांबाबत मी आनंदी आहे. स्वर्गीय व्ही. शांताराम, सत्यजित रॉय, विमल रॉय, दादासाहेब फाळके, राजकपूर, विजय तेंडुलकर, गोविंद निहलानी, राम गबाले, राजा परांजपे, बी.आर. चोप्रा,.....इत्यादीं चित्रमहर्षींनी हिंदी-मराठी सिनेमासृष्टी गाजवलेली आहे.

आणि, बासू चटर्जी, ऋतुपुर्ण घोष, बासू भट्टाचार्य, गिरीश कर्नाड, गोविंद निहलानी, अडुर गोपालकृष्णन. जब्बार पटेल, राजदत्त, शाम बेनेगल, दीपा मेहता,

अमोल पालेकर, कांचन नायक, आशुतोष गोवारीकर, सत्यदेव दुबे, तपन सिन्हा, मृणाल सेन, ऋत्विक घटक, गिरीश कासारवल्ली,......या दिग्गजांचे दिग्दर्शन मला कसे विसरता येईल?

रसिकहो, आपण प्रत्येक सिनेमा पाहाताना तो फक्त करमणूक म्हणून नव्हे, तर एक कलाकृती म्हणून पाहावा या हेतूने मी तुमच्याशी या चित्रपट गप्पा मारल्यात, यामुळे तुम्हा रसिकांचे चित्रपट प्रेम अधिक जागरूक व अभ्यासु व्हावे, हीच या क्षणी इच्छा आहे.

" **येस, लाईफ इज ब्युटीफुल, बट**........" हे पुस्तकाचे नाव ऑस्कर विजेत्या "Life is Beautiful" या विदेशी चित्रपटापासुन मी घेतलंय. ‘प्रभात’ संस्थेमुळे हा चित्रपट मला बघण्याची संधी मिळाली. या चित्रपटाविषयी माझे प्रेक्षकीय निरीक्षण मी तुम्हाला इथे सांगत आहे……..

## लाईफ इज ब्युटीफुल

*दिग्दर्शन व प्रमुख भूमिका-रॉबर्ट बेनिग्नी.

*३ ऑस्कर व अकॅडमी पुरस्कार प्राप्त इटालियन फिल्म-१९९७.

एका सत्य घटनेवर आधारित असलेल्या या चित्रपटाची कथा थोडक्यात अशी आहे--

महायुद्धात झळ बसलेलं एक हतबल कुटुंब. यात युद्ध कैदी खूप आहेत. त्यांच्यासमवेत इतरही असंख्य कुटुंब आहेत. तेथल्या छळाची ही दुर्दैवी कथा आहे.

जेलमधील महिला आणि पुरुषांना वेगळे ठेवले जाते. चित्रपटाचा नायक आनंदी चेहेऱ्याचा एक तरुण कैदी आहे. त्याला गोजिरवाणा आठ-दहा वर्षाचा एक मुलगा आहे. या लहान मुलाला आईकडे ठेवायचे? की बापाकडे? असा प्रश्न लष्करी अधिकाऱ्यांना पडलाय! बिचारं भाबडं पोरगं जेल बघून गोंधळून गेलंय. जेलचे अधिकारी त्या मुलाला वडिलांकडे सोपवायचे ठरवतात. पोरगं आईपासून वेगळे होताना आकांडतांडव करतं. आई अधिकाऱ्यांकडे विनवणी करते, पण उपयोग होत नाही.

इतर कैद्यांबरोबर आई-वडील वेगवेगळ्या बराकित रवाना होतात. तेथले अवघड जीवन सुरू होतं. मुलाचा बाप जेलमध्ये विविध चौकश्यांना सामोरा जात आहे. दरवेळी त्याच्या जवळ त्याचा मुलगा असतो. अधिकारी चौकशी करताना बापाला मारपिट करतात. हे पाहून पोरगं हवालदिल होतं. हे काय चाललंय? ते पोरगं बापाकडे आणि त्या मारणाऱ्या अधिकाऱ्यांकडे पाहतंय. अधिकारी निर्दयी आहेत. बाप मात्र चतुर आहे! तो विनोदी चेहेरा करून मुलाला म्हणतो- अरे, हे काही विशेष नाही बरं, हा आमचा एक खेळ आहे. मजा येतेय या खेळात मला. भाबडं पोरगं हसून बापाला दाद देतं!

जेलमधील ही छळ कहाणी काही संपत नाही. बाप अंगावर मार सोसत आपल्या पोराला रिजवत जगतही असतो. तिकडे आई मुलाला बघायला आतुर झालीय. पण दोघे मायलेक जवळ येऊ शकत नाहीत.

जेल अधिकाऱ्यांच्या चौकशी अंती लहान मुलांचा बाप दोषी ठरतो. त्याला गोळी घालून ठार मारण्याची शिक्षा जाहीर होते. गोळी घालणारे अधिकारी सज्ज होतात. ते दृश्य पाहताना प्रेक्षकांच्या डोळ्यात आसवं दाटतात. मुलाचा बाप मात्र अतिशय आनंदात आहे! तो मुलाला सांगतोय-‘ अरे, हा सुद्दा एक चांगला मॅजिक गेम आहे. आता मी समोरच्या बॉक्स मागे लपणार आहे, मग मी कोणालाच दिसणार नाही, तुलाही नाही. बायबाय बेटा, बाय……. ‘

या चित्रपटाची ही दुःखद कहाणी शेवट मात्र सुंदर करते. चित्रपटातील अखेरच्या दृश्यात लहान मूलगा मोठा झालाय. तो आपल्या हसतमुख बापासारखा आनंदी आयुष्याला सामोरे जायला हाती फुले घेऊन सज्ज झालाय!

# लक्ष वेधी

आरोग्याची काळजी कशी घ्यावी, आपला रोजचा आहार कसा असावा, आणि रोग-व्याधी, आजारात आपण कोणती खबरदारी कशी घ्यावी, याचे साध्या सोप्या शब्दांत 'लोकसत्ता' या मराठी वृत्तपत्रात विवेचनात्मक लेखन करणारे व महाराष्ट्रात सुपरिचित असलेले पुण्याचे वैद्य खडीवाले आज हयात नाहीत. गेल्या डिसेंबर महिन्यात पुणे येथील कर्मभूमीत त्यांचे दुःखद निधन झाले.

‘लोकसत्ता’ या जाणत्या वृत्तपत्रात त्यांचे प्रसिद्ध झालेले लेख माझ्यासारख्या कित्येकांना उपयोगी ठरलेत. त्यांनी लिहिलेली आहार, आरोग्य व आयुर्वेदिक औषधाविषयीची पुस्तके माहितीपूर्ण असून ती प्रसिद्ध आहेत.

या थोर व्यक्तीचे स्मरण म्हणून हा लेख लिहिला आहे..........

## कडक शिस्तीचे डॉक्टर, वैदय खडीवाले

वैदय खडीवालेंकडून मी उपचार करून घेत होतो त्यावेळची गोष्ट. त्यांचे सगळे पेशंट्स त्यांना वैदय नव्हे तर डॉक्टर म्हणत असत. म्हणून मी याठिकाणी त्यांचा डॉक्टर म्हणून उल्लेख करतोय.

मला प्रोस्टेट ग्रंथींचा त्रास सुरू झालेला होता. त्यामुळे मूत्रमार्गात अडथळे वाढत होते. पूर्वी एक शस्त्रक्रिया जे. जे. हॉस्पिटलमध्ये झाली होती. आता पुन्हा शस्त्रक्रिया करायचा प्रसंग माझे ताण वाढविणारा होता. म्हणून मी ठरविले, की आपण खडीवालेंशी संपर्क साधायचा व त्यांचे कडून उपचार करून घ्यायचे.

पुण्यात डॉक्टरांचा मोठा दवाखाना असल्याची माहिती मला मिळाली. पुण्यातील एका मित्राने दवाखान्याचा पत्ता व फोन नंबर मिळवून दिला होता. तेथे प्रत्यक्ष जाण्यापूर्वी फोन केला, तर फोनवर डॉक्टर स्वतः भेटले! ते म्हणाले, ' मी रविवारी, सोमवारी मुंबईत असतो. दादरला माधववाडीत माझा दवाखाना आहे, तेथे या तुम्ही.'

दादर पूर्वेकडील स्टेशनच्या जवळ माधववाडीची मोठी निवासी वसाहत आहे. तीच्या आतील बाजूस गल्लीमध्ये कोपऱ्यात एक छोटेखानी दवाखाना आहे. साऱ्या मुंबईमध्ये तो दवाखाना प्रसिद्ध होता. इथे लांबूनलांबून गरजू पेशंट्स यायचे. त्यांत गरीब, श्रीमंत, साक्षर-निरक्षर असे सारे पेशंट्स होते. हिंदीतला प्रसिद्ध नट प्रेमचोप्रा सुद्दा तेथे यायचा. याशिवाय, काही डॉक्टरदेखील त्या दवाखान्यात उपचाराला आलेले मी बघितलेत.

खडीवालेंच्या दवाखान्यात दीडदोन तास सहज जायचे. दवाखान्याबाहेर आणि आतमध्ये मोठी रांग असायची. मात्र सगळे शिस्तीत व शांततेत रांग लावायचे. पेशंटचा नंबर आल्यावर डॉक्टर पेशंटकडे त्याचा आजार, सध्यस्थिती याची माहिती घेत. अगोदरचे रिपोर्ट्स आणि औषधे बघत.

डॉक्टर खडीवाले क्षणभर पेशंटचे निरीक्षण करीत, त्यानंतर ते सगळी कागदपत्रे, औषधे बाजूस ठेवायचे. पेशंटवर उपचार सुरू करण्यापूर्वी ते त्याला सक्त सूचना द्यायचे – ‘ मी सांगितलेली सगळी पथ्ये तुम्ही व्यवस्थित पाळायला हवीत. मी सांगितलेल्या दिवशी इथे यायला हवे. तरच मी उपचार सुरू करेन.’ त्यांची औषधे म्हणजे आयुर्वेदिक गोळया, पावडर, आणि रस-काढा-पूड.

आयुर्वेदिक उपचारामध्ये पथ्यपाण्याला जास्त महत्व असते. ही उपचार पद्धती पेशंटला प्रभावी उपचार देते. लवकर बरीही करते, पण त्याने नीटपणे पथ्य पाळल्यानंतर! व्यवस्थित उपचारानंतर पेशंट बरा होतो, हे सत्य आहे. याची खात्री त्यांच्या दवाखान्यात येणारे पेशंट्स देत होते.

खडीवाले डॉक्टरांचा दवाखाना साधा होता. पण तेथे सतत गर्दी असायची. त्यांच्या दवाखान्याची वेळ सगळेच पाळायचे. त्यामुळे त्याठिकाणी गोंधळ-गडबड मी कधीच पाह्यली नाही.

मी त्यांच्याकडे उपचारासाठी जाऊ लागलो. पहिल्यावेळी त्यांना पाहिले. डॉक्टर वयोवृद्द होते. त्यांची साधी कृश पण काटक अशी मूर्ती, फारशी गडबड न करता कोणाची मदत न घेता काम करायची पद्धत मला वेगळी वाटली.

पांढरा शुभ्र लेंगा आणि सदरा घातलेल्या डॉक्टरांचा स्वभाव काहीसा रागीट होता. मात्र ते मिश्किलदेखील होते. याची झलक मला वेळोवेळी दवाखान्यात बघायला मिळाली. तेथे काही असे पेशंट्स यायचे की, जे डॉक्टरांकडुन औषधे न्यायचे, पण ती औषधे घेताना हयगय करायचे. वर पुढच्या वेळी आल्यावर डॉक्टरांकडे तक्रार करायचे, ' डॉक्टर, अहो तुम्ही दिलेले औषध लागू पडत नाही हो. तब्येत आहे तशीच आहे…….' अशा वेळी उलट तपासणी झाल्यावर डॉक्टरांच्या

लक्षात यायचे की, हा पेशंट काही आपण सांगितल्याप्रमाणे औषध घेत नाही. आपल्या सूचनाही नीट पाळत नाही.

अशा पेशंट्सची कुठलीही भीडभाड न करता डॉक्टर त्याला तासायचे, मग तो पेशंट बाईमाणुस असो की आणखी कोणी! काही जण तर त्यांच्या दटावण्यामुळे रडलेले मी पाहिलेत! डॉक्टर स्पष्टच सांगायचे, ‘ येता कशाला इथे माझ्याकडे? मी नाही तुमच्यासाठी बसलोय इथं. मला तुमचे पैसेपण नकोत. मी सांगतो ते तुम्ही का ऐकत नाही सांगा ना? माझ्या सूचना पाळायला जमत नसेल ना तुम्हाला, तर मग इथून पुढे येऊ नका दवाखान्यात. चालायला लागा.’ डॉक्टरांचा हा अविर्भाव पाहून सगळेच हबकून जायचे! ‘ ही चांगली औषधं मी या दुसऱ्या पेशंटना द्यायला बसलोय. हे तरी बरे होतील की. ते ऐकतात माझं, वागतात तसे..........’

दरवेळी कोणी ना कोणी पेशंट डॉक्टरांचे फटके खाई. ते दृश्य पाहताना वाईट वाटे. त्या पेशंटचा दीनवाणा चेहरा पाहवत नसे. खडीवाले डॉक्टर मात्र कधी पाझरत नव्हते.

निरोगी प्रकृतीबाबत डॉक्टरांचे सगळ्यांना सांगणे असायचे, ' तुम्ही मीठ खाऊ नका, भात खाऊ नका, चहा सोडून द्या, ऐदी-आळशी राहू नका. व्यायाम-हालचाल सुरू ठेवा. आपल्या शरीराची झीज काम करून झाली पाहिजे. मेद वाढवून नको. तुम्ही मांसाहार नका करू. ते माणसाचं अन्न नव्हे. पशु-पक्षांचा आहार आहे. तुम्ही शाकाहारच करा. त्यामुळे चांगले ठणठणीत राहाल. जास्त जगाल…....'

खडीवालेंच्या दवाखान्यात येणाऱ्या काही पेशंटना मिळालेले खरमरीत 'डोस' इथे मुद्दाम सांगायला हवेत, कारण तेथे येणाऱ्या माझ्यासारख्या पेशन्ट्सना त्यामुळे चांगली शिकवण मिळालीय.

एकदा माझ्या रांगेत पुढे दोन महिला उभ्या होत्या. चांगल्या सुशिक्षित दिसत होत्या. त्यातली एक सासू होती. दुसरी सून होती. सासूबाईंना उपचारासाठी सुनेने दवाखान्यात आणले होते.

त्यांचा नंबर आल्यावर सुनेने सासूबाईंच्या दुखण्या-खुपण्याविषयी डॉक्टरांना सांगितले. सुनेची कैफियत ऐकून घेतल्यावर डॉक्टरांनी सासुबाईंची चांगलीच खरडपट्टी काढली.

ते म्हणाले, ' हीला माझी औषधं काय करायचीत? ही अशीच बरी होईल.

घरात हीला तू कामाला लाव चांगली. भांडी घासायला लाव. वजन कमी होईल हीचे.

घरातली लादी पण साफ करून घे तीच्याकडून.......'

हे ऐकणारे आम्ही सगळे खोखो हसत होतो(पण दबक्या आवाजात)! डॉक्टरांचे बोलणे झाल्यावर बिचाऱ्या सासूबाई ओशाळवाण्या चेहेऱ्याने त्यांना म्हणाल्या, ' डॉक्टर, मी करते हो घरातली कामं....' सून पण म्हणाली,' सासूबाई घरात बसून नाही राहात हो, कामं घरात करतात त्या.'

त्यावर डॉक्टर ताडकन सुनेला बोलले, ' कशावरून खरे बोलतेस तू? तीची बाजू नको घेऊस. मग एवढी जाड कशी झाली ही? ‘ त्यावर दोघींचा आवाजच बंद झाला!

नंतर डॉक्टरांनी त्यांना औषधं दिली आणि सासूला शांत सुरात म्हणाले, ' ही औषधं मी सांगितल्याप्रमाणे घे. या पुड्यांवर काय लिहिलंय ते नीट वाच. उद्यापासून

चांगली कामाला लाग. शेजार-पाजारी जाऊन कामं कर. त्यांचे कपडेलत्ते धुतलेस तर बारीक होशील तू. तुझे वजन कमी झालेले दिसले पाहिजे मला पुढच्या वेळी येशील तेव्हा, काय? ' बिचाऱ्या सासू-सुना नम्रपणे डॉक्टरांचे म्हणणे ऐकत होत्या. त्यांनी औषधे घेतली आणि पुन्हा येण्याचे सांगून निघूनही गेल्या.

डॉक्टरांची अजून एक आठवण सांगतो. एक मध्यम वयाची सुशिक्षित बाई एकदा दवाखान्याच्या दारात बाहेरील बाजूला कोपऱ्यात बराच वेळ उभी राहिली होती. हळूच मुसमुसत रडताना रांगेतले पेशन्ट्स बघत होते. डॉक्टर मात्र ढिम्म तीच्याकडे बघत नव्हते!

या साऱ्याचे आम्हाला कोडे पडले होते. माझा नंबर जवळ आला होता. इतक्यात ती बाई डॉक्टरांजवळ आली आणि काकुळतीने त्यांना म्हणाली- ' डॉक्टर, आता मी सगळी औषधं व्यवस्थित घेईन. सगळे पथ्य नीट पाळेन. पण आता मला औषधं ध्या तुम्ही, प्लिज,....'

तीचा तो स्वर ऐकल्यावर वाईट वाटले. परंतु डॉक्टर तीच्याकडे रागावूनच बघत होते. त्यांनी तीला विचारले, ' अगं, तू अजून इथेच थांबलीस कशाला? सांगितलं ना तुला परत येऊ नकोस माझ्याकडे म्हणून?....' त्यावर त्या बाईने चक्क हात जोडत डॉक्टरांची क्षमा मागीतली! पुन्हा त्यांना विनवणी केली. डॉक्टर काहीच बोलले नाहीत. ते गप्प राहून जवळच्या पेशंटला औषधं देत राहिले. ती बाईही तेथून हलेना! मग काही वेळाने डॉक्टर तीला म्हणाले- ' ए बाई, जा, रांगेत जा. शेवटचा पेशंट झाल्यावर मी तुला औषध देईन......' या एकाच वाक्याने बाईला(आणि आम्हालाही) धीर मिळाला! ती बाई रडणे विसरून आनंदाने रांगेत जाऊन उभी राह्यली.

खडीवाले डॉक्टरांच्या दवाखान्यात एका ठिकाणी त्यांनी लिहिलेली पुस्तके विक्रीसाठी ठेवलेली होती. अगदी माफक किमतीतली ही पुस्तके काही पेशंट्स विकत घ्यायचे. पुण्यात डॉक्टरांचा औषध संशोधन व उत्पादनाचा छोटा कारखाना होता. गरीब-गरजू कामगार, महिलांना त्यांनी या उपक्रमातून रोजगार दिला होता.

या थोर धन्वंतरीकडे मी तीनचार महिने उपचार घेत होतो. मात्र त्यांनी सांगितलेल्या काही सूचना मला नीट पाळता आल्या नाहीत. माझा सवयीचा चहा काही बंद होईना. मांसाहार मला सोडवेना. तातडीचे उपचार म्हणू सुरू केलेली एलोपॅथीची औषधेपण मी बंद करू शकत नव्हतो.

काय करायचे? माझी परिस्थिती बिकट झाली होती. मग मी हॉस्पिटलमध्ये दाखल झालो आणि सरळ शस्त्रक्रिया करून उपचार करून घेतले.

त्यावेळी, जरी मी या खडीवाले डॉक्टरांकडुन उपचार करून घेणे बंद केले असले तरी, माझ्या आरोग्यदायी जीवनासाठी त्यांनी मला (आणि इतरांनाही) उपचाराच्यावेळी दिलेल्या बहुमोल सूचना मी जमेल तशा पाळीत आलोय. डॉक्टरांची मी घेतलेली पुस्तके देखील नेहेमी मला उपयोगी ठरत आहेत.

अशा या जाणकार वैदय खडीवाले डॉक्टरांचा मी सदैव ऋणी आहे.

त्यांना माझी मनापासून श्रद्धांजली.......

# कथाघर

या कथाघरात प्रवेश करताना आचार्य प्रल्हाद केशव अत्रे या प्रसिद्ध लेखक, पत्रकार, नाटककाराची आठवण होते.

आचार्य अत्रे माझ्या आवडत्या लेखकांपैकी एक आहेत. कॉलेजात असताना त्यांच्या ‘क-हेचं पाणी’ या गाजलेल्या आत्मचरित्राने भारून टाकले होते. आयुष्यातल्या उलाढालीवर त्यांनी लिहिलेले 'मी कसा झालो', हे एक वेधक पुस्तक आहे. अत्र्यांची कितीतरी नाटकं अजूनही रंगभूमी गाजवताहेत. त्यांचे कथासंग्रह देखील वाचकप्रिय आहेत. त्यांनी निर्मिलेला व सानेगुरुजींच्या आयुष्यावर चित्रित झालेला ' श्यामची आई ' हा मराठी चित्रपट राष्ट्रीय पारितोषिक विजेता ठरलाय.

त्यांची 'चांगुणा' कादंबरी प्रसिद्ध आहे. ती सत्यावर आधारित आहे. प्रतिकुल परिस्थितीशी सामना देणाऱ्या यशोदेची कथा वाचकाला अंतर्मुख करते.

त्या पुस्तकाच्या प्रारंभी अत्रे म्हणतात '.....आजकालचे आम्ही लेखक स्वतःला वास्तववादी म्हणवतो खरे, पण जीवनातली खरीखुरी वास्तवता चितारण्याची हिम्मत आहे कां आमच्या अंगात?.........खऱ्या चांगुणेच्या जीवनाची कहाणी अजून संपलेली नाही. ती कशी संपेल याची कल्पनाही करण्याची शक्ती माझ्या प्रतिभेत नाही. छे छे, जीवन फार भयंकर आहे. ते आपणाला समजत नाही. म्हणुनच आपण जगतो आहोत......'

कथा कादंबरीमध्ये वास्तवता हवी, हे आचार्य अत्रे यांचे योग्य मत लक्षात ठेवून मी आपणापुढे एक कथा सादर करतोय.........

## 💐तारीख पे तारीख💐

दामले आता कोर्टात बसून कंटाळले. ‘कितीवेळ वाट बघायची शेट्टी वकिलाची? दरवेळी हा आपल्यानंतर तासाभरानी येणार. मग पुढचे सगळे सोपस्कार पुरे व्हायला आणखी एक तास!’

' रविकांत दामले.....', जोरदार आवाज दिला कोर्टाच्या क्लार्कने! दामले हडबडून उभे राहिले.

त्यांनी हात वर करून ' मी हजर आहे....' असा इशारा क्लार्कला दिला.

क्लार्कने विचारले, ' आपण फिर्यादी कां? ‘

' हो हो ', दामले तत्परतेने म्हणाले.

त्यावर क्लार्कने त्यांना प्रश्न केला, ‘ वकील आलेत का तुमचे? ‘

दामले चटकन म्हणाले, ' नाही आलेत अजून. पण ते निघालेत इकडे यायला. अंधेरी कोर्टातून इथे येतील ते....'

जज्ज मॅडम दामलेंकडे पाहून हसल्या. ' ठीक आहे. ही केस नंतर रिकॉल करा'.

क्लार्कला त्यांनी तसे निर्देश दिले. दामले आता निर्धास्त झाले.

कोर्टातनं काही वेळ बाहेर जायला आता हरकत नव्हती. दामले गॅलरीत आले.

कोर्टाची गॅलरी ऐसपैस आहे. तुरळक माणसं येजा करीत होती.

युनिफॉर्म मधले पोलीस, पट्टेवाले शिपाई, चपराशी इथुन तेथे जात येत होते.

गॅलरीच्या टोकाशी काचेचा मोठा दरवाजा होता. त्या पुढे जीने.

तेथेही छोटी गॅलरी होती. तेथे कोणी नव्हते. दामले निवांतपणे गॅलरीत उभे राहिले.

कोर्टाच्या इमारतीखाली रस्त्याच्या कडेला एक मोठी पोलीस व्हॅन उभी होती.

व्हॅनजवळ बारा पंधरा युनिफॉर्म मधले शस्त्रधारी पोलीस! दामले चक्रावले!

पण हे तर कोर्ट आहे. येथे पोलीस-आरोपींची वर्दळ असतेच.  मग गाड्याही असणार ना त्यांच्या? दामलेंनी स्वतःला समजावले.

तेवढ्यात कोर्टाचा एक वयस्कर चपराशी तेथे येऊन उभा राह्यला. तो खाली पाहू लागला. मग त्याने दामलेंकडे हसत बघितले.

तो म्हणाला,' आज मोठा आरोपी आलाय आपल्या कोर्टात! '

‘ कोण आरोपी?' दामलेनी त्या चपराश्याला विचारले.

‘ वेलची गँगचा बाप्पा पुजारी.' 'काय म्हणता काय?, बाप्पा पुजारी? '

दामलेंच्या भुवया उंचावल्या! दामलेंच्या नजरेपुढे क्षणात त्या दादाचे साम्राज्य उभे राह्यले. मुंबईतल्या बिल्डर्स अन डेव्हलपर्सकडून वारेमाप  खंडणी वसूल करणारा हा कोट्याधीश, नव्हे अब्जाधीश दादा आज इथे आलाय?

तो चपराशी पुढे बोलू लागला....' आता बाप्पा पुजारी येरवडा जेलमध्ये असतो. इथं अजून एक मोठी व्हॅन आलीय पोलीसांची. ती पलीकडच्या बाजूला उभी राह्यलीय.'

‘ हां, बरोबर, म्हणून तर एव्हढा फौज फाटा....', दामलेंनी आपली प्रतिक्रिया दिली.

अहो, आज कोर्टात तारीख आहे नां त्याची. तिसऱ्या माळयावर सकाळीच येऊन बसलाय तो.’

पुन्हा दामलेंसमोर त्या दादाची धारदार नजर उभी राह्यली. भेदक डोळे, रागीट चेहरा. कमी ऊंची असूनही दमदार पावलं टाकीत शहरभर वावरून दहशत गाजवणारा बाप्पा पुजारी अगदी नावाजलेला दादा होता. मात्र हा दादा लोकांना आवडायचा. कोणाला काय मदत लागली, पैसे लागले की लगेच मदतीला पुढे व्हायचा. लोकांची कोणती कामं अडकली की दादाची माणसं तत्परतेनं तेथे हजर असायची! जातीनं ती प्रश्न सोडवायची. त्याच्या एरियात तर सगळया लोकांचा हा भाई! गरीब, श्रीमंत, छोटे मोठे दुकानदार, गरजू आया-बाया बिनधास्तपणे दादा राहात असलेल्या बिल्डिंगमध्ये जायच्या, त्याची मदत मिळवायच्या. आमदारकीची एक टर्म भोगलेला हा दादा महात्मा होता. त्याच्या कुटुंबातल्या जवळच्या व्यक्तीदेखील आज त्याच्यामुळे राजकारणात चमकू लागल्यात. हाच दादा एका हत्येप्रकरणी अडकलाय! बाप्पा पुजारी आता या जेलमध्ये आलाय! ‘

दामलेंचे विचारचक्र संपत नव्हते. खाली बघत असलेला चपराशी आता दामलेबरोबर गप्पा हाणू लागला

‘ साहेब, तुम्हाला सांगतो, या दादाला आपण जवळून ओळखतो.  कितीतरी वेळा या कोर्टात बाप्पा येऊन गेलाय. लाख माणूस आहे बघा.  तुम्हाला खोटं वाटेल, पण तो आपल्याला पर्सनली ओळखतोय....'

' काय म्हणतां?', दामलेंच्या भुवया पुन्हा वरती गेल्या!

' मग काय, आपण खुप वेळा भेटलोय बाप्पा पुजारीला या कोर्टात. त्याला काय लागलं सवरलं तर आणून दिलंय त्याला! '

' बापरे, भारीच आहे हा दादा.' दामले त्याला म्हणाले.'

इतक्यात वरच्या मजल्यावरून काही पोलीस लगबगीनं खाली गॅलरीत येऊ लागले.

' चला, चला, इथं थांबू नका तुम्ही....तिकडं आतल्या बाजूला व्हा.'

पोलिसांनी जबरदस्तीने सगळ्यांना आतल्या गॅलरीत लोटले आणि बाहेरून काचेचा तो मोठा दरवाजा लावून बंद केला. पोलीस आता तेथे पाहरा देत उभे राह्यले.

चपराशी दामलेंबरोबरच आतल्या गॅलरीत आला आणि उभा राहिला. सगळे काचेबाहेर पाहू लागले.

चपराशी दामलेंना म्हणाला, ' बाप्पा पुजारी आता खाली निघेल इथल्या जिन्यातुन. आता आपल्याला इथे जवळून तो बघायला मिळेल. मला ओळख दाखवेल बघा तो. तुम्ही बघाच.' चपराशाच्या बोलण्याकडे दामले आश्चर्यचकित होऊन पाहू लागले. इतक्यात दामलेंना जिन्यातुन पाचसहा गन घेतलेले पोलीस खाली येताना दिसले. पोलिसांच्या मागे, एका हाताला बेडी ठोकलेला बाप्पा पुजारी येताना दिसला!

डोक्यावर तिरकी गांधी टोपी. भेदक बेदरकार नजर आणि टपोऱ्या डोळ्याने चौफेर बघणारा बाप्पा पुजारी दामलेंनी पाहिला. याचे व्यक्तिमत्त्व एकदम साधे! जेमतेम उंची. पायात कोल्हापूरी चपला.

पांढऱ्या शुभ्र सदरा लेंग्यातला हा दादा दामले जवळून बघत होते, एवढ्यात दादाची नजर दळवींवर गेली.

‘ काय दळवी? ', एवढे दोन शब्द उच्चारीत बाप्पा पूजारी खाली उतरताना बोलला आणि त्याने हात उंचावला! आता दळवी चपराशी धन्य झाले!

' साहेब, बघितलंत का? ', दळवींनी दामलेंना विचारले. दामलेही धन्य झाले!

आता दामलेंना दळवीबद्दल आदर वाटू लागला! मग दामलेंनी त्याला विचारले,' काय हो दळवी, एवढ्या लांबून हा आरोपी आणणे ही साधी सोपी गोष्ट नाही,बरोबर? ‘

त्यावर दळवी दामलेंकडे निर्विकार नजरेन पाहू लागला. दामले पुन्हा त्याला बोलू लागले.

' अहो दळवी, केवढा बंदोबस्त लागतो या लोकांना? पार पुण्याहून इथे आणायचे म्हणजे? त्यात काही धोका घडला तर? ‘

दळवी त्यावर हसला व म्हणू लागला.....,' अहो साहेब, काळजीचं नसत त्यात.’

‘ या दादा लोकांचा वेगळा बंदोबस्त असतो. सगळं मॅनेज केलेलं असतं यांचं!’

‘ कोर्टाच्या तारखेला यायचं म्हणजे वाटोवाट काही देवघेव होते.’

‘ काही व्यवहार घडतात. काही पोलिसांना समजतात, काही समजत नाहींत!'

' बापरे, सगळंच भयानक आहे की हो हे.' दामले त्याला म्हणाले.

' मग काय हो, एवढ्या प्रवासात थांबायला खूप कारणं असतात की, भेटीघाटी घडतात... माहिती देता येते. घेता येते. इथं कोर्टात आल्यावर तरी काय काम असतं यांचं? ‘

‘ पुढची तारीख मिळते. मग यांची पुढची वारी…...'

दामलेंना घडाघडा माहिती देणाऱ्या दळवीला आता त्याच्या साहेबाची आठवण झाली.

तो दामलेंना म्हणाला,' चला साहेब, मी निघतो आता, नाहीतर माझी काही खैर नाही....,'

दळवी एवढे बोलून निघूनही गेला! दामले आपले एकटेच गॅलरीत उभे राह्यले.

कोर्टातले हे धक्के दामलेंना बसत असताना शेट्टी वकिलांनी त्यांना आवाज दिला,

' दामलेसाब, मै अभी आ गया हूं. चलो, अंदर कोर्ट मे जायेंगे…......'

# समाजसंवेदना

उस्मानाबाद-लातूर परीसरातील किल्लारी येथे १९९३ मध्ये झालेल्या प्रलयंकारी भूकंपाची दुर्घटना बहुधा सर्वांना ज्ञात असेल. घटना तशी जुनी आहे. पण अंतर्मुख करणारी.

अशा आपत्तीच्या काळामध्ये, आपण कर्तव्यभावनेने एखाद्या सत्कार्यात सहभागी होतो, आणि मग येतात ते विविध अनुभव आपल्याला आणखी अंतर्मुख करतात.

या विषयीच मी येथे सांगत आहे....................

## दुःख पर्वताएवढे

धरणी कंप पावते म्हणजे नेमके काय होते, याचा प्रत्यक्ष अनुभव मी घेतला ३० सप्टेंबर १९९३ च्या पहाटे! वास्तविक आम्ही मुंबईकर यावेळी अगदी गाढ झोपेत असतो.

मी सुद्धा त्यावेळी गाढ झोपेत असताना अचानक, आपण झोपाळ्यावर असल्यासारखे हलत आहोत, ही जाणीव मला झाली! ताडकन मी उठलो. काहीसे ओरडलो सुद्धा! 'अहो, हलतंय हलतंय बघा.' हे शब्द उच्चारताना मी जवळच्या भिंतीवरील पुस्तकांचे कपाट तर पडत नाही ना? हे पाहिले. घरातले कोणी उठेनात. मग मी स्वतःला वेड्यात काढले. आजूबाजूस यावेळी पूर्ण शांतता होती!

म्हणजे आपल्याला हे स्वप्न वगैरे पडले होते तर! मी स्वतःला समजावले व पुन्हा अंथरुणावर पडलो.

सकाळी उठल्यावर मी हे घरच्यांना मी विचारणार होतो की, ‘ तुम्हाला अशी जाणीव झाली होती का ‘, म्हणून. पण ऑफिसात जायच्या गडबडीमुळे हे विचारणे राहून गेले.

ऑफिसमध्ये जो तो ' लातूरला मोठा भूकंप झालाय, कितीतरी माणसे दगावलीत ', असे म्हणू लागल्यावर आपल्याला पहाटे आलेला अनुभव खरा असल्याची मला खात्री पटली. त्यानंतर वर्तमानपत्रे, रेडिओ, टि.व्ही. यांचेमार्फत आलेल्या बातम्यांनी मन अस्वस्थ होऊ लागले. अवती भवतीचे लोकसुद्दा त्याच अवस्थेत होते.

मुंबईतील एक नवखे, पण लोकप्रिय सायंदैनिक ' आज दिनांक ' भूकंपाच्या बातम्या सातत्याने देत होते. इतर दैनिकाप्रमाणे या दैनिकातही भूकंपग्रस्तांना मदत करण्याचे आवाहन करण्यात येत होते. ‘ आज दिनांक ' ने त्यासाठी तातडीने एक समिती स्थापन केली होती. अजित वाडेकर, सुनील गावस्कर, नाना पाटेकर, सदाशिव अमरापूरकर, आशा भोसले, असे मान्यवर लोक या समितीत सहभागी झाले होते.

आमच्या गिर्यारोहक परिवारातील प्रसिद्ध गिर्यारोहक प्रजापती बोधणे हे समितीच्या वतीने किल्लारी व आसपासच्या गावात मदत कार्य पार पाडत होते. मुंबईतील अनेक गिर्यारोहक आणि गिरीप्रेमी युवक-युवती देखील या मदत कार्यात हिरीरीने भाग घेत होते.

हे मदतकार्य म्हणजे प्रामुख्याने जिवंत वा मृत व्यक्तींना ढिगाऱ्यातून बाहेर काढणे, जिवंत असल्यास त्यांची सुरक्षित स्थळी रवानगी करणे, जखमी असल्यास तातडीने त्यांना उपचाराकरीता जवळच्या आरोग्य पथकाकडे सुपूर्द करणे, आणि मृतव्यक्तींचे दहन-दफन नातेवाईकांच्या मदतीने करणे, असे होते.

ही कामे घटनास्थळी आलेले भारतीय लष्कराच्या सैनिकांचे पथक करीत होते. त्यांच्या या कामात ‘ आज दिनांक ‘ च्या तरुण स्वयंसेवकांची खूप मदत होणार होती.

प्रजापती बोधणे यांच्या नेतृत्वाखाली ' आज दिनांक ' चे काही कार्यकर्ते, मुंबई व आसपासचे काही गिर्यारोहक लगेच किल्लारीस रवाना झाले. किल्लारी हे प्रजापतीचे गाव. त्यामुळे मदतकार्य करताना तेथील परिसराची व्यवस्थित माहिती मिळणार होती.

किल्लारीत दाखल झाल्यानंतर सारेजण दिवसरात्र कामाला लागले. भूकंपामुळे कोसळलेल्या घर-वास्तूंच्या भग्न अवस्थेतील माती-दगडांच्या राशी तपासल्या जाऊ लागल्या. मृत व्यक्तींची शरीरं हाती मिळू लागली. क्वचितप्रसंगी ढिगाऱ्यात आवाज आला, की समजावे कोणीतरी जखमी जीव आतमध्ये आहे. मग कार्यकर्ते तो ढीग अलगद उपसायचे आणि त्या सुदैवी जीवास बाहेर काढायचे.

लष्कराचे पथक एकीकडे जोरात कामाला लागले होते. त्यांना आमच्या कार्यकर्त्यांची खूप मदत व्हायची. लष्करी अधिकारी कौतुकाने कार्यकर्त्यांची पाठ थोपटायचे. एका अधिकाऱ्याला प्रश्न पडला की, या अथकपणे काम करणाऱ्या तरुणांच्या जेवणाचे काय? ते मुक्काम कोठे करतात?

किल्लारीतील मदत पथकाचे एक अधिकारी मेजर सुभेदार यांनी आमच्या संस्थेची माहिती घेतली आणि सर्व कार्यकर्त्यांना लष्करी कॅम्पमध्ये राहण्या-जेवण्यासाठी आग्रह केला, मात्र त्यांना भार नको म्हणून आमच्या कार्यकर्त्यांनी नम्रपणे नकार दिला. मग सुभेदार साहेबांनी आमच्या मदत पथकातील कार्यकर्त्यांचा मुक्काम जेथे होता, त्या किल्लारीमधील 'गावकरे' यांच्या वाड्याच्या आवारात मिलीटरीचा एक तंबू उभारून साऱ्यांच्या निवासाची व्यवस्था केली.

या साऱ्या घडामोडी मुंबईत असताना मला ऐकायला मिळाल्या. दादरला आमच्या अखिल महाराष्ट्र गिर्यारोहण महासंघाचे कार्यालय होते. महासंघाचा पदाधिकारी सुनील राज हा जास्तीत जास्त गिर्यारोहक आणि गिरिप्रेमी कार्यकर्ते किल्लारीतील भूकंपग्रस्तांना मदत करण्यासाठी जावेत, म्हणून धावपळ करीत होता. तिकडे किल्लारीत, प्रजापती बोधणे दैनंदिन सहाय्य आणि इतर कामांचा रिपोर्ट मुंबईतील ' आज दिनांक ' ला कळवित होता. सरकारी अधिकाऱ्यांशी देखील प्रजापती संपर्क ठेवून होता.

मी व माझे काही मित्र मिळून तिकडे जाण्यास सज्ज होतो. दादर येथील ' आज दिनांक ' च्या कार्यालयात आम्ही सात आठ स्वयंसेवक हजर झालो. एक खासगी बस आम्हाला किल्लारीस नेणार असल्याचे समजले. पण काही वेळाने कळले की, ती बस जाणार नाही! कार्यालयाने एस.टी. महामंडळाकडे विचारणा केली, तेव्हा माहिती मिळाली की, रात्री अकरानंतर तिकडे जाणाऱ्या गाड्या नाहीत!

दादरमधील एक कार्यकर्ता रवींद्र पाटील एक जीप किल्लारीत नेणार होता. मात्र त्याचे पैशाचे पाकीट आजच मारले गेले, त्यात असलेले त्याचे ड्रायव्हिंग लायसन्स गेले! ही आवश्यक वस्तू आता नसल्याने ती जीप कशी जाणार? हे सारे

पाहिल्यावर आम्ही रेल्वेने तिकडे जायचे ठरवले. पण खूप रात्र झाली होती. याच दरम्यान, घाटकोपर येथील सागरमाथा गिर्यारोहण संस्था व सिव्हील डिफेन्स युनिटचे काही तरुण टेम्पोने भूकंपग्रस्तांना द्यावयाचे सामान घेऊन येणार होते. त्यांनी ' आज दिनांक ' कडे किल्लारीत प्रवेश मिळावा म्हणून सहाय्याची विनंती केली. त्यांना आवश्यक ती कागदपत्रे देण्यात आली. त्याच टेम्पोतून माझ्यासह काही स्वयंसेवी कार्यकर्ते किल्लारीकडे निघालो.

किल्लारी हे जवळचे गाव नव्हे, चांगला पंधरा-सोळा तासांचा प्रवास करावा लागतो. मुंबईहून पुणे मार्गे सोलापूर, नळदुर्ग असे जावे लागते. उमरग्याच्या वाटेवर असताना एक वाट जळकोट, सास्तुर मार्गे किल्लारीकडे जाते.

रात्री साडेअकराला आम्ही मुंबईतुन निघालो होतो. जळकोट गाठले, तेव्हा दुपारचा एक वाजला असेल. दुपारचे जेवण तेथील खानावळीत घेतले. जळकोट गावातील पडझडीची माहिती खानावळीच्या मालकाने आम्हाला दिली. गावातील उध्वस्त झालेली काही घरे दुरवर दिसत होती.

काही वेळाने टेम्पो उदतपुरला पोहोचला. हे छोटे गाव असून रस्त्याच्या कडेला दुतर्फा, व आतल्या बाजूस दगड मातीच्या राशीच राशी जिकडे तिकडे दिसत होत्या! येथे आम्ही थांबलो आणि विचारपूस सुरू केली. येथील बहुतेक घरे प्रामुख्याने काळीशार माती, ठिसूळ दगड व क्वचित चुना, यांचे मिश्रणातुन बांधली गेलीत. वास्तविक काळी माती बांधकामाची पकड घेण्याइतकी चिकट नसते. चुना तर सारेजण वापरत नव्हते. हा सारा ठिसूळपणा या उध्वस्थ अवस्थेस कारणीभूत ठरल्याचे जाणवले.

या ठिकाणी चालताना जपून पुढे पाऊल टाकावे लागे. काही ठिकाणी दरवाजाच्या बाजूकडील भिंती केव्हाही कोसळतील अशा अवस्थेत होत्या. दगड मातीच्या राशीतून डोकावणारे तुटके माठ, भांडी, धान्याची कणगी, जुन्या मोडलेल्या मांडण्या, स्तब्धपणे लटकणारी देवाची तसबीर हे सगळे पाहून पार उदासी आली.

उदतपूर नंतर दोन-तीन छोटी गावं लागली. मग सास्तुर गाव आले. पेपरमध्ये या गावांविषयी वाचलेले, ती गावे आता प्रत्यक्ष पाहत होतो. सास्तुर क्षेत्रफळाने मोठे नसले तरी येथे माणसांची वस्ती जास्त आहे. या गावात रस्त्याच्या दुतर्फा असलेली कोणतीही वस्तू शाबूत अवस्थेत दिसेना. सगळीकडे दगड व मातीच्या राशी! त्यात अडकलेले जुन्या घराचे खांब, वासे आणि इतर अवशेष........

रस्त्याच्या एकीकडे मोठा खड्डा खणून तो बुलडोझरने पुन्हा बुजवल्याच्या खुणा दिसल्या. जवळ एक उंचवटा होता. त्यावर उभे राहिले की सारे सास्तुर न्याहाळता येतेय. समोर मोठी शेतजमीन आहे. त्याचे एक बाजूस प्राचीन वाटणारे एक मोठे देवालय कोसळून पडलेय. दुसऱ्या दिशेस नजरेच्या टप्प्यात येणारी सगळी घरे ढासळून गेलेली. अगदी कोठली भिंत कोठे होती, अन कोठला दगड कोणत्या दिशेस होता हे समजत नव्हते.

गावात शिरल्या शिरल्या एक तिठा लागतो. तेथे लष्कराचे कॅम्प्स लागलेले आहेत. कोठेतरी रेडिओवर मदतीसाठी देण्यात येणाऱ्या सूचना ऐकू येतात, आर.एस.एस.च्या जनकल्याण समिती राहुट्यांमधून कार्यकर्ते इकडे तिकडे धावताहेत. एके ठिकाणी साधू बैराग्यांची राहुटी. भूकंपग्रस्तांना देण्यात येणाऱ्या जेवणाची त्यांनी तयारी चालविलेली.

सास्तुरमध्ये असताना विशेष जाणवत होते ते म्हणजे, तेथे भाऊगर्दी करून वावरणाऱ्या वाहनांविषयी. सरकारी अधिकाऱ्यांच्या अंब्यासिडर्स, मिलिटरी ट्रक, खासगी बघ्यांची वाहने, आणि त्या वाहतूक कोंडीत आमचा टेम्पो!

सास्तुर मधल्या त्या छोट्या टेकाडावर मी व दोघेजण जवळचा भाग न्याहाळत असताना तेथे दोघे ग्रामस्थ आपापसात काहीतरी बोलत होते. मी त्यांना मध्येच विचारले, ' काहो, ते जे मंदिर कोसळले त्यांच्या आत कोणी माणसं होती का हो? ' त्यावर एकजण उत्तरला -' अहो, कोण असायचं त्या ठिकाणी वस्तीला? कोणीच नाही.' तो पुढे सांगू लागला, ' हा जो मातीचा मोठा खड्डा दिसतोय ना, त्या ठिकाणी मोजता येणार नाहीत एवढी माणसं पुरलीत मिलिटरीनं! एकावर एक माणूस ठेवलंय हो त्या ढिगात. सगळा गाव बरबाद झाला आमचा.......' त्याचे शब्द ऐकताना सुन्न व्हायला झाले.

त्याच ढिगाच्या बाजूला अगदी अलीकडेच विटांनी बांधलेल्या कबरी होत्या. त्यावर पसरलेले अबीर, गुलाल, फुलं, उदबत्ती पाहून हे जास्त दिवसांचे नाही हे स्पष्टपणे दिसत होते. आम्ही उभे होतो तेथे मधूनच हवेची झुळूक आली की कुबट, उग्र असा वास येई.

येथून पुढे निघाल्यानंतर एक दोन वळणं पार करून एका नाक्यावर आमचा टेम्पो थांबला. त्या ठिकाणी एक दिशा दर्शक फलक होता. डावीकडे नारंगवाडी, साळेगाव, समोर होळी अन उमरग्याच्या दिशेने जाणारा रस्ता.

सास्तुरमध्ये अगोदर माहिती मिळाली होती की, जवळ असलेल्या रेबे चिंचोळीच्या गावकऱ्यांना कपडे, धान्य अशा वस्तूंची आवश्यकता आहे. आम्ही तेथे पोहोचलो. मात्र यावेळी दिवस मावळत चालला होता. किल्लारी गाव येथून

जास्त लांब नसले तरी तिकडे पोहोचायला रात्र होणार होती. शिवाय, गावात प्रवेश करतानाचे सोपस्कार होतील. त्यानंतर टेम्पोतले सामान जमा करण्याची कामे काही लगेच होणार नव्हती.

हा सगळा विचार करून आम्ही या गावात आज थांबायचे निश्चित केले. इथल्या गरजवंतांना काही मदत देखील देऊ आणि उद्या सकाळी किल्लारीत जाऊ असे सर्वांनी ठरवले.

आमचा टेम्पो थांबलेला पाहून काही ग्रामस्थ लगेच गोळा झाले. टेम्पो मदतीचे सामान घेऊनच आलाय, हे त्यांनी जाणले. काही बायका पण टेम्पो जवळ येऊन विचारायला लागल्या.

या नाक्याच्या दुसऱ्या दिशेला होळी तांडा या छोट्या वस्तीतली घरं उद्ध्वस्थ अवस्थेत दिसत होती. तेथील ग्रामस्थांना तात्पुरता निवारा समोरच्या बाजूस मिळालेला, तर पलीकडील बाजूच्या शेड्समध्ये रेबे चिंचोळी गावातून आलेले मागासवर्गीय ग्रामस्थ. या साऱ्यांना जेवण आणि चहा देण्यासाठी तेरणा साखर कारखान्याने मोठा मंडप तयार केला होता. आमच्या सहकाऱ्यांनी निर्णय घेतला की, येथे सामान वाटण्यापूर्वी काही कुटुंबांची व्यवस्थितपणे चौकशी करावी.

तेथे एक तरुण भेटला. नाव आठवत नाही. बीए. डीएड. इतके शिक्षण झालेय त्याचे. हा भाबडा तरुण ‘त्या’ दिवसाच्या भयाण हकीकती सांगू लागला- ' कोसळलेल्या ढिगात अडकून पडले होतो. पायाला केवढी जखम झालीय बघा. आमची मांग समाजाची वस्ती एक बाजूला होती. इकडे गावात शिवाशिव चालते. त्या दिवशी पहाटे भूकंप झाला आणि लगेच आवई उठली की, माकणी धरण

फुटलेय. सगळेच घाबरलो होतो. सारी वस्ती नेसत्या वस्त्रानिशी अन हाती मिळेल ते सामान घेऊन इथे आलीय. सवर्णांना हेच हवे होते…....'

हे बोलणे सुरू असताना एक मॅटेडोर व्हॅन आमच्या जवळ येऊन थांबली. गाडीच्या बॅनरवर लिहिले होते ' पंढरपूर व्यापारी संघ '. पांढरा शुभ्र सदरा, टोपी, परीट घडीतील लेहंगे अशा पोशाखातले दोघे जण खाली उतरले. त्यानंतर पाच सहा जण बाहेर आले. काहींच्या हातात कापडांची गठडी दिसली.

आमच्या भोवती असलेली बहुतेक लोकं त्यांच्यापाशी जमा झाली. आया-बाया आणि पोरांनी अगदी वेढा घातला. ते बिचारे गांगरून गेले असावेत! अखेर त्यांच्यातल्या एका पुढाऱ्याने ओरडून सांगितले, ' हे बघा, तुम्हा साऱ्यांना कापडं मिळणार. तुम्ही आधी खाली बसून घ्या पाहू......'. मग गडबड शांत झाली.

एका बाजूला गडी माणसं, तर दुसऱ्या बाजूला आया-बाया आणि लहान पोरं बसली. वाटप करणारे दाते आता गठड्यातील नवीन कापडं त्यांना वाटायला लागले. मात्र घाईघाईत त्यांच्या लक्षात आले नाही की आपण कुणाची कापडे कुणाला देतोय? कारण, ती बायका पुरुषांची कापडं एकत्रित झाली होती! गोंधळात गोंधळ सुरू झाला!

योगा योगाने ज्यांना योग्य कापडं मिळाली ते आपल्या राहुटीकडे निघाले. इतरांचे काय! त्यांच्या हातात नको ती कापडं पडली होती! त्यामुळे पुन्हा गडबड सुरू झाली, इतका कल्ला सुरू झाला, की ते पुढारी उरलेल्या कपड्यांची गठडी घेऊन त्यांच्या मॅटेडोर व्हॅनकडे निघाले. ते जाणार म्हटल्यावर लोकं जोरात ओरडू लागली! काहीजण स्वतःला नको असलेले कपडे मिळाले तेथेच टाकून देऊ लागले,

तर कुणी दुसऱ्याच्या हातातील कपडे हिसकावू लागले! हा सारा प्रकार बघायला ते पुढारी थांबले कुठे? त्यांची व्हॅन तर परतीच्या वाटेवर लागली होती!

येथील आमची मदतीची कामे आटोपल्यावर समजले, की येथुन पुढे एक छोटी वस्ती आहे नागराळ म्हणून. ती पण उद्वस्थ झालीय. त्या गावकऱ्यांना सुद्दा काही मदत हवीय. मग आम्ही सगळे तिकडे निघालो. टेम्पो मात्र ड्रायव्हर, क्लिनरसह तेथेच थांबणार होता.

रात्रीच्या अंधारात शेताच्या वाटेने काही काळ चालून गेल्यावर मिलीटरीचे तंबू लावलेले कॅम्प दिसले. मिलीटरीचे दोघे सैनिक आणि एक ग्रामस्थ बसून इकड-तिकडच्या गप्पा मारीत होते. त्यांनी आमचे स्वागत करीत आमची विचारपूस केली. त्यांनी माहिती दिली की या भागात मिलीटरीनेच सगळ्यांना मदत केली आहे व करतही आहे. हे स्पष्ट झाल्यावर आम्ही परत रेबे चिंचोळीच्या वस्तीकडे परतलो.

इकडे एक अजब प्रकार घडला होता. ' नागराळ येथे जाऊन सगळेच सामान आम्ही तिकडच्या गावकऱ्यांना देऊ. आपल्या लोकांना यातले काहीच मिळणार नाही, 'असा समज रेबे चिंचोळी आणि होळी तांडा गावच्या काही ग्रामस्थांचा झाला होता! या गोंधळामुळे आमच्या टेम्पोत बॉम्ब ठेवल्याची अफवा पसरली गेली होती! साहजिकच मिलीटरी अधिकारी, तसेच पोलीसांनी टेम्पोच्या ड्रायव्हर-क्लिनरची सडकून हजेरी घेतली आणि टेम्पो तपासणीच्या वेळी दोघे कुठे गायब झाल्याने त्यांचा संशय अधिकच बळावला!

हरतऱ्हेची चौकशी त्यांनी केली. टेम्पो उघडायला लावला. गाडीचा नंबर, ड्रायव्हरचे लायसन्स, संस्थेची माहिती हे सारे गोळा करून वर आमच्या टेम्पोतील दोन प्लॅस्टिकच्या बादल्या ते जबरदस्तीने घेवून गेले!

चीड आली साऱ्या प्रकाराची अन वाईटही वाटले. सगळाच अडाणीपणा. ही एवढी धावपळ आमच्या कार्यकर्त्यांनी आणि आमच्या संस्थानी का व कशासाठी केली? बॉम्ब आमच्याच लोकांना मारायला आम्ही का म्हणून आणू? ' या विचाराने आम्ही हबकून गेलो होतो. दिवसभराच्या प्रवासात आलेला शिणवता अजून गेला नव्हता, त्यात हा दुर्दैवी प्रकार!

काही वेळाने आमच्या टेम्पोपाशी मघाशी भेटलेला ग्रामस्थ तरुण आला. तो म्हणाला- ' या दिवाण्या लोकांना मी समजावून सांगितले होते, तरी त्यांनी विश्वास नाही ठेवला आणि हे असे झाले. मी काय करणार, सांगा? नंतर इतर दोघे आले. समजावणीच्या सुरात बोलू लागले. मग हळूहळू सारे शांत झाले.

रात्र केव्हाच झाली होती, सगळ्यांना भूका लागल्या होत्या. बरोबर आणलेले काहीबाही खाल्ले आणि सामानाचे वाटप उद्या सकाळीच करूया, आता झोपण्याची कुठे सोय होतेय ते पाहू, असे ठरवले.

पाऊस पडण्याची चिन्हे दिसत होती. या कॅम्पजवळ तेरणा सहकारी साखर कारखान्याचा एक ट्रक उभा होता. गावकऱ्यांनी ट्रकच्या वर आच्छादन म्हणून मोठी प्लॅस्टिक शीट अंथरली आणि मग त्याच ट्रकमध्ये काही गावकऱ्यांसह आम्ही मुक्काम केला.

सकाळी अन्न छत्रातील कार्यकर्त्या गावकऱ्यांनी चहा दिला, बरे वाटले. त्यानंतर सामान वाटपाचे काम सुरू झाले. प्लॅस्टिकच्या बादल्या, जेवणाची छोटी भांडी इत्यादी वस्तूंचे वाटप नीट चौकशी करून केले. आता फक्त रेशनची पोती उरली होती टेम्पोमध्ये. ती किल्लारील शासकीय अधिकाऱ्यांच्या ताब्यात द्यायचे ठरवून आम्ही इथल्या गावकऱ्यांचा निरोप घेतला.

किल्लारी पूर्वी होळी गाव लागले. इथे सुद्दा बहुतेक वस्ती नष्ट झालीय. पुनर्वसनासाठी लष्कराने उभारलेले तंबू जागोजागी दिसत होते.

आम्ही किल्लारीत प्रवेश केला. हे गाव मुख्य रस्त्यापासून काहीसे आत आहे. गावातील मुख्य रस्त्याच्या वळणावर पोलीस, लष्कर, आणि शासकीय अधिकाऱ्यांची वाहने जिकडे तिकडे दिसत होती. मदतीचे मुख्य केंद्र याच ठिकाणी होते. येथे एका झाडाखाली टेबल मांडून बसलेला कर्मचारी काही गावकऱ्यांना गावात जाण्यासाठी ओळखपत्र देण्याचे सोपस्कार करीत होता. या परिसरात देखील दुतर्फा असणाऱ्या बऱ्याच घरांची भूकंपामुळे झालेली हानी आम्हाला पाहायला मिळाली.

प्रवेशासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे घेऊन आमचे काही कार्यकर्ते तेथील अधिकाऱ्यांना भेटले. मग टेम्पोतील रेशनची पोती शासनाच्या गोडाऊनमध्ये जमा करण्यास गेलो.

इथल्या चौकात असलेल्या शिवरायांच्या पुतळ्यापासून काही अंतरावर तेरणा सहकारी साखर कारखाना आहे. जिल्ह्यातला हा पहिला सहकारी साखर कारखाना. अलीकडे तो बंद असायचा. त्याचे आवारात शासनाने तात्पुरते गोडाऊन करून भूकंपग्रस्तांना मदत म्हणून आलेल्या देशी-विदेशी वस्तू ठेवल्यात. लष्कराचे एक अधिकारी व उदगीरचे तहसिलदार या दोघांची देखरेख या ठिकाणी होती. त्यांचे मदतीला लष्करी सैनिक तसेच प्रशिक्षण घेणारे पोलीस. ही सारी मंडळी सदैव तेथे झटत होती.

अन्नधान्याची पोती, कांदे बटाट्याचे मोठमोठे ढीग, ब्लॅंकेट्स, सोलापुरी चादरी इत्यादी सामानाचे गठडे, जुन्या-नव्या कपड्यांचे मोठाले बंडल्स, परदेशातून

आलेले तंबूचे खोके, मोठ्या प्लॅस्टिक सीट्स, हजारो भांडी आणि बादल्या! हे सारे पाहून ‘ केवढी मोठी मदत मिळालीय!’, असे कोणीही म्हणेल.

सारे सामान जमा केल्यानंतर आम्हाला पोचपावती देण्यांत आली. सगळयांची विचारपुस वगैरे झाली, अन आम्ही तेथून पुढे निघालो. वाटेत रस्त्याच्या कडेला शेतात लावलेले लष्कराचे कॅम्प्स दिसू लागले. काही गावकऱ्यांना तात्पुरता निवारा तेथे मिळालेला होता.

आमच्या संस्थेचे ठिकाण शोधत पुढे निघालो. एका वाड्याच्या आवारातील कंपाउंडची भिंत ढासळलेली दिसली. त्या जागेत लटकवलेला ' आज दिनांक ' चा कापडी फलक बघितला आणि आम्ही आत शिरलो.

ही जागा किल्लारीतील ग्रामस्थ गावकरे यांची. भूकंपाचा दणका या सधन ग्रहस्थानाही बसलाय. त्यांचा वाडा बैठा असला, तरी त्यावर स्लॅबचे आच्छादन आहे. आत तिन्ही बाजूला बांधलेल्या आठ दहा खोल्या आहेत. प्रत्येक खोलीला थोडीफार इजा पोहोचलीय. या वाड्याचे प्रवेशद्वार केव्हाही कोसळेल अशा अवस्थेत आहे. येथल्या एका खोलीत कार्यकर्त्यांचा राबता आहे. एका कोपऱ्यामध्ये जुन्या नव्या कपड्यांची बोचकी रचून ठेवलीत. दुसऱ्या कोपऱ्यात आवश्यक प्रथमोपचाराची औषधे ठेवलेली. बाजूला एक स्टोव्ह, कार्यकर्त्यांना खाण्यासाठी लागणारे रेशन वगैरे..... या वाड्याच्या आवारात लष्करी अधिकाऱ्यांनी दिलेला तंबू देखील आहे. कार्यकर्ते त्यात राहातात.

आज सगळे जण येथून दीड दोन कि. मी. वर असलेल्या तळणी गावात काम करायला गेलेत असे समजले. लगेच आम्ही टेम्पोने तळणी गाव गाठले. आमच्या सहकाऱ्यांनी तळणीत आमचे स्वागत केले. विचारपूस केली. या उद्वस्थ गावात काम

करण्यापूर्वी आमच्या सिनिअर्सनी कामाच्या स्वरूपाची प्राथमिक माहिती दिली. राजेंद्र टन्नू या छात्रभारतीच्या पंढरपूर येथील कार्यकर्त्याने अधिक समजावून सांगितले.

त्यानंतर आम्ही, म्हणजे मी व संजय नेवे, तसेच आमचे मुंबईचे दोस्त बाबूल व बळवंत जे आमच्या अगोदर इथे आले होते, त्यांच्याबरोबर आम्ही कामाला लागलो. टेम्पो घेऊन आलेले सहकारी मात्र आमचा निरोप घेऊन परत निघाले.

इथला दिवसभराचा कार्यक्रम म्हणजे भूकंपात कोसळलेल्या वास्तूमध्ये अडकलेल्या वस्तू-सामान काढण्यासाठी गावकऱ्यांना प्रत्यक्ष मदत करणे. त्यांची नीट विचारपूस करून, माहिती घेऊन सरकार मार्फत त्यांना मिळण्याजोगी मदत देण्याकरीता सहाय्य करणे, नवे जुने कपडेलत्ते गरजू व्यक्तींना देणे, त्याचप्रमाणे, गावकरी बंधूंशी संपर्क साधून हानीचा तपशील घेणे. हे करताना लष्करी अधिकाऱ्यांच्या कामात सुद्दा आम्ही मदत करणार होतो.

सुरुवातीच्या बॅचमधील आमच्या सहकाऱ्यांनी अथकपणे शोध कार्य करून मृत व्यक्तींना ढिगातून बाहेर काढणे, त्यांचे दहन-दफन करणे, जखमींवर उपचार करण्यासाठी प्रथमोपचार केंद्रात त्यांना पाठविणे, मेलेल्या गुरांची विल्हेवाट लावणे अशी कामे केल्याची माहिती मिळाली. कामाचा हा पहिला टप्पा पूर्ण झाला होता. आता उर्वरित पुनर्वसनाची कामे सुरू झाली होती.

तळणी गाव तसं छोटेसेच आहे, पण गावातली बैठी व इमल्याची घरं कोसळून गेली आहेत. कोठेही नजर जावी अन दगड मातीची रासच रास आपल्या नजरेस यावी, असे सर्वत्र दृश्य आहे. जुने पुराणे पण भक्कम वाटणाऱ्या वास्तूंचे लाकडी खांब पार गाडले गेलेत! क्वचित, ढिगामधून त्यांचा एक भाग डोकावून ' मी एवढा

भक्कम असून देखील माझ्या ' माणसांना ' वाचवू शकलो नाही ' हे आपल्याला केविलवाण्या अवस्थेत सांगतोय, अन आपण त्या दगड मातीच्या राशी सारखे निर्जीव व निर्विकार होऊन सारे काही पाहतोय, अशी तळणीतली परिस्थिती आहे.

इमल्यांचे अवशेष काही ठिकाणी डोकावतात, त्या इमल्यांच्या अर्धवट राहिलेल्या, तडकलेल्या भिंतींना लटकावलेले समस्त देवादिकांचे फोटो आपल्याला त्यांच्या अस्तित्वाची जाणीव करून देतात, तर कोठे घरातल्या वायरींचे घोस लोंबकळणाऱ्या अवस्थेत व त्यातच अडकलेला एखादा सिलिंग पंखा वाकड्या तिकड्या रूपात आपल्या नजरेस दिसतो.

तळणीचे प्रमुख देवस्थान नागनाथेश्वराचे. तेथला देव सुस्थितीत आहे. मात्र देवळाच्या भोवताली असणाऱ्या दोन दगडी भिंतींना मोठे तडे गेलेत! पाठीकडील एक कोपरा कळसापासून खालपर्यंत ढासळलेला आहे.

किल्लारी अन तळणी गावात आम्ही इतर स्नेह्यांच्या मदतीने सुरू केले होते. मुंबईतील प्रसिद्ध महिंद्र अँड महिंद्र कंपनीचे कर्मचारी, केव्ह एक्सप्लोरर्स-मुंबई या संस्थेचे अनुभवी गिर्यारोहक मित्र व इतर कार्यकर्ते, या साऱ्यांसमवेत ओळखही झाली.

या कामात, कधी माती-दगडांच्या राशीत अडकलेली कोणाची एखादी शेगडी काढून दे, तर कधी कोणाची भांडी, लाकूड सामान, किमती वस्तू, वापरातली चांगली कापडं, पेट्या ढिगातुन शोधून काढायच्या, असे मदत कार्यही आम्ही करीत होतो. कधी एखाद्या घरात धोक्याच्या ठिकाणी अडकलेले स्टीलचे कपाट कौशल्याने काढण्याचे काम आमच्यातील कार्यकर्ते करीत होते. काहीजण गावात जाऊन

सर्वेक्षणाचे निमित्ताने चौकशी करून तेथल्या गावकऱ्यांच्या आणखी काही अडचणी आहेत का? हे जाणून घेत होते व त्या अडचणी सोडविण्याचे प्रयत्न सुद्दा करीत होते.

या मदत कार्यात विशेष आठवणीत राहिलेल्या काही छोट्या मोठ्या घटना इथे सांगणे मला महत्वाचे वाटते-

तळणी गावात चांद नावाच्या गृहस्थाचे घर होते. भूकंपात हे कुटुंब ढिगात अडकले होते. ते सात-आठजण असावेत. १७/१८ वर्षाची तरुण मुलगी पण त्यात होती. तीने स्वतःची सुटका करून इतरांचीही सुटका केली. मात्र दोन जणांना ती वाचवू शकली नाही. ही धाडसी तरुणी व चांद हे दोघेजण त्यांच्या महत्वाच्या वस्तू ढिगातून काढण्याकरीता यायचे. आम्ही त्यांना मदत केली व काही वस्तू मिळवून दिल्या.

गावकऱ्यांना देण्याकरीता जमविलेल्या जुन्या कपड्यांचा ढिग आमच्या कार्यालयात पडला होता. गरजुना त्यातले कपडे द्यावेत हा आमचा हेतू. दुसऱ्या गावातून, येथे येऊन राहणारे लोक हे कपडे घ्यायला यायचे. पण त्यातील काहींचे रडणे व बतावणी खरी वाटत नव्हती. अशा लोकांना आम्ही समजावून परत पाठवायचो.

किल्लारी गावात एक मोठी शाळा आहे. शाळेच्या पटांगणात साधूंच्या एक गटाने काही गावकऱ्यांची जेवणाची व्यवस्था केली होती. त्या ठिकाणी गर्दी आणि कलकलाट असायचा! यातले बरेच जण इथले नसायचे! स्थानिक गावकरी यामुळे नाराज होते.

कपडे पुरविण्याबाबतीत येथील गावकऱ्यांच्या पुनर्वसन कॅम्पमध्ये चौकशी केल्यावर एक अजब प्रकार समजला. शहरातून येणारे लोक यांना जे कपडे देऊ

करीत, त्यात बहुतेक फॅशनेबल कपडे असायचे. म्हणजे मॅक्सी, गाऊन, मिडी ड्रेस, पंजाबी ड्रेस, जिन्स पॅन्ट.... कॅम्पमधील बाया बापड्यांचा आम्हाला सवाल होता, ' या असल्या कपड्यांचा गावातल्या लोकांना काय उपयोग सांगा बरं? अहो, परकर-पोलकं अन नऊवारी-पाचवारी लुगडी नसणाऱ्या बायका आम्ही ',

तळणीतील एका देवळात मठ होता. त्यात एक गोसावी बाबा राहायचे त्यांचे नाव ब्रम्हचारी सुकदेव गिरी. बाबांचे वय साठच्यावर असावे. शरीर सडपातळ, वर्ण काळा, अंगावर लालभडक खमीस आणि धोतर घालणाऱ्या सुखदेव बाबांचे सामान मोठ्या ढिगातून शोधण्याचे काम लष्कराचे जवान करीत होते. आमचा ग्रुप त्यांच्या कामात मदत करीत होता. सुकदेव बाबा डोक्याला हात लावून त्याच ठिकाणी एका कोपऱ्यात खिन्न अवस्थेत बसले होते.

त्यांच्या वस्तू शोधताना छोटा तांब्या सापडला. मग एक घोंगडी मिळाली, मात्र ती फाटलेल्या, जीर्ण अवस्थेत हाती. बाबांची काही कापडं देखील सापडली. ती फाटलेली असूनही बाबा सोडायला तयार होईनात! नंतर पैशाची छोटी पुरचुंडी मिळाली. त्यात सहाशे अठ्ठावीस रुपये होते.

बाबा हळूहळू नॉर्मल होत होते. मात्र मध्येच काही आठवले, की ते दुःखी कष्टी व्हायचे. आम्ही त्यांचे सांत्वन करण्याचा प्रयत्न करीत होतो. मग भूकंपाच्या रात्रीची हकीकत बाबांकडून ऐकायला मिळाली. रोज मठात चार-पाच गावकरी रात्री झोपायला यायचे. बाबा त्या दिवशी लातूरला वस्तीला गेले होते. भूकंपात मठात झोपलेले ढिगात सापडले, त्यातला एकजण मात्र दगावला.

आम्ही बाबांना सारखे महाराज महाराज संबोधू लागलो, तेव्हा ते चिडून उद्गारले- ' अहो, मी कसला हो महाराज! गावातल्या लोकांना इथं आणून जुगार, दारू

आणि कसली कसली मदत मी करायचो. मला महाराज नका म्हणू तुम्ही! '. याच वेळी त्या ढिगामध्ये एक जुनाट पत्र्याची पेटी सापडली. महाराजांच्या या पेटीमध्ये पन्नास रुपये, एक पोथी, जुने कपडे, आणि गांजाची पुडी सापडली!

तळणीत काम करीत असताना एकदा गुंडूराव पाटील म्हणून एका गृहस्थांनी आमची मदत मागितली. त्यांची जुनी परंतु किमती भांडी ढिगात अडकली होती. ती काढून द्यायची होती. ते काम सुरू झाले. खूप वेळ झाला, पण भांडी काही सापडेनात. फक्त धान्याची कुसलेली कणगी, लाकडी पाट, अशा किरकोळ वस्तू तेवढ्या मिळाल्या. या कामात सगळ्यांना थकायला झाले. पाटीलही निराश झाले. शेवटी शोधकाम थांबविले त्यांनी.

खरा प्रकार असा घडला होता की, भूकंप झाल्याच्या दुसऱ्या, तिसऱ्या दिवशी बाहेरून आलेल्या बघ्यां लोकांची गर्दी या गावात झाली होती. त्यावेळी काही लबाड लोकांनी संधी साधून हाती येईल ते घेऊन पोबारा केला होता! गुंडूराव पाटलांनीच ही माहिती आम्हाला शोधकाम थांबविल्यानंतर दिली!

किल्लारी, तळणी आणि मांगरुळ ही गावे एकमेकांपासून फार लांब नाहीत. पैकी माकणी धरणाला जवळ असणारे गाव तळणी व मांगरुळ. तेथे बांधलेल्या मातीच्या बंधाऱ्यांना खूप ठिकाणी पडलेल्या भेगा आम्ही प्रत्यक्ष बघितल्या.

तळणीतल्या बाबांचे काम करीत असताना बाजूच्या एक घराचा ढीग पोलिस प्रशिक्षणार्थी उपसीत होते. घर मालकाचे नाव होते महादेव कृष्णा कळशेट्टी. कुटुंबात वाचलेला हा एकमेव माणूस. दुःख करून करून तो निर्विकार झाला होता. पोलिसांच्या कामात तो मदत करीत असताना एकाला भिंतीवरील घड्याळ सापडले अन महादेव आनंदाने उठला! ते घड्याळ घेऊन जवळच्याना दाखवू लागला.

घड्याळ सुस्थितीत होते. ते बंद पडले होते भूकंपाची नेमकी वेळ कोणती ते दाखवून(पहाटे ५.४०)!

किल्लारीतील जुने व प्रसिद्ध असे निळकंठेश्वर मंदिर आता साफ आडवे झालेय फक्त मूर्ती आणि जवळपासचा भाग सुखरूप अवस्थेत आहे.

भूकंपग्रस्तांना करावयाच्या मदती संदर्भात पाहाणी करायला किल्लारी तळणी परिसरात दिवसभर येणाऱ्या मोटारी व त्यातून येणारे शासकीय अधिकारी, मंत्री, व्हीआयपी पुढारी, हे लोक काही अंशी मदतकार्यात अडथळा आणीत. म्हणजे कार्यकर्ते अथवा कोणी कर्मचारी काम करीत असेल तर ते, या लोकांचे आगमन झाल्यावर थांबवावे लागे. कारण एकच. त्या व्हीआयपी लोकांची सुरक्षा!

गंमत म्हणजे नाशिकच्या पोलीस प्रशिक्षण महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी उपनिरीक्षक अगदी पांढरे शुभ्र कपडे घालून चामड्याच्या बुटांसह भर चिखलात, तैनाती फौजेसारखे या व्हीआयपींच्या स्वागतास उभे राहात. जोडीला अर्थातच खाकी वेशातले पोलीस!

किल्लारीत एकदा सायंकाळी काही पुढारी त्यांच्या लव्याजम्यासह आले. गावातील चौकात त्यांचा टेम्पो उभा राहिला. भूकंपानंतर असंख्य मृतात्म्यांची शरीरे ज्या ठिकाणी काही दिवसांपूर्वी ठेवली होती ते हे ठिकाण. त्याच ठिकाणी आमच्या फॅशनेबल पुढाऱ्यांनी लग्नात जसा फोटोचा सोहोळा करतात, त्या पद्धतीने स्वतःचे फोटो काढून घेतले!

किल्लारीच्या पुनर्वसन केन्द्रात गावकऱ्यांशी एकदा बोलत असताना रस्त्यावर एक मिनी ट्रक येऊन उभा राह्यला. त्यावरील कापडी बॅनरवर ‘ हार्व्हेस्ट व्हिजन

मिनीस्टर्स – मुंबई ‘ असे ठळक अक्षरात लिहिले होते. जवळपासचे लोक लगबगीने तेथे जमा झाले. त्यात आयाबाया व लहान मुलेही होती.

हा प्रकार जवळून पहावा म्हणून मी, संजय नेवे व चेतन दिवेकर टेम्पो पासून काही अंतरावर उभे राहिलो. जवळपास ३०-४० गावकऱ्यांचा जमाव तेथे जमला असावा. मग दोनतीन टिपटॉप ड्रेस घातलेले संस्थेचे कार्यकर्ते त्या जमावात मिसळले. एकीकडे त्यांचे व्हिडीओ चित्रीकरण सुरू झाले होते. जमावाचा उत्साह वाढला, तेव्हा शांततेचे आवाहन करण्यात आले. एका कार्यकर्त्याने ट्रकमधून पार्ले ग्लुकोज बिस्किटचा मोठा बॉक्स आणला. म्होरक्या तरुण कार्यकर्त्याने तो बॉक्स उघडून एक पुडा हातात घेतला व लोकांना, म्हणजे त्या कॅमेऱ्याला दाखविला. पुढे आंग्ल भाषेत त्यांचे प्रवचन सुरू झाले......Look, they are in such position.......in bad situation........they need our help....they need food. Now they are taking.......

हे न समजणाऱ्या गावकऱ्यांमध्ये चुळबुळ सुरू झाली. ते एकमेकांकडे भांबावून पाहू लागले. वस्तू मिळण्याची काही चिन्हे दिसेनात. आपण येथे का थांबलो आहोत, हा त्यांना प्रश्न पडला. या जमावामध्ये चार दोन तरुण हातवारे करून त्या कार्यकर्त्यांना प्रश्न विचारू लागले. परंतु तो आंग्ल प्रवचनकार तरुण कॅमेऱ्याकडे पाहत व हातातला बिस्किटचा पुडा फिरवीत बोलतच राहिला!

आता जमावाचा गलका वाढू लागला. त्यातील एक तरुण ओरडला- ' अरे, तुम्ही काय देत नाय, काय नाय, उगीच इथं फुकाची बडबड कराया आलात व्हय?.......' त्यावर एक कार्यकर्ता हिंदीत त्याला समजावू लागला-' अरे भाई, सुनो,

सुनो आपका पिक्चर आएगा टि. व्ही. पर '. मग कोणीतरी शिवी हासडली. वैतागलेला जमाव हळूहळू त्या खोक्याजवळ आला.

आता आपले काही खरे नाही, हे लक्षात आल्यावर त्या हायफाय कार्यकर्त्यांनी आवरते घेतले. नेमक्या याच क्षणाचा फोटो मी घेतला. कॅमेऱ्याचा फ्लॅश पडल्यावर कार्यकर्ते चपापले! एक कार्यकर्ता पटकन जवळ आला आणि धमकीच्या सुरात आमच्याशी बोलू लागला. प्रेसचे आहोत म्हटल्यावर तो गप्प बसला आणि परतला. लगेच ट्रकने ते माघारी फिरले!

अशा अपवादात्मक घटना सोडल्या, तर बऱ्याच समाजसेवी संस्थांची सक्रिय मदत या संकटग्रस्तांपर्यंत पोहोचत होती. शासनाचे सचिव, जिल्हाधिकारी, मंत्रीगणांचे सहाय्यक, सरकारी कर्मचारी, त्याचप्रमाणे विविध स्वयंसेवी संघटनांचे कार्यकर्ते प्रामाणिक भावनेने केलेले सेवा कार्यही विसरता येणार नाही.

किल्लारी व आसपासच्या गावातील भूकंपग्रस्त बांधवांना मदतीचा हात देण्यात सिंहाचा वाटा अर्थातच भारतीय लष्कराकडे जातो. लष्कराचे उत्साही जवान व अधिकारी यांनी तातडीचे मदत कार्य त्या भागात अखंडितपणे केलेले आहे. पोलीसांचे काम सुद्धा तेवढेच महत्वाचे आहे. तीन तीन दिवसांची ड्युटी लागोलाग पणे त्यांना या भागात करावी लागलीय. आरोग्य विभागाचा सर्व अधिकारी-कर्मचारी वर्ग, जिल्हा परिषदेचे कर्मचारी आणि शाळांचे शिक्षक हे वेळकाळ आणि घरदाराचा विचार न करता या कामात मग्न राहिले होते आणि अजूनही ते कार्यरत आहेत.

भूकंपग्रस्तांना परदेशातून बरीच मदत आली होती. त्यामध्ये अद्यावत तंबू होते. ते कोणाला द्यावेत असा अधिकाऱ्यांना प्रश्न पडला होता! मॉडर्न स्वरूपाचे तंबू लावणे गावकऱ्यांना नीट जमत नव्हते. त्यांना तंबू लावून दिला, तरी त्या तंबूत

गावकरी चूल कशावरून नाही पेटविणार? ही मोठी भीती होती. म्हणून शासनाच्या अधिकाऱ्यांनी माजी सैनिकांच्या मदतीने गावकऱ्यांना तंबू लावून दिले.

या भूकंपाने लहानथोर मुलांच्या शिक्षणाचे बारा वाजवले. सुदैवाने काही संस्था त्यांना चालू वर्षाचा अभ्यासक्रम शिकविण्यासाठी पुढे आल्या. या भूकंपात जी घरे व वाडे कोसळले, त्यांत कित्येकांची कागदपत्रे, पैसेअडके, दागिने, रेशनकार्डस, शेतीवाडीचा आधार ठरणारी गुरेढोरे गेली. कोणाचा एकुलता एक मुलगा दगावला, तर कोणाची लेक गेली, कोणी आपल्या आई वडिलांना मुकले, तर कोणाचे नवजात मूल देखील देवाघरी गेले.

किल्लारीत असताना एकदा पहाटे( ९ ऑक्टोबर १९९३) झालेल्या भूकंपाने साऱ्यांना चांगलाच दणका दिला. आदल्या रात्री वाड्याच्या आवारातील टेंटमध्ये खाली चिखल असल्याने त्यावर जवळच असलेल्या लाद्या व्यवस्थितपणे साऱ्यांनी बसविल्या होत्या. त्यावर मोठे कापड अंथरल्यावर काहीजणांच्या झोपण्याची सोय झाली. सगळे कार्यकर्ते निद्रेच्या अधीन झाले होते. फक्त राजेंद्र टन्नू, संजय नेवे आणि आणखी एकजण मध्यरात्रीपर्यंत वाड्याच्या एक कोपऱ्यात गप्पा हाणीत होते. नंतर ते झोपायला आले. टन्नू मात्र त्यांच्या दिवसभराच्या कामाचा रिपोर्ट डायरीत लिहू लागले.

मध्यरात्री बरोबर २.१५ ला धरणी गदागदा हलू लागली, अन गाढ झोपेत असणारे आम्ही सारे जागे झालो! मी तर ताडकन उठून जमीन हलतेय, जमीन हलतेय असे म्हणत सैरावैरा तंबूबाहेर आलो! या भूकंपाने सगळेच सिरिअस झाले होते. आयुष्यात अनुभवलेला हा दुसरा मोठा भूकंप! झोपेतून उठताना जमिनीच्या खाली

समुद्राच्या लाटांसारखा आवाज माझ्या कानात स्पष्टपणे ऐकू येत होता. २.१७ ला पुन्हा जमीन हलली! त्यानंतर २.१९ ला पुन्हा एक धक्का बसला!

हा भूकंप झाला तेव्हा आपली उडालेली तारांबळ आणि दुसरीकडे मदतीच्या कामात आग्रहाने काम करणारे आपण! खरे कोण आणि खोटे कोण? सगळाच विचित्रपणा होता!

आपण लोक किती सुखी आहोत. या दुःखी बांधवांचे सर्वस्व गेलेय. आपण फक्त त्यांच्या तात्पुरत्या सोयी लावण्यासाठी इथे येतो. अशानं त्यांचे गेलेले सर्वस्व परत थोडेच येणार आहे? आणि या ठिकाणी आपण अजून किती काळ काम करू शकू? आपली क्षमता खरंच तेवढी आहे का?

मात्र या दुःखी बांधवांना मदत करण्याच्या कामात आपला खारीचा वाटा आहे, यात समाधान आहे. लष्कराला आणि शासनाला अनेक स्वयंसेवी संघटनेची व कार्यकर्त्यांची मदत लाभलीय. दुःखी बांधव अधिक विश्वासाने कार्यकर्त्यांकडे पाहत आहेत.

त्यामुळेच उजाड झालेल्या वस्त्या, वास्तू भविष्यात येथे नव्या रूपात व भक्कमपणे उभ्या राहिलेल्या दिसतील, मात्र भविष्यात निसर्गाने सुद्धा या बांधवांना साथ द्यायला हवीय, नाही का?

# भटकंती मनसोक्त

निसर्ग प्रेमी मित्र-मैत्रिणींनो, तुम्हाला फिरायला, मनसोक्त भटकायला आवडते ना? माझे तर ठाम मत आहे की, भटकंतीची आवड ज्याला नाही, तो या छान व सुंदर आयुष्यातील महत्वाचे आनंदी क्षण घालवून बसलाय.

मनसोक्त भटकताना मिळणारा आनंद शब्दांच्या पलीकडचा आहे. मात्र हा आनंद घेताना आपण किती सावध आणि चतुर असायला हवे. याच विषयी मला काही सांगायचंय.

मात्र हे सांगणे अनुभवी आणि निष्णात भ्रमण करणारांसाठी नाही, हे सर्वसामान्य आणि नवख्या भ्रमणप्रेमींकरीता आहे.

## मनसोक्त फिरा, पण.........

आपल्या अवती भवती असंख्य पर्यटन संस्था कार्यरत असतात. त्यातील मान्यवर व चांगली सेवा देणाऱ्या संस्था पर्यटकांची नीट काळजी घेतात. इतरांचे काय? शिवाय अलीकडे महागडी रक्कम त्यांना देण्यापेक्षा स्वतंत्र ग्रुपने फिरून मनसोक्तपणे पर्यटन करावे, असे मानणारा मोठा वर्ग आपल्यात आहे.

यात नियोजनाची जबाबदारी असली तरी वेगळ्या अनुभवातून गैरसोयींना सामोरे जाताना आणि त्या सोडविताना आपला आत्मविश्वास वाढतो. वेळापत्रकाचे बंधन नसते. नीट नियोजन करून कमी पैशात जास्त भटकंती होते. स्वतंत्रपणे

केलेल्या प्रवासाचा आनंदही मिळतो. आकस्मिक अडचणींना सामोरे जाण्यात एक वेगळेच थ्रिल असते, नाही का?

आपण शाळा-कॉलेज, नोकरी, व्यवसायाच्या निमित्ताने आणि नंतर निवृत्ती-मध्ये निरंतर फिरत भटकत असतो. यातून निरनिराळे अनुभव मिळत जातात. आपण घरातून बाहेर पडल्यावर आपली नेहेमीची हद्द ओलांडल्यानंतर म्हणजेच गाव, शहर, राज्य, आणि आपला देश, यांच्या सीमा ओलांडल्यानंतर प्रवासात आपली नजर नीट उघडी ठेवावी. थोडेही गाफील राहू नये. नाहीतर गोत्यात येऊन आपल्यासह इतरांचेही नुकसान होईल.

## प्रवासाला निघाल तेव्हा सोबत काय घ्याल?

जेवढी जास्त ठिकाणे करीत असाल तेवढा अधिक कालावधी तुम्हाला लागेल. त्या दृष्टीने तुम्ही सामान घ्यावे. अंथरूण-पांघरूण, कपडे आवश्यक तेवढेच घ्यावेत. लिखाणाची, नोंद ठेवण्याची आवड असल्यास पेन, पेन्सील वही/डायरी हवी. कॅमेरा प्रवासात महत्वाचा सोबती असतो. पण तूम्हाला फोटो काढता येत नसतील तर? गृपमधल्या इतरांची अथवा नवीन परिचितांची अशावेळी मदत घ्या. लक्षात ठेवा, आपण पाहिलेले प्रत्यक्ष स्थळ ही कायम आठवण म्हणून निर्मिती करण्याचे काम तुमचा कॅमेरा करीत असतो. म्हणून तो हवा.

### *औषधे :-

आपण एकदा घराबाहेर पडलो की तेलाची पोळी चपाती, तुपातील जेवण, आवडती चटणी-लोणचे-मुरंबा-जॅम/सॉस सगळीकडेच खायला थोडे मिळते? मग

जे काही मिळते ते खावे लागते. ते सर्वांनाच पचते असे नाही. कधी कधी अपचन देखील होते. आपल्या तोंडाची चव जाते.

बदलते हवामान, प्रवासाची दगदग, विश्रांतीमध्ये अनियमितपणा, वेगवेगळ्या तेल तुपातली किंवा कोरडी पोळी चपाती व इतर पदार्थ खाणे, अस्वच्छ वातावरण, झोप न मिळणे, या साऱ्यांमुळे आपण अस्वस्थ होत राहातो. अशा वेळी तब्येत बिघडली की प्रवास अर्ध्यावर सोडायची पाळी येते. कधी उपचारासाठी डॉक्टर्स, दवाखाने/हॉस्पिटल्स शोधावे लागतात. ते उपलब्ध झाले तरी अडचणी येतात. मात्र त्या ठिकाणचे उपचार स्वीकारावे लागतात. या सगळयाचा परिणाम आपल्यासह इतर सहप्रवाशांवरही होतो.

हे टाळण्याकरीता प्रवासापूर्वी खबरदारी घ्यायला हवीय. त्याकरीता तुम्ही काय कराल?

तुम्ही निरोगी असलात, तरी सर्वसाधारण प्रवासात लागणारी औषधे जवळ बाळगा. त्यासाठी तुमचे फ़ॅमिली डॉक्टर्स तुम्हाला गाईड करतील. तुम्ही अगोदर कोठल्या आजारपणातून बरे झाले असाल, कोणते ऑपरेशन झालेले असेल, रक्तदाब-हदयविकाराचे किंवा आणखी कोणते उपचार सुरू असतील आणि तरीही तुमच्यावर प्रवास करण्याची पाळी आलीय अथवा इतरांच्या आग्रहामुळे तुम्ही प्रवासास जाणार असाल, तर नीट विचार करून निघा. तुमच्या तज्ञ डॉक्टर्सचा आधी विचार घ्या. त्यांनी सल्ला दिल्यावर निघा.

प्रवासात नेहेमीची औषधे, इंजेक्शन्स शिरींजसह जवळ ठेवा. ती संपण्यापूर्वी खरेदी करून ठेवा. त्यांचे डोस वेळेवर घेत जा. सहप्रवाशाना त्याची माहिती अवश्य द्या. प्रवासातील खाण्यावर नियंत्रणही ठेवा.

## *प्रवासातील विश्रांती व झोप :-

आपल्या भटकंतीत स्वतःच्या शरीराला नीट विश्रांती अन झोप अत्यंत जरुरीची असते. परंतु रेल्वे/बस/विमान/छोटे मोठे वाहन, त्यातल्या गैरसोयी, म्हणजेच तांत्रिक बिघाड, प्रवासात मिळणारे सिग्नल्स, ट्रॅफिक जॅम, खराब हवामान, स्थानिक आंदोलने, अशा कितीतरी अडचणी प्रवासात व्यत्यय आणीत असतात. अशा वेळी तुम्ही विश्रांती तरी किती व कशी घेणार?

घरी असताना नियमितपणे रात्रीची निवांत झोप मिळते. काहींना दुपारी वामकुक्षी करायला मिळते. प्रवासात हे सारखे शक्य नसते. वाहनातून होणाऱ्या प्रवासात आरामदायी सीट मिळाली तरी तासनतास बसून राहणे अवघड असते. रेल्वेत बर्थवर हवे तसे पसरता येते. सर्वत्र फिरताही येते. मात्र सर्व ठिकाणी रेल्वेचा प्रवास शक्य नसतो. तेव्हा, तुम्ही अशा स्थितीत मिळेल तेवढी विश्रांती व झोप घ्या, व संधी मिळाली तर पाय मोकळे करण्यासाठी थोडे तरी चाला-फिरा. त्यामुळे तुम्ही प्रवासात नेहेमी फ्रेश राहाल.

## *वाहनातून फिराल तेव्हा :-

आपले स्वतःचे वाहन व ग्रुपमधील इतरांचे वाहन अथवा भाड्याने घेतलेले वाहन प्रवासासाठी घ्यायचे आपण ठरविलेत, तर ते वाहन तंदुरुस्त म्हणजे चांगल्या स्थितीतील आहे का, याची खात्री करून घ्या. वाहन चालक, त्याचा-क्लिनर अनुभवी आणि चांगला हवा. लांबचा प्रवास असेल, तर दोन चालक असावयास हवेत. प्रवासात त्या दोघांनाही आराम मिळतो व आपणही सुरक्षित राहातो.

वाहन कितीही चांगले असले, तरी त्यात केव्हाही तांत्रिक बिघाड होतो. टायर्स कधी पंक्चर्स होतात, तर कधी आपली गाडी तापते! अती उष्म्याने टायर फाटून अपघातही होतात. कधी बॅटरी कमी होते, लाईट्स जातात. स्टारटिंग ट्रबल सुरू होतो. पावसात आणि पहाटेच्या धुक्यामध्ये समोरचे नीट दिसत नाही. कधी वायफर्स बिघडतात. असे किती प्रकार सांगावेत?

वाहन प्रवास हा अडचणीशिवाय सहसा पार पडत नाही. म्हणून तुम्ही प्रवासाला निघण्यापूर्वी आपले वाहन छान पैकी ' तयार ' करून घ्या. ते तपासून घ्या. जादा टायर, ट्यूब अद्ययावत करून घ्या. जॅक, प्लग-पान्हा किट/इतर टूल्स तयार ठेवा. गाडीचे साईड/फ्रंट/बॅकग्लास तसेच लाईट्स तपासून चालू करून घ्या. गाडीची सर्व्हिसिंग पण करून घ्या. फॅाग लाईट्स गाडीला हवेतच. आतील लाईट्स, स्पीकर्स देखील आवश्यक आहेत. हल्ली सीटबेल्टस गाडीत असतात ते अवश्य वापरा.

प्रवासी वाहनाच्या टपावरील सामानाचे कॅरेज/हौद व्यवस्थित करून रस्सीसह तयार ठेवा. लहान वाहन असेल तर त्याच्या टपावर काथ्याची जाड तयार चटई अंथरून बांधून घ्यावी. त्यामुळे उन्हाळयामध्ये दिवसा प्रवास करताना आत गारवा राहातो. मात्र अधून मधून पाण्याचा शिडकावा त्यावर व्हावा. तुम्ही म्हणाल, आमच्या गाडीत तर एसी आहे, कशाला हवाय टपावर काथा आणि जाड चटई?, तुम्ही हे लक्षात ठेवा की प्रवासात आपले इंधन जास्तीत जास्त वाचवावे, कारण सर्वत्र पेट्रोल-डिझेल-सीएनजी, किंवा ई चार्जिंगची सोय नसते. दुर्दैवाने कुठे इंधन संपले तर आहे त्या ठिकाणी थांबावे लागते आणि ते सुरक्षित नसते.

आपल्या वाहनात इंजिन ऑईल आणि पाण्याने भरलेले कॅन्सदेखील असावयास हवेत.

तसेच, सुरक्षेसाठी वाहनाचे लॉक असले. तरी फक्त डोअर लॉकच नव्हे, तर पेट्रोल टाकी व जादा टायर्ससाठीही वेगळे लॉक असावे. त्याचप्रमाणे पेट्रोल/डिझेल/सीएनजी/ इ चार्जिंग पुढे कुठे मिळेल, टायरचे पंक्चर्स कुठे काढले जाईल, रिपेरिंग गॅरेज कोठे असेल, ही सारी माहिती खबरदारी म्हणून अगोदरच मिळवावी.

प्रवासात वाहनाचे पार्किंग करणे ही छोटी समस्या नव्हे! गर्दीच्या ठिकाणी गाडी पार्किंग करताना मोठी पंचाईत होते. स्थानिक व्यापारी त्याचा गैरफायदा घेतात. प्रायव्हेट पार्किंगसाठी मोठे शुल्क द्यावे लागते, परंतु वाहन सुरक्षेची मात्र गॅरंटी नसते! काय करणार अशा वेळी? अशा परिस्थितीत सुरक्षित व अधिकृत पार्किंगचा व्यवस्थेचा शोध घ्यावा. खबरदारी म्हणून आपला चालकही गाडी जवळ ठेवावा. तेही नको असल्यास सरळ काहीशा दूर अंतरावर मोकळ्या पण सुरक्षित वाटणाऱ्या ठिकाणी वाहन पार्क करावे.

## *प्रवासातील निवास, मुक्काम व सुरक्षा :-

घरून निघण्यापूर्वी प्रवासाचे नियोजन करून मुक्कामाचे ठिकाण ठरविले असेल तर अधिक उत्तम. मात्र प्रवासात आयत्यावेळी मिळणाऱ्या मुक्कामाच्या ठिकाणी खबरदारीने राहा. आपले ठेवलेले सामान कुलूपबंद करून ठेवा. बाहेर जाताना खोली-हॉलला स्वतःचेच टाळे लावा. बाहेरून आल्यावर अगोदर ठेवलेले सामान त्याच ठिकाणी व व्यवस्थित स्थितीत आहे की नाही, ते बघा. जोखमीच्या वस्तू येता जाता जवळच ठेवा.

अर्थात, सर्वच ठिकाणी हे जमत नाही. तेव्हा, निदान कोणाला संशय येणार नाही अशा सामानात महत्वाच्या वस्तू/पैसे ठेवावेत. वास्तविक प्रवासात जोखमीच्या वस्तू, तसेच जास्त रोख रक्कम घेऊ नये. दागदागिने तर नकोतच. ते असली-नकली कसेही असले तरी चोरटे त्यावर नजर ठेवून लुटतात व त्यामुळे जीवाला धोकाही होतो.

पैशांच्या बाबतीत बोलायचे तर रोख रक्कमेऐवजी डेबिट/क्रेडिट कार्ड अथवा ट्रॅव्हलर्स चेक्स जवळ बाळगावेत. ते सर्वात सुरक्षित. पण काही ठिकाणी एटीएम सेंटर/बॅंक नसेल तर, किंवा वीजे अभावी यंत्रणा बंद असली की मोठी पंचाईत होते. अशा प्रसंगी राखीव स्वरूपात जवळ असलेली रोख रक्कम उपयोगी ठरते. मात्र ती सुरक्षितपणे व विभागून ठेवावी.

रेल्वे प्रवासात बॅगा, सुटकेसेस साखळीबंद करून लॉक कराव्यात. छोटया पर्सेस, पाऊच चांगले बंध असलेले घ्यावेत. स्टमक पाऊच, पिट्टू सॅक सगळयात उत्तम.

## *प्रवासातील खरेदी:--

महाराष्ट्रात, तसेच महाराष्ट्राबाहेर फिरताना प्रत्येक ठिकाणचे वेगळे वैशिष्ट्य असते ते खरेदीचे. कुठे लाकडी कला कुसरीच्या वस्तू व खेळणी चांगली मिळतात, तर कुठे शाली अन चादरी प्रसिद्ध असतात. तांब्या-पितळेच्या वस्तु, चांदी, चिनीमातीच्या कलात्मक वस्तू, स्पोर्ट शूज, संगीत वाध्ये, लाकडी किंवा धातूच्या शिल्पवस्तू, छान कपडे, साड्या, दुर्मिळ, आणि असली रुद्राक्ष, मणी-मोत्यांच्या

माळा, अशा किती तरी वस्तू विशिष्ठ ठिकाणीच घ्या, असे आपल्याला निघण्यापूर्वी बरेच माहितगार सांगतात. त्या त्या ठिकाणी सुद्दा हे सांगितले जाते.

आपण प्रवासास गेलो की अशी खरेदी व्हायलाच हवी. परंतु आपण फिरायला जातो, भटकतो ते कशासाठी असते सांगा? आपण नवनवीन ठिकाणे बघावीत, प्राचीन वास्तू, तीर्थक्षेत्र पाहायला जास्त वेळ घ्यायचा हा प्रवास पर्यटनाचा मुख्य हेतू असतो. त्याऐवजी आपण खरेदीसाठी दिवसभर बाजार पालथे घालणे योग्य आहे का? आपण खरेदीत जास्त स्वारस्य दाखविले, तर प्रवासातील पुढचे वेळापत्रक कोलमडुन जाते.

काही ठिकाणे पाहण्यासाठी वेळेचे बंधन असते. पण आपण खरेदीमध्ये गुंग होऊन जातो. काही लबाड प्रवासी एजंट आपल्याला बोलून संमोहित करून टाकतात! म्हणून तुम्ही विचार करा आणि खरेदीपेक्षा स्थल दर्शनाला जास्त महत्व द्या.

मी मुंबईकर असल्याने चतुर खरेदीदार आहे. साऱ्या दुनियेतल्या वस्तू आमच्या मुंबईत मिळतात. त्यातही आपण बार्गेनिंग केली, तर वस्तू स्वस्तात मिळतात. तुम्हीही चतुर राहा आणि खरेदीपेक्षा फिरण्यावर भर द्या. मात्र काही ठिकाणी मिळणाऱ्या दुर्मिळ व चांगल्या वस्तू, फळे, मिठाई, जेवण, खाद्यपदार्थ, यांचा अवश्य लाभ घ्या. उदा. नाशिकचे मनुका-बेदाणे, कुलू मनालीची लिची, शिर्डीतील गोड पेरू, डाळींब, रामफळे, राजस्थानची डालबाटी, घट्ट दुधातला मधुर चहा, जयपूर,उदयपुरचे नमकीन; चंदीगढचे तूप व तुपातली मिठाई, लोणची-अचार, गोव्याचे काजूगर, सावंतवाडीची लाकडी खेळणी, सातारचे कंदी पेढे, पुण्याची बाकरवडी, सोलापुरी चादरी, ओरंगाबादची पैठणी, कोल्हापुरी साज आणि ठुशी,

दार्जिलिंगचा जगप्रसिद्ध पत्ती चहा, तिबेटी गालिचे, काश्मीरच्च्या मऊ शाली, पष्मीना, केशर, भंडारदरा-बारीमध्ये मिळणारा असली माव्याचा पेढा, सुरती साड्या, मद्रासी कॉफी, कोलकात्यामधील रसगुल्ले, बंगाली मिठाई, नागपूरकडची आंबटगोड संत्री व बर्फी, अंदमानचे नारळपाणी, हैद्राबादी मटण, महाबळेश्वरची स्टॅाबेरी, किंनोर-हिमांचलची सफरचंदे, नेपाळी रुद्राक्ष, अस्सल गुजराती जेवण आणि उंधियो...... ही यादी वाढतच जाईल. तुम्ही हे सगळे पहा. खरेदी करा व पदार्थांचा आस्वादही घ्या, पण वेळ, तब्येत आणि खिसापाकिट सांभाळून!

## *फोटोग्राफी:--

आपण पाहिलेल्या पर्यटन स्थळांची चिरंतन आठवण आपल्या संग्रही राहावी, म्हणुन प्रवासात कॅमेरा अवश्य हवा. पण त्याकरीता बेसिक फोटोग्राफीचे ज्ञान असणे गरजेचे आहे. प्रवासात आपण भेट दिलेले प्रत्येक स्थळ, त्याचे ऐतेहासिक महत्व, जवळचा परिसर, त्याचप्रमाणे तुमचे स्वतःचे, ग्रुपचे, कधी स्थानिकांचे, असे सर्व फोटो तुम्ही अवश्य घ्या. हे करताना त्या स्थळाचे नाव, परिसर नीट लक्षात ठेवा व त्याची नोंद ठेवा. हे देखील लक्षात ठेवा की, त्या स्थळापेक्षा आपण दुय्यम आहोत.

काहीजण आठवण म्हणून आपले नाव पत्ता, प्रवासाची तारीख, भेट दिलेल्या ठिकाणी लिहून किंवा कोरुन ठेवतात. त्यासाठी काही प्रवासी खडू, पेन-मार्कर किंवा रंग-ब्रश स्वतः जवळ बाळगतात. ही वाईट सवय आहे. तुम्ही असे कधीही करू नका, आणि इतराना देखील तसे करू देऊ नका.

प्रवासात बऱ्याचदा नदी नाले, ओढे, उत्तुंग इमारती, शिल्प, प्रवेशद्वारे, कमानी, स्तूप, तसेच, पक्षी-प्राणी-जलचर, वेधक व्यक्ती, देवालये, इत्यादींचे चित्रण

करण्याची चांगली संधी आपल्याला मिळते. मात्र त्यासाठी आपल्या जवळ कॅमेरा हवा.

काही ठिकाणी प्रवासात आपल्याला फोटोग्राफी करता येत नाही. उदा. काही प्राचीन देवालये, दुर्मिळ शिल्प वस्तू, संरक्षित वास्तू, सैन्याच्या नियंत्रणाखालील परिसर, अशा ठिकाणी तुम्ही फोटो काढण्याचे धाडस कृपा करून करू नका. नाहीतर, तुमचा कॅमेरा जप्त करण्यात येईल आणि नसत्या अडचणी तुमच्या तसेच सहप्रवाशांच्या मागे लागतील.

## *प्रवासातील नोंदी :--

आपल्या प्रवासात, ग्रुपमध्ये एखादी व्यक्ती हौशी व उत्साही असते. तीला प्रत्येक स्थळाची, प्रसंगाची माहिती स्वतःकडे नोंदवून ठेवायची सवय असते. अशा हौशी सवंगड्याकडे आपण प्रवासातील सर्व नोंदींची जबाबदारी द्यावी. त्याचा तुमच्या संपूर्ण नियोजनात उपयोग होईल. यामुळे सगळ्या गोष्टींची नीट माहिती देखील राहील. शिवाय, भविष्यात तुमच्याच परिचितांना त्यांचे कार्यक्रम आखताना या नोंदी उपयुक्त ठरतील.

या नोंदीमध्ये कार्यक्रमाचा दैनंदिन प्रवासमार्ग, स्थळाचे महत्व, यात्री निवास, संपर्कात आलेल्या महत्वाच्या व्यक्ती, आकस्मिक परिस्थिती उदभवल्यास लागणारी माहिती, दैनंदिन खर्च उत्यादी सर्व तपशील समाविष्ट करावा.

## *भटकंतीचे पूर्वनियोजन:-

प्रवासाचा प्रारंभ करण्यापूर्वी किमान तीन महिने अगोदर आपण पूर्ण कार्यक्रमाची नीट आखणी करावयास हवी. रेल्वे-बस-विमानाचे आगाऊ आरक्षण, बस-खासगी वाहन मालक-एजन्सीकडून चांगल्या वाहनांची निश्चिती, सुरक्षित मुक्कामांची खात्रीशीर माहिती, यापूर्वी जाऊन आलेल्या परिचित, अनुभवी लोकांकडून मिळविलेली माहिती, हे सारे तुमच्या पूर्वनियोजनात अत्यंत आवश्यक आहे.

हल्ली खूप पर्यटन संस्था देशात, परदेशात कार्यरत आहेत. त्यांचेकडे सहज चौकशी केली तरी चांगले मार्गदर्शन मिळते. विविध राज्यांच्या पर्यटनसंस्था ही माहिती देण्यास तत्पर असतात. पर्यटन विशेषांक, मासिके, वर्तमानपत्रातील काही लेख, पुस्तके, यांच्या वाचनाचाही चांगला उपयोग करून घ्यावा.

आता तर, आपल्या मोबाईल फोनवर जगभरातील प्रत्येक माहिती क्षणात मिळू शकते! एवढे लक्षात ठेवा की, जेवढे चांगले पूर्वनियोजन तुम्ही कराल, तेवढा तुमचा प्रवास उत्तम होईल. तेच पर्यटन तुम्हाला अधिक आनंद देईल.

## *सावधान :-

तुम्ही तुमचा प्रवास निर्धास्तपणे करा. प्रवासात आनंदी व हसतमुख राहा. नव नव्या मित्र मैत्रिणींचे तुम्ही सवंगडी व्हा. इतरांना फिरण्यास प्रोत्साहन द्या. मात्र तुमच्या प्रवासात सदैव सावध असा. पैसे, वस्तू, व तुम्ही स्वतः इतरांसह सुखरूपपणे घरपोच यायला हवेय, याचे नेहेमी भान असू द्या.

तुम्ही म्हणाल, हे पुन्हा पुन्हा का सांगताय? -सावध राहा, सावध राहा म्हणून? अशाने नवखा पर्यटन प्रेमी घाबरून नाही का जाणार? कधी फिरण्यासाठी तो बाहेर पडणारच नाही.

मित्र हो, मला व इतरांना आलेले वाईट अनुभव तुम्हा कोणासही येऊ नयेत, तुम्ही सारे आनंद यात्री व्हावे, अपरिचित ठिकाणी तुम्ही संकटात सापडू नये, अशी माझी प्रामाणिक इच्छा आहे.

पैसे लुटले गेल्यानंतर घरी परतायला व खायला पैसे मागणारे दाम्पत्य मी हरद्वारला पाहिलेय. शाब्दिक गैरसमजामुळे अंगावर धावून येणारा माणूस मी सिलगुढी ते दार्जिलिंग प्रवासात अनुभवलाय. किमती कापड खरेदीसाठी संमोहित केल्यानंतर संपूर्ण ग्रुप तासनतास कसा टेक्सटाईल इम्पोरियम मध्ये वेळ घालवतो व भरमसाठ खरेदी करतो, याची प्रत्यक्ष प्रचिती मी राजस्थानात घेतलीय. रेल्वे प्रवासात ठेवलेली किंमती सामानाची सुटकेस अवघ्या पाच मिनिटात लंपास झाल्यावर रडवेले झालेले श्रीमंत बंगाली कुटुंब मी जलपायगुडीमध्ये बघितलेय.

वस्तू विकत घेत नसाल, तर ताबडतोब माझ्या दुकाना समोरील जागेतून तुमची गाडी हलवा, असे धमकवणारा आळंदीकर माझ्या चांगला लक्षात राहिलाय. चपला ठेवायला भलीमोठी रांग पाहून गेटपाशी त्या ठेवल्यानंतर, परतताना त्या चपला नाहीशा झाल्यावर केवढी पंचाईत होते, ते श्रीसाईंच्या शिर्डीत आम्ही अनुभवलेय. मोठ्या ग्रुपमधून हरद्वार ते दिल्लीच्या प्रवासात बसमध्ये रॅकवर ठेवलेली आमची बॅग शेजारच्या चोरट्या प्रवाशाने गुपचूप पळवून नेल्यानंतर आमच्यावर जी आपत्ती कोसळली, ती अजून आम्ही विसरलेलो नाही. स्नान करून ओल्या वस्त्रानेच देवळात जायची परंपरा आहे, त्याबरोबर नवीन पंचा उपरणे लागेल ते आम्ही देऊ,

त्याशिवाय श्री शनीच्या देवळात तुम्हाला प्रवेश मिळणार नाही, शनी देवाला वाहायला कॅनभर तेल लागेल ते आमच्याकडूनच घ्या, असे बेधडक खोटे बोलून भाविकांना कापणारे शनी शिंगणापूरचे काही दुकानदार आम्ही अनुभवले आहेत.

एवढेच नव्हे, तर रेल्वेमध्ये प्रवाशांशी ओळख वाढवीत स्वतःचे खाणे-खाऊ/फळे देऊन, नंतर गुंगी आलेल्या प्रवाशांना लुटणारी टोळी पोलिसांनी पकडल्याचे वर्तमानपत्रात तुम्ही-आम्ही नेहेमी वाचत आहोत. गर्दीमध्ये बसण्याच्या जागेवरून शाब्दिक बोलचाली होता होता चालत्या गाडीतून बाहेर ढकलण्याच्या घटनासुद्धा अवतीभवती घडलेल्या आहेत. असे दुःखद अनुभव तुम्हाला येऊ नयेत. तुमची सफर निर्विघ्नपणे आणि आनंदमयी व्हावी, असे मला वाटते.

## *ही ठिकाणी आयुष्यात एकदा तरी पहा:--

अंदमानचे जेल, जालियनवाला बाग, वाघा बॉर्डर, कन्याकुमारी, पेरियार, बनारस, गोमुख, गंगणानी(उत्तर काशी), पशुपतीनाथ, पुष्कर येथील घाट, हल्दीघाट, हवामहल, दूधसागर, पुत्तीचेरी, हावडा ब्रिज, टायगर हिल(दार्जिलिंग) व तिबेटीयन रिफ्युजी कॅम्प, कोलकात्यातील बेल्लूर मठ व शांती निकेतन. ताजमहाल, सुवर्णमंदिर व जालियनवाला बाग, हरद्वार-ऋषिकेश, मलाना व मणिकरण(कुलू), इंडिया गेट, दूध सागर धबधबा,...........

## *आणि, आपल्या महाराष्ट्रात फिरताना :-

शिवदुर्ग रायगड, पावनखिंड, सिंहगड, श्रीशंभुराजांचे तुळापूर येथील स्मृतिस्थळ, तारकर्ली बीच, चवदार तळे, जुने महाबळेश्वर, हेमलकसा-आनंदवन, भामरागड, श्रीमंत पेशव्यांचे गाव श्रीवर्धन, कोकणकडा-हरिश्चंद्रगड, शेगाव व आनंदसागर, ब्रह्मगिरी, अजिंठा, नागफणी, सिंधुदुर्ग, शनिवारवाडा, श्रीमलंगगड, कागलजवळील श्रीकाडसिद्धेश्वर मठ, चिपळूणजवळचे मगर दर्शन केन्द्र, वेळासचे कासव प्रजनन केन्द्र, दापोलीचे कृषी विद्यापीठ व बुरोंडी,सावंतवाडीचा मोती तलाव, भंडारदरा जवळील अमृतेश्वर, गोरोबा काकांचे तेर, श्री क्षेत्र आळंदी,...............

पर्यटन स्थळांची ही यादी वाढतच राहील, म्हणून तुम्ही भटकंतीच्या पूर्व तयारीला लागा बघू……………..

# इतिहासात

इतिहास म्हटला की, ऐतेहासिक घटना आल्या, स्थळे आली, शूर वीर अन योध्याच्या कहाण्याही आल्या. मात्र भविष्यातील वाटचाल करताना प्रेरणा व बळ देणारा इतिहास आपल्या आयुष्यात जरूर हवा.

मी दुर्गप्रेमी आहे. त्यामुळे इतिहास मला कायम प्रेरणादायी ठरला आहे. दुर्ग भ्रमणाचा माझा छंद तर आयुष्याच्या वाटचालीत मला खूप फलदायी ठरला आहे.

माझा आवडता गड आहे पुण्याजवळील दुर्ग राजगड. मराठी स्वराज्याची ही पहिली राजधानी. स्वराज्य संस्थापक शिवप्रभूंच्या कार्यकर्तृत्वाची अनुभूती घेतलेला हा दुर्गम गड पुणे-वेल्हे-तोरणा परिसरात आजही भक्कम स्थितीत उभा आहे.

तुम्ही इतिहासाचे दर्दी असाल तर छानच. नसलात, तरी इतिहासाची सफर घडविणारे हे ' सुवर्ण पान ' तुम्ही जरूर वाचा.........

## अवतरली शिवशाही तेथे...

स्वराज्यभूषण छत्रपती शिवरायांचा राज्याभिषेक सोहळा साजरा झाल्याला आज तीनशे वर्षे वर्षाहून अधिक काळ लोटला आहे. हा सुयोग साधून मुंबईच्या यंग झिंगारो ट्रेकर्स(वाय. झेड. ट्रेकर्स) या प्रसिद्ध गिर्यारोहण संस्थेने ठरविले की पुणे येथील दुर्गम राजगडावर त्रिशताब्दी आगळ्या वेगळ्या रीतीने साजरी करायची. तेथे

गड जागरण करायचे! त्याकाळी असलेला जागता पहारा गडावर दिवसरात्र गडावर ठेवायचा, मराठमोळ्या मावळ्यांनी गड पूर्णपणे भरून टाकायचा. स्वराज्यातील सरदार-मान्यवर शूरवीरांसमवेत राजगडावरील सदर पून्हा भरवायची!

राजगडावर गड जागरणाचा कार्यक्रम निश्चित झाल्यावर आमचा यंग झिंगारो परिवार उत्साहाने कामाला लागला.

पुणे सातारा महामार्गावर नसरापूर फाटा लागतो. तेथून वेल्हे येथे जाणारा गाडी रस्ता आहे. वाटेत विंझर, मार्गासणी, साखर अशी गांवे लागतात. या गाववस्तीतून राजगडाच्या दिशेने जाणाऱ्या वाटा आहेत. गिर्यारोहक, आणि निसर्गप्रेमींना मोहात पाडील असा हा राजगड सहज साध्य नाही. त्यासाठी दोन,तीन तासांची पायपीट व चढण करावी लागते.

राजगडावर लांबच लांब पसरलेली सुवेळा माची, दुहेरी तटबंदीची संजीवनी माची, अभेद्य हत्ती खडक, झुंजार बुरुज, देखणा गुंजण दरवाजा, पाली दरवाजा, पद्मवतीदेवीचे मंदिर, उत्तुंग असा बालेकिल्ला, स्वच्छ नितळ व खोल पाण्याची विस्तीर्ण पसरलेली पाण्याची टाकी हे सारे आपल्याला भारावुन टाकते.

अशा सुंदर राजगडावर इतिहासकालीन पोशाखात दुर्गप्रेमी मावळे वावरणार होते. रोज गडावर पालखी निघणार होती. पहाऱ्याच्या मशाली पेटणार होत्या. किल्लेदारांचे अष्टोप्रहर पहारे बसणार होते. भालदार-चोपदार गडावर वावरणार होते. ऐतेहासिक सदर पुन्हा भरणार होती. केवढी ही अद्भुत कल्पना!

मग सारे मावळे तयारीस लागले. संस्थेच्या मुंबई पुण्यातील कार्यकर्त्यांनी या गड जागरण कार्यक्रमासाठी मदत, देणग्या गोळा करायला सुरुवात केली. त्याला प्रतिसादही चांगला मिळू लागला.

मी या वाय. झेड. चा एक सामान्य सदस्य होतो. गिरगावातील स. का. पाटील उद्यानात संस्थेच्या नियमित बैठकांना मी जाऊ लागलो. काही कामांची जबाबदारीही घेतली आणि जमेल तसा धावू लागलो.

या अपूर्व अशा गड जागरण सोहोळ्यात सहभागी होण्यासाठी राजमाता विजयाराजे शिंदे, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, दुर्गवेडे साहित्यिक गो. नी. दांडेकर, शिवभक्त साबीर शेख अशा मान्यवर व्यक्ती राजगडावर येणार होत्या. यापैकी, फक्त गो. नी. दांडेकर(यांना आम्ही अप्पा म्हणायचो) व साबीरभाई शेख हे दोघे राजगडावर उपस्थित राहिले. इतरांना आकस्मिक आलेल्या अडचणींमुळे सहभागी होता आले नाही.

महाराष्ट्राचे प्रसिद्ध शिल्पकार अण्णा सहस्रबुद्धे यांचेकडून संस्थेने छत्रपती शिवरायांचे सिंहासनावर बसलेले ब्रॉंझवर्णाचे सुंदर शिल्प तयार करून घेतले होते. ते गडावर आणून स्थानापन्न करण्यात आले.

स्वराज्यात राजगडावर ज्या ठिकाणी जरीपटका फडकत असे, तेथे गड जागरणाचा मुख्य सोहोळा साजरा झाला. गो. नी. दांडेकरांनी जरीपटका फडकाऊन गडजागरण सोहोळयाचे औपचारिक उदघाटन केले. त्यावेळी ते भारावून गेले होते. ते म्हणाले, ' आज कित्येक वर्षांनी हा ध्वज येथे फडकतोय, तो राजा धन्य होईल तुमच्यावर.'

आमच्या संस्थेचे संक्षिप्त नाव होते ' वाय झेड ' ते अप्पांना विचित्र वाटले असावे. आपल्या भाषणात ते म्हणाले,' एवढं चांगलं कृत्य करणारी तुमची संस्था आहे, पण तुम्ही हे ‘वाय. झेड.’ नाव प्रथम बदलायला हवंय. बोला, बदलणार तुम्ही हे नांव? ' भारावलेल्या बहुतेकांनी त्या समयी होकार दिला. मात्र ही गिर्यारोहण संस्था

आजही ' वाय.झेड.(म्हणजे यंग झिंगारो) ' म्हणून कार्यरत आहे. महाराष्ट्रात नावारूपाला आलेल्या या संस्थेचे ५०० हुन अधिक ' यंग झिंगारो' आहेत.

राजगडावरील गड जागरण सोहळा पाच दिवस चालला होता. या काळात गडावर रोज पालखी निघायची. त्यावेळच्या वेशातील मानकरी मंडळी-भालदार, चोपदार, तुतारी वाजविणारे, लालकेशरी पागोटी आणि ढाल-तलवारी हाती घेतलेले मराठमोळे मावळे, नऊवारी साड्या ल्यालेल्या महिला, लेझीम-ढोलवाले,.......... असा सारा जामानिमा पालखीबरोबर असायचा.

ही पालखी पद्मावती माचीवरून निघायची व सुवेळामाचीच्या दिशेने जायची. परत वाजतगाजत पद्मावतीवर यायची. गडावर वासुदेवाची देखील फेरी व्हायची.

देखण्या अशा राजगडावर पुन्हा शिवशाही अवतरलीय याचा प्रत्यय आम्ही दररोज घेत होतो. गडावरील ' सदर ' पुण्याच्या मित्रांनी छान सजवली होती. बाबासाहेब पुरंदरे यांनी निर्मिलेल्या ‘ जाणता राजा ‘ या विक्रमी कार्यक्रमातील हे कलावंत मित्र होते. सदर दरबारातील सिंहासन, दरबार, बैठका, विविध दालने, सदर सजावटीसह इतर सर्व कामांकडे आमचा तात्या ताम्हणकर विशेष लक्ष देत होता. सदरेवर शिवराज्याभिषेक सोहळा मोठ्या जल्लोषात साजरा झाला.

राजगडाचे मध्यवर्ती ठिकाण म्हणजे पद्मावती माची. पद्मावती मंदिराच्या प्रशस्त जागेत बहुतेक कार्यक्रम सादर होत असत. या माचीवर वारा मात्र जोरदार असायचा! आमच्या जेवणावळीच्या पत्रावळी उडून जातील एवढा तुफान वारा इथं वाहायचा!

गड जागरण सोहळा नीटपणे पार पडावा म्हणून सिनिअर मंडळींनी कामाची विभागणी करून दिली होती. तरी काम करताना काही प्रमाणात गोंधळ व्हायचा.

ड्रेस, ढाली, तलवारी, भाले, पगडी, कर्णफुले, माळा, इतर दागिने, हे भाड्याने आणलेले सामान काही मावळे व्यवस्थितपणे बाळगीत नव्हते! दिवसभर पहाऱ्याची व इतर कामे करून बिचारे मावळे थकायचे व रात्री तंबूत शिरल्यावर अंगावरचा वेश, तलवार, पगडी काढणे त्यांच्या जीवावर येई! त्याऐवजी ऊशाला तशीच पगडी ठेऊन बिचारे मावळे झोपेच्या अधीन व्हायचे!

माझी ड्युटी सुवेळा माचीवर होती. पद्मावती माचीपासून लांब अंतरावर असलेली ही माची अतिशय सुंदर होती. या ठिकाणी मावळ्याची सेवा देताना मला विशेष आनंद होता. मात्र मला पोशाख मिळाला नव्हता. त्यामुळे मी सिव्हिल ड्रेसमध्ये माचीवर फिरायचो. एका सरदाराचा मी मदतनीस मावळा होतो.

त्या सरदाराचं नाव अशोक गायकवाड. त्याला हिरवाजर्द सरदारी पोशाख व स्वराज्यकालीन पगडी मिळाली होती. अशोक त्या पोशाखात खरा सरदार भासायचा. आम्ही दोघे जुने मित्र होतो. सुवेळामाचीवर दोघे बरोबरीने कामे करीत होतो. सुवेळावरील पहाऱ्याच्या बुरुजांवर शाळकरी आणि तरुण मंडळीच जास्त होती. चौदा-पंधरा वर्षाची ही मुले असावीत. त्यांचेकडे नीट लक्ष द्यावे लागे.

आमच्या ग्रुपमध्ये एक उत्साही मावळा होता. त्याचे वय असावे ३०-३२ वर्षे. त्या मावळयाचा स्वभाव थोडा विक्षिप्त होता!

एकदा रात्रीचा मुक्काम सुवेळा माचीवरील एका छोट्या पठारावर करायचे ठरले. तेथे मुक्कामी तंबू उभारण्यासाठी त्या जागेच्या दिशेने आम्ही रांग करून निघालो. एका मावळयाच्या पाठीवर त्यावेळी पिट्टू सॅक होती. त्याने स्वतःच्या पायातले हंटर शूज पायात घालण्याऐवजी सॅकला पाठी लटकावले होते. ते शूज लोंबकळत आणि सारखे त्याच्याच पाठीला लागत होते!

सूर्यास्ताची वेळ होती. त्या परिसरात झाडे झुडुपे बरीच होती. नवखे व लहान मावळे चालताना आधीच टरकले होते. त्यात, सॅकच्या पाठी शूज लावलेला तो मावळा म्हणू लागला-‘ माझ्या पाठी पाठी कोणीतरी येत आहे. ते सारखे धक्का देतेय मला! हे ऐकून बिचारे लहान मावळे बिथरले!

नंतर कसेबसे आम्ही त्यांच्यासह पठारावर पोहोचलो. तेथे तंबू लावताना जवळपास साप-विंचू येऊ नयेत म्हणून आमची साफसफाई सुरू झाली. इतक्यात त्या सॅकवाल्या मावळ्याने एक दगड उचलला, त्या खाली एक जिवंत विंचू मिळाला! मग काय! ' बापरे! विंचू, विंचू……' बिचारे मावळे ओरडू लागले. तेथले वातावरण गंभीर झाले!

मग आम्ही सावधपणे काम करीत दगड, छोटी रान झुडुपे व वाढलेले गवत बाजूला सारले. थोडा जाळ पण केला. चांगली सफाई केल्यानंतर त्या छोट्याशा पठारावर आम्ही तंबू लावले.

अशोकने ‘त्या’ मावळ्याला दम दिला. घाबरलेल्या मावळ्यांना समजावून शांतही केले. मग गंमतीजमती, विनोदाचे बोलणे सुरू झाले. त्यानंतर सगळे छान मूडमध्ये आले.

राजगडावर एकीकडे गाणे-पोवाड्याच्या तालमी होत होत्या, कारण गडावर आम्ही शाहिरी कार्यक्रम सादर करणार होतो. त्यासाठी आमच्यातले सात-आठ जण मुंबईत चांगली तयारी करून आले होते. गोंधळगीत, नमन, पोवाडे, महाराष्ट्र गीत, असे आमचे जंगी शाहिरी सादरीकरण होते.

आमच्या शाहीरांचे नाव बाळ(विजय) पंडित. हा पण माझा स्नेही! मुंबईतील त्याच्या रिकाम्या खोलीमध्ये आमच्या तालमी महिनाभर चालत होत्या.

आमचा शाहिरी कार्यक्रम पद्मावतीच्या देवळात रात्री सुरू झाला. या वेळी सुरुवातीला साबीर भाईंनी शिवकालीन पोवाडे आपल्या खणखणीत आवाजात म्हटले. हा माणूस पक्का शिवभक्त होता. स्वराज्याचा इतिहास, गडकोटांची इत्यंभूत माहिती यांना तिथी-वारासह तोंडपाठ होती! भाई किर्तनकार सुद्धा होते.

मुंबई दूरदर्शनची मोठी टीम राजगडावर चित्रीकरण करण्यासाठी आली होती. दूरदर्शनचे प्रसिद्ध कलावंत जयंत ओक यांनी उस्फूर्तपणे या कार्यक्रमात क्रिकेटची कॉमेडीयुक्त कॉमेंटरी सादर करून प्रेक्षकांची वाहवा मिळविली!

आमच्या शाहिरी कार्यक्रमाचा शेवट मोठा गमतीशीर झाला! एवढ्या रात्री उशिरापर्यंत आमचे प्रत्येक सादरीकरण पद्मावती मंदिरात बसलेले प्रेक्षक तल्लीनतेने ऐकत आणि पाहात होते. त्यांच्या चांगल्या प्रतिसादामुळे आमचा शाहीरांचा समूह एकापाठोपाठ एक अशी गीतं, पोवाडे, गोंधळ सादर करीत होता.

मात्र, आमच्यातल्या काही चिकित्सक शाहीरांनी बारकाईने चौफेर नजर मारल्यावर त्यांच्या लक्षात आले की, आम्हाला दाद देणारे दर्दी प्रेक्षक अंथरूण पांघरूण घेऊन मंदिरात झोपायला आले होते! कधी एकदा हा कार्यक्रम संपतोय, असे त्यांना झाले होते! कारण, आमची शाहीरी संपल्याशिवाय त्यांना मंदिरात पथारी पसरता येणार नव्हती!

असा हा ' राजगड जागरण सोहळा ' मोठ्या जल्लोषात संपन्न झाला आणि आम्ही शिवप्रेमी मावळे ऐतेहासिक आठवणी मनी जागवत राजगड उतरू लागलो. आमचा परतीचा प्रवास संपून सारे नेहेमीच्या रामरगाड्यात व शहरी वातावरणात गुंतून गेलो!

त्यानंतर, दोन तीनदा या दुर्गम राजगडावर माझे जाणे झालेय. अजूनही सारे काही आठवते व त्यावेळचे ऐतेहासिक क्षण मनी जागे होतात. राजगड देखील आमच्यासाठी आजही पुनः जागा होतो व साद घालून म्हणतो- ‘ माझ्या मराठमोळया मावळयांनो, माझ्या विस्तिर्ण सानिध्यात या आणि मनसोक्त रहा. हा राजगड तुमच्या स्वागताकरीता सदैव सज्ज आहे! ’

# परिसर

भटकंतीच्या निमित्ताने प्रवास करायची संधी खूपवेळा मिळाली. सह्याद्री आणि हिमालयीन पदभ्रमणासाठी देशभरात प्रसिद्ध असलेल्या युथ असोशिएशन ऑफ इंडिया या दिल्लीत मुख्यालय असलेल्या(YHAI ) संस्थेने आयोजित केलेल्या काही हिमालयीन पदभ्रमण मोहिमेत कॅम्प लीडर म्हणून काम करताना राजधानी दिल्लीचा परिसर मला पाहायला मिळाला. त्या राजधानीतील ही छोटीशी सफर.............

## रम्य आणि अगम्य राजधानी दिल्ली

रात्री अकराच्या सुमारास हरद्वारला आम्ही जी बस पकडली, ती निघाली होती दिल्लीला. बसमध्ये आमच्यासह सारे प्रवासी झोपेच्या मूडमध्ये होते. सगळे सामान टपावर चढवले अन आम्ही आत जागा पटकावली. काही वेळाने बस सुटली.

मला व नऱ्याला बसायला जागा नव्हती. उभे राहावे लागले. बाकीचे एव्हाना झोपेच्या अधीन झाले होते. बस वेगाने दिल्लीच्या दिशेने चालली होती. आम्हा दोघांना झोप येत होती. पण बसायला सीट्स नाहीत तर काय करणार? मग दोघांनी एक शक्कल काढली. बसच्या खिडक्यांना जाडजूड पडदे लावलेले होते, त्यातला

मोठा पडदा अंथरला खाली, त्यावर दोघे पसरलो. कानाजवळ बसच्या इंजिनाची सुरावट ऐकत कशीबशी झोप घेतली.

पहाटे पाचचा सुमार असावा. आमच्या बसने दिल्लीच्या आंतरराज्य बसस्थानकात प्रवेश केला. आम्ही सारे बसच्या टपावरील व आतमधील सामान उतरणे सुरू केले. एवढ्यात कुजबुज ऐकू आली, ‘ बॅग हरवली, बॅग हरवली.......'

आमच्याकडील एका बॅगेत संस्थेची महत्वाची कागदपत्रे, काही रक्कम, राजनच्या खाजगी वस्तू, असे महत्वाचे सामान ठेवले होते, ती बॅगच गहाळ झाली होती!

साऱ्यांचा मूड गेला. बस अजून तेथेच उभी होती. लगेच आम्ही बसचे कानाकोपरे धुंडाळले. पण काही उपयोग झाला नाही.

राजधानी दिल्लीमध्ये आमचे स्वागत असे झाले!

अशा या ऐतेहासिक राजधानीत आमचा दोन दिवस मुक्काम होता. या अल्प काळात मी बघितलेलं दिल्ली शहर कसे होते, ते सांगतो----

या शहराचे दोन भाग आहेत. जुनी दिल्ली-मुख्य शहर, आणि नियोजनातून वसलेले प्रशस्त असे नवी दिल्ली शहर. आपल्या महाराष्ट्रातील बहुतेकजण इथे आल्यानंतर महाराष्ट्र सदन अथवा महाराष्ट्र भवन राहण्यासाठी पसंत करतात. मात्र व्हीआयपी, राजकारणी नेते, प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते आणि त्यांच्या शिफारशीने येणारी माणसं महाराष्ट्र भवनात गर्दी करतात!

इतर महाराष्ट्रीयन माणसांना ‘महाराष्ट्र सदन’ आपलेसे वाटते. ते आहे नवी दिल्ली स्थानकापासून काही अंतरावर असणाऱ्या पहाडगंज परिसरात.

आम्हाला वरील दोन्ही ठिकाणी राहाता आले नाही, आमची सोय दिल्लीतल्या प्रसिद्ध चांदणी चौकाजवळील रायबहादूर धर्मशाळेत झाली. ही धर्मशाळा निःशुल्क आहे. परंतु नेहेमीचे फिरते व्यापारी, तसेच ओळखीचे लोक इथल्या व्यवस्थापकांशी सलगी करून धर्मशाळेतल्या खोल्या अडवुन ठेवतात! त्यांना 'चायपानी' देऊ केले, तर मात्र आपल्याला चटकन राहायला जागा मिळते!

रायबहादूर धर्मशाळेत लाईटचे भाडे वेगळे. संडासचे वेगळे. भल्या पहाटे संडासला जाताना हातात पैसे ठेवावे लागतात, नाहीतर तेथे प्रवेश मिळत नाही! या धर्मशाळेच्या आवारात एक इस्त्रीवाला आहे. आपण त्याच्याकडे इस्त्रीला कपडे दिले, आणि त्याने सांगितलेल्या वेळी कपडे आणायला गेलो, की तो तेथे नसतोच! जवळ चौकशी केली तर कोणालाच त्याची माहिती नसते! आपल्याकडे मर्यादित वेळ असल्यामुळे जास्त थांबता येत नाही. एक तर पूर्वनियोजित स्थळदर्शनामुळे कोठे जायचे असते, किंवा परतीच्या प्रवासाची घाई असते. अर्थात, इस्त्रीवाला मात्र बेपत्ताच असतो! ज्यांना धर्मशाळा सोडायची असते ते आपले कपडे नाईलाजाने तसेच निघून जातात. आमचे तेच होणार होते. मात्र आम्ही त्या इस्त्रीवाल्याचा शोध घेऊन आमचे कपडे परत मिळवले.

दिल्लीमध्ये हॉटेलपेक्षा धाब्यात लोक जास्त जातात. गंमत म्हणजे तेथे ऑर्डर दिल्यावर बऱ्याच वेळाने खाणे मिळते. गिऱ्हाईकं ते सहन करतात! पण धाब्याममधील पदार्थ गरमागरम, मसालेदार आणि चविष्ट असतात.

दिल्लीत लस्सी चांगली मिळते. मोठ्या स्टीलच्या ग्लासमध्ये सुगंधी लस्सी पिताना छान वाटते.

दिल्लीतील चांदणी चौक म्हणजे मुंबईतील जणू भेंडीबाजार! हा वर्दळीचा भाग आहे. छोटी मोठी दुकाने, मार्केट, काही ऑफिसेस, हॉटेल, धाबे यांच्या जोडीला शीखपंथीयांचा गुरुद्वारा, या साऱ्यांनी चांदणी चौक-फतेहपुरी परिसर वेढलेला आहे. शुक्रवारी नमाजसाठी मशिदी जवळील मुख्य रस्ता बंद होतो, तर शीख बांधवांच्या गुरुद्वारा जवळील प्रशस्त फुटपाथवरून वाटसरूला जाऊ देत नाहीत!

या राजधानीच्या शहरात बेकारांचा भरणा भरपूर आहे. शहरात सायकल रिक्षा बऱ्याच फिरताना दिसतात. मात्र तरुणांपेक्षा वयस्कर रिक्षावालेच सायकल रिक्षा चालवताना दिसतात. बिचारे धंदा चिकाटीने करतात. प्रवाशांची पाठ काही सोडीत नाहीत!

दिल्लीतली सर्वसामान्य हॉटेल्ससुद्धा मजेशीर अनुभव देतात. एका हॉटेलमध्ये बसलो होतो, तेथला वेटर मरगळल्यासारखे काम करीत होता. आम्ही मुंबईकडचे आहोत कळल्यावर मात्र त्याचा मरगळलेपणा गेला! आम्हाला त्याने अजीजीने विचारले, 'साब, बंबईमे मेरे लीये कुछ नौकरी मिलाकर दिजीए ना.', त्या बिचाऱ्याला नोकरी देण्याइतके आम्ही कोणी मोठे नव्हतो. मात्र त्यांची इथली काम करण्याची पद्दत मुंबईतील लोक सहन करतील काय?, आमच्या मुंबईतल्या हॉटेल्सच्या वेटर्सची कामातील चपळाई व बोलण्यातली अदब यांच्यात येईल का? असे प्रश्न माझ्या मनात उभे राहिले.

दिल्ली शहराचे भूषण ठरलेला प्रसिद्ध लाल किल्ला चांदणी चौकापासून फारसा लांब नाही. तेथे पर्यटकांची नेहेमी गर्दी असते. या किल्ल्यावर लष्कराचा वावर असतो. लालकिल्ल्यात खासगी दुकाने विखुरलेली आहेत. हा किल्ला लाल

तांबूस दगड, मातीने बांधलेला खराखुरा ' लाल' किल्ला आहे. तो पक्का मजबूत असून देखणा वाटतो.

दरवर्षी लाल किल्ल्यावर भारताचा स्वातंत्रदिन सोहोळा दिमाखात साजरा होतो. या किल्ल्याचे आणखी एक विशेष म्हणजे ' दिवाण-ए-आम ' व ' दिवाण-ए-खास ' हे दोन आलिशान व सुंदर असे राजमहाल! या महालातील उंच छत व अवती भवतीचे रेखीव, कोरीव काम पाहण्याजोगे आहे. या शिवाय, या किल्ल्यात इतिहासकालीन किमती प्रस्तरांची सिंहासने पाहायला मिळतात.

लाल किल्ल्याच्या प्रांगणात रोज संध्याकाळी एक विशेष दृक्षाव्य कार्यक्रम पर्यटकांना दाखविण्यात येतो. त्याला प्रेक्षक गर्दी करतात. हा ध्वनी-प्रकाशाचा मेळ साधणारा सुंदर कार्यक्रम असून यात किल्ल्याचा इतिहास व घटनांचे वर्णन सादर होते.

राजधानीतील नवी दिल्ली हे विस्तीर्ण शहर आहे. या शहरात लोकसभेची देखणी वास्तू, राष्ट्रपती भवन, सचिवालय आणि देशोदेशींच्या वकीलाती आहेत. केंद्रीय मंत्री, खासदार, व्हीआयपीज, हे देखील नवी दिल्लीत राहातात. स्वर्गीय लालबहादूर शास्त्री, पंडित नेहरू, महात्मा गांधी, इंदिरा गांधी, राजीव गांधी इ. प्रसिद्ध नेत्यांची समाधीस्थळे सुद्धा नवी दिल्लीतील विस्तीर्ण जागेत विसावली आहेत.

भारताच्या दिवंगत पंतप्रधान स्व. इंदिरा गांधींचे ' तीन मूर्ती सदन ‘ आता राष्ट्रीय स्मारक झालेय. त्यांना मारेकऱ्यांनी गोळ्या झाडल्या होत्या, त्यावेळचे रक्ताचे डाग अजूनही तेथे पाहायला मिळतात. त्यांचा ध्वनिमुद्रित आवाज ऐकताना आपण गंभीर होतो. त्यांचे स्मृती स्मारक म्हणून प्रसिद्ध असलेले ' शक्तीस्थळ '

पाहायलाही पर्यटक येतात. देशोदेशीचे दुर्मिळ प्रस्तर त्या ठिकाणी विशिष्ट पद्दतीने मांडून ठेवलेत.

दिल्ली शहराचा फेरफटका आपण खासगी व सरकारी पर्यटन संस्थेमार्फत करू शकतो. मात्र ती धावती व फसवी भेट असते. सर्व ठिकाणे आपण व्यवस्थित वेळ देऊन पाहू शकत नाही.

आम्ही एका खासगी पर्यटन बसने दिल्ली पाहिली. या घाईघाईच्या ट्रिपने आम्हाला फक्त कुतुब मिनार, बिर्ला मंदिर, इंडिया गेट, एक प्राणी संग्रहालय, इत्यादी पाहायला मिळाले. सुप्रीम कोर्ट, संसद भवन, परराष्ट्रांच्या वकीलाती, हे मात्र बसमधूनच (दूरदर्शन) बघावे लागले.

दिल्लीतील इंडिया गेट भव्य आणि प्रशस्त आहे. तेथल्या स्तंभावर युद्धात हौतात्म्य पत्करलेल्या भारतीय जवानांची नावे कोरलेली आहेत. वीर जवानांना मानवंदना देणारी ' ज्योत ' अखंडपणे तेवत असते. नवी दिल्लीत पाकिस्तानी वकीलातीची इमारत उठून दिसते.

दिल्लीत बिर्ला मंदिर पाहायला गेलो, तेव्हा आमच्यातल्या एकाच्या चपलाच गायब झाल्या! शेवटी आमच्या मित्राला अनवाणी बसमध्ये परतावे लागले.

तर, अशी ही ऐतेहासिक, भव्य अन दिव्य राजधानी दिल्ली पाहिली खरी, ती मनाला फारशी आवडली नाही आणि भावलीही नाही.

दिल्लीकरांना बाहेरच्यांविषयी आस्था नाही, की सोयरसुतक पण नाही. दिल्लीमध्ये रस्त्यात किंवा एखादया वसाहतीत साधा पत्ता जरी आपण एखाद्याला

विचारला, तरी दिल्लीकर नकाराची मान फिरवून बेफिकीरीने पुढे निघून जातात! दिल्लीकराना पाहुणचार करण्यातही स्वारस्य वाटत नाही.

इथल्या हॉटेलचे वेटर्स व मुंबईतले उडपी किंवा इतर हॉटेलचे वेटर्स, यांच्या स्वभावात जमीन अस्मानाचे अंतर जाणवते. जुन्या दिल्लीचा बकालपणा पर्यटकाला बेचैन करतो, तर नव्या दिल्लीचे रेखीवपण त्याला प्रसन्न करते.

अर्थात, आपल्या देशाच्या या रम्य, पण अगम्य अशा राजधानी दिल्लीत अधिक काळ राहिलो, तर तीचे अंतरंग मला अधिक कळू शकतील.

# स्वर्गस्थ

लाखो श्रोत्यांना आपल्या सुमधुर आणि दर्दभऱ्या स्वरांनी सदैव तृप्त करणारे थोर पार्श्वगायक स्वर्गीय महंमद रफी हे माझे अत्यंत आवडते गायक.

या थोर गायकाच्या स्मृतीला अभिवादन करताना मी तुम्हाला एका मराठी चित्रपट गीताविषयी जेष्ठ गीतकार विनायक राहातेकर यांनी सांगितलेली स्मरणीय आठवण इथे सांगत आहे.........

## रफीसाहब..........

देशासाठी लढणाऱ्या शौर्यशील जवानांवर सन १९७५-७६ साली 'शूरा मी वंदिले' या मराठी सिनेमाची निर्मिती प्रभाकर निंकळकर यांनी केली. त्याचे संगीतकार होते श्रीकांत ठाकरे. हा सिनेमा युद्ध व प्रेम कथेवर आधारित होता.

या सिनेमातील गीत लेखनाची जबाबदारी उमाकांत काणेकर व गीतकार विनायक राहातेकर या दोघांवर होती. राहातेकरांच्या तीन गीतांपैकी दोन कृष्णा कल्ले यांनी गायचे ठरले होते. राहिलेले एक गीत कोणी गायचे, याचा निर्णय श्रीकांतजीनी घेतला नव्हता.

त्या गीताचे बोल होते--' अरे दुःखी जीवा बेकरार होऊ नको.........'. सिनेमातील खलनायक होता एक पाकिस्तानी हेर. त्याला पकडले जाते. त्यावेळी

बंदिवासात असताना त्याची उदासी दर्दभऱ्या गीतातून व्यक्त होणार होती. हे गीत मराठी होते, तरी त्यात काही शब्द हिंदी-उर्दू असावेत, अशी श्रीकांतजींची इच्छा होती. गीत लिहिण्यापूर्वी विनायक राहातेकरांना चाल ऐकविण्यात आली. त्याप्रमाणे राहातेकरांनी गीत तयार केले. श्रीकांतजी अन निंकळकरानाही हे दर्दभरे गीत पसंत पडले. ' हे गीत आपण महंमद रफी कडून गाऊन घेणार आहोत. तोच हे गीत गायला फिट्ट आहे, ' असे श्रीकांत ठाकरे म्हणाले. गीतकार विनायक राहातेकरांना याचा खूप आनंद झाला.

त्यानंतर श्रीकांतजीनी रफीसमवेत भेट ठरवली व राहातेकरांना तयार राहायला सांगीतले. वांद्रे परिसरात पश्चिमेला महंमद रफीचे घर होते. विनायक राहातेकर, श्रीकांत ठाकरे आणि प्रभाकर निंकळकर असे तिघे रफीच्या घरी गेले.

छान स्वभावाचा हा हसतमुख माणूस. रफीने तिघांचे दिलखुलासपणे स्वागत केले. सिनेमाचा विषय व गीत रफीला भावले. नंतर श्रीकांतजींच्या निर्देशाप्रमाणे आपल्या सुमधुर आवाजात रफीने ते गीत गायला सुरुवात केली. खरोखर रफी तो रफीच. त्याच्या स्वरांना तुलना नाही. रफीचे ते सुस्वर ऐकताना तिघेही नादमुग्ध झाले!

त्या गीताचा पुढचा टप्पा होता रेकॉर्डींगचा. ताडदेवला फिल्मसेंटरचा स्टुडिओ होता. तेथे वेळात वेळ काढून संगीतकार मदनमोहन, स्वतः बाळासाहेब ठाकरे रफीचा आवाज ऐकायला आले होते! हे गौरवाचे क्षण विनायक राहातेकरांच्या कायम स्मरणात राहिलेत. त्या गीताचे रेकॉर्डींग परफेक्ट झाले. गीत खूप श्रवणीय होईल, असा राहातेकरांचा अंदाज होता, तो खरा ठरला. आजही आकाशवाणीवर हे गीत ऐकायला जाणकार श्रोते आतुर असतात.

' शूरा मी वंदिले ' चा प्रीमिअर शो गिरगावातील सेन्ट्रल सिनेमामध्ये मोठ्या थाटामाटात प्रदर्शित झाला. रामकृष्ण उल्हाळ या उमेदीच्या दिग्दर्शकाने दिग्दर्शित केलेला हा सिनेमा होता. त्यातील गाणी रसिकांच्या ओठी गाऊ जाऊ लागली. सिनेमाचा नायक होता सुनील रेगे(भारतीय जवान), खलनायक होता रविराज(पाकिस्तानी हेर) आणि नायिका होती सरला येवलेकर. या साऱ्यांनी सिनेमात जीव ओतून काम केले होते. हा सिनेमा खूप चालला

आणखी एक विशेष म्हणजे रफीचे गीत पडद्यावर गाणारा नायक नव्हे, तर खलनायक होता!

आजही या सिनेमातील रफीने गायलेले ' अरे हे दुःखी जीवा, बेकरार होऊ नको.....', हे दर्दभरे गीत ऐकणारे दर्दी श्रोते म्हणत असतील,' वाह! वाह! रफीसाहब आपने तो कमाल कर दी..............'

## 💐गीतकार विनायक राहातेकर यांचे संपूर्ण गीत💐

(चित्रपट-शूरा मी वंदिले, संगीत-श्रीकांत ठाकरे, स्वर-महंमद रफी, पडद्यावर गाणारा नट-रविराज.)

अरे दुःखी जीवा बेकरार होऊ नको.......
बरे ते नाही तुला पाश रेशमी कुठले
अखेरच्या घडीस हो मुष्कील तुटायाते
अरे दुःखी जीवा बेकरार होऊ नको........
अकेला तू तुला या जगात समजू नको

मी बदनशीब असा, दुःख मला सामोरी
कहाणी दर्दभरी लोक ऐकती लाखो
हे फूल उमलले नव्हतेची सावली सरली
कुणी ना हात दिला दूर राहिले धनको
अरे दुःखी जीवा बेकरार होऊ नको.........

तलाश रोज करी ध्यास घेतला पुरता
मला ते प्यार हवे आणखी काही नको
अरे दुःखी जीवा बेकरार होऊ नको......

# 💐💐मनभावन गीत, गाणे आणि कविता💐💐

या क्षणी आठवण होतेय शब्दप्रभु कविवर्य मंगेश पाडगावकर यांची. त्यांचा "सलाम" हा काव्यसंग्रह १९७८ मध्ये प्रसिद्ध झाला. "सलाम" मध्ये पाडगावकरांनी सन १९७५ मध्ये देशात लादल्या गेलेल्या आणीबाणीच्या वातावरणात प्रतिक्रिया म्हणून काही कविता लिहिल्यात. त्यात कविवर्य मंगेश पाडगावकर शब्द सामर्थ्याचे महत्व सांगतात----

" शब्द हे माझ्या कवितेचे माध्यम आहे. मी शब्दब्रह्माचा उपासक आहे. या शब्दाचे रहस्य मी शोधतो आहे. "

" शब्द, जिवंत शब्द,

भिजले पंख फडफडवणाऱ्या

पाखरांसारखे शब्द,

अन्यायाच्या पहाडाच्या

ठिकऱ्या ठिकऱ्या करणारे

सुरुंगासारखे शब्द,

ओल्या मातीच्या वासाचे शब्द,

प्रकाशाने झळाळणारे शब्द,

अंध सत्तेचा थरकाप उडवणारे शब्द,

गांधी आणि मार्टिन ल्युथर किंग
यांच्या छातीतली जखम व्यक्त करणारे शब्द,
म्हाताऱ्या आजीसारखे अनुभवी, शहाणे शब्द,
अपार निःशब्दतेशी एकाकार होणारे शब्द....”

अनुभवाच्या प्रत्येक वळणावर अनेक रुपांनी हे शब्द मला भेटत असतात.
बापाने आपल्या चार तरूण मुलांना विचारले, " तुम्हाला कोण व्हायचे आहे?"
पहिला म्हणाला, मी सेनाधिकारी होणार.
दुसरा म्हणाला, मी कारखानदार होणार.
तिसरा म्हणाला, मी वकील होणार.
चवथा मुलगा गप्पच होता--आपल्याच तंद्रीत असल्यासारखा.
त्याला तंद्रीतून जागा करुन बापाने पुन्हा विचारले,
" अरे, तुला कोण व्हायचे आहे? " तेव्हा तो मुलगा हसून म्हणाला,
" मला... मला... समजून घ्यायचे आहे. "
बापाने त्रासिक स्वरात विचारले, " समजून? काय समजून घ्यायचे आहे? "
तो मुलगा म्हणाला, " मला माणूस समजून घ्यायचा आहे.
माणूस दुःखी होतो म्हणजे काय? तो मोहात पडतो म्हणजे काय?
ज्या यशाच्या मागे तो छाती फुटेपर्यंत धावत असतो त्या यशाचा नेमका अर्थ काय?

माणूस एकाकी का होतो? मृत्यूचा अर्थ काय?

हे सारे मला समजून घ्यायचे आहे. "

माझी कविता कशासाठी या प्रश्नाचे उत्तर त्या चवथ्या मुलाच्या उत्तरापेक्षा वेगळे नाही. मला माणूस समजून घ्यायचा आहे आणि माणसावर प्रेम करीत माणसाचे गाणे मला गायचे आहे.........”

मनात काही छान छान उमटत रहातं.

ते मनातच उमटणाऱ्या शब्दांनी सजवून इकडे तिकडे लिहिलं जातं.

कधी वही, डायरी.

कधी फ़ेसबुक ब्लॉग

कधी व्हटसप, तर कधी मेल वर लिहून याचे त्याचे रिप्लाय येतात. लोकांना आवडतं, पुन्हा पुन्हा वाचावंसंही वाटतं.

अशा वेळी ते संकलित करावं.


एका वर्ड फ़ायलित टाकावं

आणि ई साहित्यकडे पाठवून द्यावं.

आनंद घ्या. आनंद द्या.

www.esahity.com

esahity@gmail.com


........व्यावहारिक जीवनात आपण
समाधानी कधीच राहात नाही.
आपल्या साऱ्या इच्छा
केव्हाच पूर्ण होत नाहीत.
पण याचा अर्थ असा नव्हे
की आपण निराश व्हावे,
हताश व्हावे.
त्यात सुद्धा आनंद असतो,
हे पाहायला शिकले पाहिजे.
वेचलेल्या फुलांतून मिळणाऱ्या सुगंधाने
आपण मोहित व्हायला हवेय.
यापेक्षा वेगळा आनंद तो कोणता ?.........
(आठवणीतील व्याख्याने)
- चारुदत्त